म. ग्रं. सं. ठाणे

सन 2

विषय

लेखक पं. वामन शास्त्री

क्रमांक

पुस्तकाचें नांव विदग्ध पुरु.

# विदग्धपुरूरवा.

१५

कादं

[illegible]
১২৭
[illegible]

[illegible]
[illegible]

Potdar's Moral and Interesting Book Series.

No. VIII.

# VIDAGDHÁPUROORAVÁ.

*Translated from Sanskrit*

by

PANDIT VAMAN SHASTRI ISLAMPURKAR,

AND PUBLISHED BY

WASUDEV MORESHVAR POTDAR.

*New Edition.*

Bombay:

PRINTED AT THE KARNATAKA PRESS.

1889.

*Price 14 Annas.*

*( Registered for Copy-right under the Government of India's Act XXV. of 1867.)*

पोतदारांची नीतिपर आणि मनोरंजक पुस्तकमाला.

नंबर ७.

# विदग्धपुरूरवा.

हें पुस्तक संस्कृत ग्रंथावरून

पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर

यांनीं मराठींत तयार केलें.

प्रणयिषु दाक्षिण्यवशादथवा सद्वस्तुबहुमानात् ।
पठत जना अवधानात् क्रियामिमां कालिदासस्य ॥

वासुदेव मोरेश्वर पोतदार

यांनीं

मुंबईत

"कर्नाटक" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८९.

किंमत चवदा आणे.

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.]

To,

MAHADEV CHIMNAJI APTE Esq.

*B. A., L. L. B.*

*Fellow of the University of Bombay and*

*Pleader High-Court*

THIS WORK

IS DEDICATED

IN AFFECTIONATE REMEMBRANCE OF HIS

SOCIAL AND AMIABLE QUALITIES

BY

*THE AUTHOR.*

# प्रस्तावना.

महाकवि **श्रीकालिदास** याणें केलेल्या **विक्रमोर्वशीय** नांवाच्या त्रोटकाच्या* आधारानें, प्रकृत

---

* ज्या काव्यांतील संविधानक पात्रद्वारा प्रेक्षकांपुढें हुबेहुब प्रत्यक्ष करून दाखवितां येईल, त्याला साहित्यशास्त्रकारांनीं दृश्यकाव्य असें नांव दिलें आहे. व त्याचे नाटक, प्रकरण, भाण, प्रहसन, डिम इत्यादि दहा भेद वर्णन केले आहेत. व त्यांचीं निरनिराळीं लक्षणेंहीं सांगितलीं आहेत. त्रोटक हें वरील दहा भेदांत असल्याचें आढळत नाहीं. हा नाटकाचाच एक भेद आहे. याचें लक्षण साहित्यदर्पण नांवाच्या ग्रंथांत सांगितलें आहे. जसें—"त्रोटकाचे सात, आठ, नऊ किंवा पांच अंक असावे, व त्यांतील पात्रांत दिव्य अर्थात् देवांत गणलेले व मनुष्य यांचा समागम झालेला असावा, असें जें असेल त्याला त्रोटक म्हणतात. त्रोटकाच्या प्रत्येक अंकांत विदूषक हें पात्र आलेंच पाहिजे." मूळ ग्रंथ विक्रमोर्वशी यांत वर सांगितलेलीं इतर लक्षणें मिळतात; पण प्रत्येक अंकांत विदूषक असावा, हें मात्र लक्षण मिळत नाहीं. कारण, मूळ ग्रंथाचा समग्र चवथा अंक चाळून पाहिला असतां, त्यांत विदूषकाचें नांव देखील नाहीं. असें आहे तथापि दिव्य आणि मनुष्य यांचा समागम झाल्याचें वर्णन करणें, हें मुख्य लक्षण यांत आहे. एखादें लक्षण नसलें म्हणून त्यापासून कांहीं हानि होते असें नाहीं. राजा पुरूरवा हा देवाचा पुत्र, तथापि त्याची मनुष्यांत गणना झालेली असून तो याचा मुख्य नायक आहे, व नायिका उर्वशी ही तर दिव्य आहेच. व या उभयतांचा या कथेंत समागम झाल्याचें वर्णन केलें आहे; ह्मणून याला त्रोटक ह्मटलें तें योग्यच आहे.

पुस्तक रचलें आहे. **कालिदास** कवीनें **मालविकाग्निमित्र**, **विक्रमोर्वशीय** आणि **शाकुंतल** अशीं तीन नाटकें केल्याचें प्रसिद्ध आहे. कवीच्या रचनेचें तारतम्य पाहिलें असतां वरील तीनही नाटकें कोणत्या क्रमानें त्यानें केलीं याविषयीं बरेंच अनुमान करतां येतें. **मालविकाग्निमित्र** नाटकाच्या प्रस्तावनेवरून व त्यांतील रसपरिपाकावरून **कालिदासानें** तें नाटक प्रथमच रचलें असावें व ज्यावेळीं त्यानें तें रचलें, त्यावेळीं त्याची लोकांत विशेष प्रसिद्धि व मान्यता झाली होती, असें वाटत† नाहीं, हें मार्मिक व रसिक वाचकांच्या लक्षांत येणार आहे. याप्रमाणेंच **विक्रमोर्वशी** हें त्याचें दुसरें नाटक असावें. यावेळीं **कालिदासाची** कविता सर्वांला मान्य झाली असून, तो बराच लोकप्रिय झाला असावा, असें त्याच्या प्रस्तावनेवरून‡ वाटतें. **शाकुंतल** नाटक या दोहोंच्या

---

† ह्या आमच्या अनुमानास मालविकाग्निमित्र या नाटकाच्या प्रस्तावनेंत चांगला आधार मिळतो. सूत्रधारानें, सभेच्या आज्ञेवरून कालिदासानें केलेल्या मालविकाग्निमित्र नाटकाचा मी प्रयोग करून दाखवितों, असें सांगितलें. त्यावर त्याचा साथी पारिपार्श्वक म्हणाला, "छे छे! असें करूं नको. ज्यांचें यश सर्वत्र प्रसिद्ध झालें आहे अशा भास, सौमिल्ल, कविपुत्र इत्यादि मोठमोठ्या प्राचीन कवींनीं केलेलीं नाटकें सोडून विद्यमान कवि कालिदास याच्या कृतीवर सामाजिकांचा बहुमान कसा आहे?" यावरून कालिदास त्यावेळीं विशेष प्रसिद्ध असून, त्याची कविता सर्वमान्य झाली होती असें अनुमान करणें चुकीचें होणार आहे, हें अगदीं उघड आहे.

‡ विक्रमोर्वशीच्या प्रस्तावनेंत सूत्रधार सामाजिकांला उद्देशून ह्मणतो, " सभ्य हो, आपल्या ठिकाणीं प्रेम ठेवणाऱ्यांचें दाक्षिण्य वा-

नंतर त्याणें रचलें असावें. यावेळीं त्याचा कीर्तिध्वज चहूंकडे फडकत असून तो आबालवृद्ध, विद्वान् अविद्वान् या सर्वांला एकसारखा प्रिय झाला असावा असें वाटतें. व ती त्याची कविताही सर्वांगसुंदर वधूप्रमाणें अप्रतिम उतरली आहे.

विक्रमोर्वशी ह्या त्रोटकांत देवांची वेश्या उर्वशी व मोठा रंगेला राजा पुरूरवा यांच्या समागमाचें वर्णन फारच बहारीनें केलें आहे. याचा नायक राजा पुरूरवा हा फारच प्राचीन ह्मणजे सोमवंशाचा आद्य राजा होय. धर्मसंबंधानें याच्या कारकिर्दींत एक मोठा विलक्षण फेरफार झाला आहे. या राजाचें चरित्र निरनिराळ्या पौराणिक ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं वर्णन केलें आहे, हें तर प्रसिद्धच आहे. पण आर्य लोकांच्या सर्व ग्रंथांत अत्यंत प्राचीन, व ज्याच्या पूर्वीचें—केवळ आर्यांतच नव्हे, तर कोणत्याही देशांतल्या लोकांचें कोणतेंही धर्मपुस्तक आद्य नाहीं, असा परमपूज्य व जगांत अगदीं पहिला असा जो ऋग्वेद त्यांतही या राजाचें चरित्र आढळतें. राजा पुरूरवा आणि उर्वशी या उभयतांचा जो समागम होऊन पुन्हा वियोग झाला आहे, त्यावेळचा उभयतांचा संवाद ऋग्वेदांत वर्णन केला आहे. अशा या फार जुनाट राजाचें चरित्र वेदांत व पुराणादिक ग्रंथांत कसें वर्णन केलें आहे, तें थोडक्यांत

ळगणें यावरून अथवा या त्रोटकांत जें उत्तम कथानक वर्णन केलें आहे, त्याविषयीं बहुमान बाळगून ही कालिदासाची कृति अर्थात् विक्रमोर्वशी लक्ष्यपूर्वक आपण श्रवण करा." यावरून कालिदासाविषयीं लोकांचा ग्रह चांगला होता व तो यावेळीं त्यांना मान्य झाला होता, हें ध्वनित होतें.

येथें दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं. व त्यावरून संविधानक रचण्याच्या कामांत कवीचें किती चातुर्य आहे तें दिसून येईल.

राजा **पुरूरवा** **प्रतिष्ठान** अथवा **प्रयाग** येथें राज्य करीत असतां, त्याची कीर्ति चहूंकडे पसरली होती. एके दिवशीं **नारद**ऋषीनें **इंद्रा**च्या सभेंत **राजा**चे गुण विशेष प्रकारें वर्णन केले, ते ऐकून **उर्वशी** लुब्ध होत्साती कामातुर होऊन **राजा**जवळ प्राप्त झाली. **उर्वशी**ला **मित्रावरुण**ऋषीचा शाप झाला होता, ह्मणून तिला कांहीं दिवस मनुष्यलोकांत वास्तव्य करावयाचें होतें. एकाएकीं **उर्वशी** प्राप्त होतांच **राजा** चकित होऊन त्याणें तिचा मोठा सत्कार केला. नंतर **उर्वशीनें** **राजा**जवळ राहण्याचें कबूल करून दोन बोकड त्याच्यापाशीं ठेवणीस दिले व "त्यांचें अप्रमत्त होऊन रक्षण करावें, मी तुपावांचून† दुसरें कांहींच अन्न खाणार नाहीं व समागमावांचून वस्त्ररहित तुला अवलोकन करणार नाहीं," असे तिनें **राजा**ला नियम सांगितले. व ते मान्य करून **राजा** तिच्यासहवर्तमान दिव्य व मानुष विषयांचा उपभोग करूं लागला.

**उर्वशी** फार दिवस कोठें दिसत नाहीं, असें पाहून

---

† देव हे मनुष्यांसारखें अन्न भक्षण करीत नाहींत. ते नेहमीं अमृताचें प्राशन करीत असतात. व वेदांत असें सांगितलें आहे कीं, " तूप हें देवांचें अमृतच आहे. " उर्वशी ही स्वर्गलोकांत राहणारी असल्यामुळें व मनुष्यलोकांत तूप हेंच अमृत असल्यामुळें 'तिणें तुपावांचून दुसरें कांहीं खाणार नाहीं,' असें सांगितलें.

तिच्यावांचून आपल्या सभेला शोभा नाहीं, तेव्हां कसेंही करून तिला घेऊन या, असें सांगून **इंद्रानें** गंधर्वांला **उर्वशीला** आणण्याकरितां पाठविलें. तेव्हां गंधर्वांनीं, **उर्वशीनें** आपल्या पुत्राप्रमाणें पाळलेले असे जे दोन बोकड राजाजवळ ठेविले होते, ते अंधाऱ्या रात्रीं येऊन हरण केले. त्यावेळीं त्या बोकडांनीं जो आक्रोश केला, तो ऐकून **उर्वशी** जागी होऊन **राजाला** फारच टाकून बोलली. ती ह्मणाली, "हाय! हाय! मी कपाळफुटकी या असल्या नेभळ्या पुरुषाचा आश्रय केल्यामुळें व्यर्थ नाशाला पात्र झालें. चोरांनीं माझे मुलगे हरण केले. जशा बायका दिवसा बेहोष निजतात, तसा हा पुरुष असूनही रात्रीं बेहोष निजतो!"

**उर्वशीचे** हे वाग्बाण ऐकून, **राजा** सुस्त निजला होता तरी, धडपडून उठला आणि हातांत तरवार घेऊन गंधर्वांच्या मागें धांवला. गंधर्वांला बोकड नेण्याचें मुळींच कारण नव्हतें. कोणत्याही रितीनें **उर्वशीनें राजा**जवळ जे नियम ठरविले होते, त्यांचा भंग करावा इतकाच त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें बोकड त्यांणीं हरण केले, तरी राजा **पुरूरवा** मागून धांवत आला तेव्हां त्यांला बोकड सोडावे लागले.

बोकडांचें रक्षण झालें नसतें तर **उर्वशी**च्या नियमांचा भंग झाला असता; पण **राजानें** ते परत आणिले, तेव्हां गंधर्वांनीं दुसरी युक्ति केली. **राजा** बिछान्यावरून नागवाच त्यांच्या मागें धांवला होता. अंधकार असल्यामुळ **उर्वशीला** तो वस्त्ररहित आहे हें दिसलें नसतें; पण गंधर्वांनीं—बोकड घेऊन **राजा** परतला, तेव्हां

विजेचा प्रकाश पाडून नग्न असतां त्याला उर्वशीच्या दृष्टीस पाडला. तेव्हां अर्थात् प्रतिज्ञेचा भंग झाल्यामुळें ती बिछान्यावर होती तेथल्या तेथेंच अदृश्य होऊन स्वर्गलोकीं निघून गेली.

याप्रमाणें गंधर्वांनीं उर्वशीचा आणि राजाचा वियोग केला. तेव्हां ती गेल्यामुळें राजाला वेड लागलें. तो चहूंकडे उर्वशी उर्वशी, करीत फिरत फिरत सहज कुरुक्षेत्रांत प्राप्त झाला. तेथें एका सरोवराचे कांठीं पांच सख्यासहवर्तमान उर्वशी त्याचे दृष्टीस पडली, त्यावेळीं राजा फार काकुळती येऊन तिला ह्मणाला, "हे कठोरमनाचे* स्त्रिये ! अंमळ उभी रहा. आपण दोघेंही एका ठिकाणीं बसून गोष्टी करूं या. मी ज्या आतां गोष्टी बोलणार आहें, त्या यापूर्वीं कधींही तुझ्या जवळ बोललों नाहीं. अग, तूं मला टाकूं नकोस. अद्याप माझी तृप्ति झाली नाहीं. तुझ्या वांचून अत्यंत दुःखि झालेलें हें माझें उत्तम शरीर आतां येथेंच पतन पावेल. याच्यावर तुझा प्रसाद झाला नाहीं, यामुळें याला लांडगे व गिधाड तोड तोडून खातील!"

यावर उर्वशी ह्मणाली, "छेछे, असें करूं नकोस. पुरुषासारखा पुरुष असून तूं उगचि कां मरतोस? इडापिडा टळो! लांडगे व गिधाड तुला न खावोत.

---

* हीं व याच्या पुढचीं भाषणें ऋग्वेद संहितेच्या आठव्या अष्टकाच्या पांचव्या अध्यायांत वर्णन केलीं आहेत. हें एक सूक्तच आहे व याचे अठरा मंत्र आहेत. आम्ही त्यांतल्या कांहीं मंत्रांचा येथें मुळांत सारांश दिला आहे.

तूं विचार करून पहा कीं, बायकांशीं सख्य ह्मणून कोणीं सांगितलें आहे काय? अरे, बायकांचें हृदय लांडग्याच्या हृदयासारखें आहे. स्त्रिया स्वभावतःच निर्दय व मोठ्या कठोर आहेत. साहस त्यांना प्रिय आहे. थोड्याशा कारणाकरितां त्या—मग तो नवरा असो, भाऊ असो किंवा बाप असो, त्यांचा घात करायला मागें पुढें पाहत नाहींत. त्यांतून आह्मी तर यथेच्छ वागणाऱ्या स्त्रिया. आह्मांला नव्या नव्या पुरुषांची अपेक्षा. तेव्हां माझ्याकरितां तूं आपल्या जिवाची वाट लावून घेणार ह्मणतोस, हें चांगलें नाहीं. तुझ्या जिवावर लाखों प्राण्यांचें सुखदुःख अवलंबून आहे. धैर्य धरून आपलें मन स्थिर कर व उदंड वर्षें वांचून प्रजेचें रक्षण कर. धर्म आचरण कर व लोकांत धर्माची स्थापना कर. अशीं मोठमोठीं कृत्यें करावयाचीं सोडून बायकांसारखा जीव देणार ह्मणतोस, हें तुला शोभतें काय!”

**उर्वशीनें राजाला** बोध होईल अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या तरी तो कांहीं केल्या तिला सोडीना. तेव्हां—आजपासून एक वर्षानें एक रात्रभर तुझा आमचा सहवास होईल, असें सांगून ती निघून गेली. **उर्वशी** यावेळीं गरोदर होती. वर्ष भरल्यावर **राजा** पुन्हा त्या ठिकाणीं प्राप्त झाला, तेव्हां त्याला **उर्वशीची** गांठ पडली. सूर्योदय होतांच तिचा वियोग होणार ह्मणून **राजा** एकसारखा रडत होता. त्याची दया येऊन **उर्वशीनें** गंधर्वांचें आराधन कर, ह्मणजे माझा लाभ होईल असें सांगून ती उजाडतांच निघून गेली.

**राजा उर्वशीच्या** प्राप्तीकरितां गंधर्वांची स्तुति क-

रीत असतां त्यांणीं त्याला एक अग्नीची थाळी दिली. **राजाला** ती **उर्वशीच** आहे असें वाटलें. **राजा** वेडावलेलाच होता त्याणें ती थाळी आपल्या घरांत नेऊन ठेविली व अरण्यांत संचार करून पुन्हा प्राप्त झाला. ही वेळ **कृतयुग** सरून **त्रेतायुगाला** प्रारंभ होण्याची होती. त्यामुळें ईश्वरी प्रेरणेनें **राजाचे** मनांत—त्रयी अर्थात् **ऋग्वेद, यजुर्वेद** व **सामवेद** या तीन वेदांत सांगितलेलीं यज्ञयागादि कर्में करण्याविषयींची प्रवृत्ति झाली. **राजानें** ज्या ठिकाणीं स्थालि ठेविली होती त्या ठिकाणीं जाऊन पाहिलें तों तेथें त्याला अश्वत्थ वृक्ष व शमीचा वृक्ष आहे असें दिसलें. नंतर त्याणें त्या अश्वत्थाचें लांकूड घेऊन त्याच्या दोन अरणी केल्या व शमीच्या लांकडाचा मंथा केला. आणि **उर्वशी** खालची अरणी व आपण वरची अरणी अशी भावना करून मंथन केलें, तेव्हां त्यापासून अग्नि उत्पन्न झाला. **राजानें** त्या अग्नीला आपला पुत्र असें मानिलें. व **उर्वशीच्या** प्राप्तीकरितां त्या अग्नींत हवन करून राजा गंधर्वलोकांत गेला, व तेथें **उर्वशी** समागमाचें अक्षय सुख त्याला प्राप्त झालें, असें वर्णन केलें आहे.

वर सांगितलेल्या कथेवरून यज्ञयागादि कर्ममार्गाचा मुख्य प्रवर्त्तक राजा **पुरूरवा** ही गोष्ट अगदीं उघड होते. **पुरूरव्याच्या** पूर्वीं कृतयुग होतें. त्या कृतयुगांत एकच देव व वेद ही एकच होता. सर्व वाङ्मयाचा मुख्य जो ओंकार त्यालाच कृतयुगांत वेद मानीत असत. मनुष्यमात्रांत जातिभेद मुळींच नव्हता. सर्व मनुष्यें हा एकच वर्ण मानीत असत. व ईश्वराला आराधन करण्याचा मार्ग—ओंकाराचा जप करून ईश्वराचें ध्यान करणें, हाच

काय तो त्यावेळीं प्रचारांत होता; पण राजा पुरूरव्यापासून त्यांत मोठा फरक पडला. पुरूरव्याच्या नंतर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र असे चार वर्ण निरनिराळे झाले. ॐकार हाच एक वेद होता, याबद्दल ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद असे निरनिराळे तीन वेद झाले. ईश्वराचें आराधन करण्याचा मार्गही बदलला. ध्यान मार्गाची प्रवृत्ति मोडून त्याच्या बदला राजसूय, वाजपेय, अग्निष्टोम इत्यादिक यज्ञ करण्याची प्रवृत्ति सुरू झाली. याप्रमाणें ह्या पुस्तकाचा नायक जो राजा पुरूरवा त्यानें धर्मसंबंधांत मोठा विलक्षण फेरफार केला.

वर आह्मीं पुरूरव्याची जी कथा वर्णन केली आहे, तिचें ऐतिहासिक संबंधानें किती महत्व आहे हें सूज्ञ वाचकांच्या लक्षांत येईल. आतां वाचकांला हें पुस्तक नजर करण्यांत आमचा मुख्य हेतु काय, तोही थोडक्यांत सांगितला पाहिजे. तो असा कीं, सुलभ व सरळ रितीनें लिहिलेली ही कथा वाचून त्यांला तीपासून कांहीं बोध उत्पन्न व्हावा, व त्यांची सन्मार्गाकडे प्रवृत्ति व्हावी. हा आमचा मुख्य उद्देश आहे. आतां तो कितपत सिद्ध होईल याचा विचार केला पाहिजे.

वर दिलेल्या कथेवरून व पुढें मुळांत जें वर्णन केलें आहे, त्यावरून कितीएक सोंवळे ह्मणविणारे वाचक असें ह्मणतील कीं, एका वेश्येच्या नादीं लागून वेडा झालेल्या मनुष्याचें चरित्र वाचण्यापासून बोध तो कसला प्राप्त होणार आहे? उलट चांगल्या स्थितीच्या मनुष्याला देखील—असलीं चरित्रें वाचल्यानें त्यांच्या मनावर विपरीत ग्रह होऊन, ते कदाचित् वाईट मार्गाचें अनुसर-

रण करतील! हा त्यांचा आरोप सकृद्दर्शनीं कदाचित् कोणाला खरा वाटेल; पण वस्तुतः तो अगदीं पोकळ आहे. किंबहुना त्यांत कांहीं अर्थच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. कारण, कोणतीही एखादी गोष्ट वाईट आहे आणि ती करूं नका, एवढें सांगितल्यानेंच लोकांच्या मनाचें समाधान होत नाहीं. वाईट अथवा चांगली कोणतीही गोष्ट कां असेना, तिच्या विषयीं अनुकूल अथवा प्रतिकूल ग्रह होणें तो उदाहरणावरून तिचा चांगले पणा अथवा वाईटपणा विशेष रीतीनें व्यक्त केल्यावांचून होत नाहीं. महाकवि **कालिदास** याणें मूळ ग्रंथाची रचना केली, त्यांत त्याचा हाच मुख्य उद्देश असावा. सामान्यतः स्त्रियांचें वेड, त्यांतूनही वेश्यादिक मोहक स्त्रियांचा नाद प्रत्येक पुरुषमात्राला थोडा बहुत लागण्याचा संभव आहे व तशा नादापासून केवढाही मोठा मनुष्य असला तरी त्याची स्थिति किती शोचनीय होते, ती कवीनें उत्तम प्रकारें त्यांत वर्णन केली आहे. **पुरूरव्यासारख्या** सार्वभौम व सर्वैश्वर्यसंपन्न अशा **राजाला** देखील—हें वेड लागल्यामुळें तो रानावनांत फिरून किती दुःखाला व कष्टाला पात्र झाला हें त्यांत कवीनें उत्तम प्रकारें दाखविलें आहे. सामान्यतः वेश्यांचा स्वभाव कसा असतो, त्यांना कोणकोणत्या गोष्टींची अपेक्षा असते व पुरुषांशीं त्यांचें वर्तन कसें असतें हेंही ठिकठिकाणीं व्यक्त केलें आहे. केवळ नायकांचें नांव आलें किंवा त्यांच्या मनोरम भाषणाचा एखादा चुटका आढळला कीं तें पुस्तक नादान अथवा कुमार्गबोधक, अशा ज्या महारसिक लोकांच्या समजुती असतील, त्यांचें आम-

च्या किंवा आमच्या पेक्षांही मोठमोठ्या ग्रंथकारांच्या हातून कोणत्याही रितीनें समाधान करवलें जाणार नाहीं. त्यांच्यापुढें हात टेंकावेच लागतील. तथापि एकंदरींत तशा समजुतीचे लोक हे केवळ अरसिकाचे शिरोमणी आहेत, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

एखादा काव्यदोषविवेचनकारासारखा अरण्यपंडित, जगविख्यात व कविशिरोमणी अशा कालिदासावर कोरडे उडविण्यास लाजत नाहीं, त्याला आमच्या सारख्याचा काय पाड आहे! तो आमच्यावर सहज लाखोली वाहील; पण तशा लोकांच्या ह्मणण्याकडे मुळींच लक्ष्य देतां कामा नये. व त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें समजून 'गजकुकुर' न्यायच स्वीकारला पाहिजे. एका महाकवीनें ह्मटलें आहे कीं,—" माझी उक्ति रसिक व विद्वान् लोकांना अमृतासारखी गोड वाटून जर ती त्यांना रंजवीत असेल, तर अरसिक पुरुषांच्या अनादराचे भारेचे भारे तिच्यावर पडले असले तरी तिचें काय वांकडें होणार आहे? उघडच आहे, तरुण मनुष्याला जी स्त्री मनोहर वाटते तीच अज्ञान अर्भकांचें मन हरण करीत नाहीं. हा काय तिचा दोष आहे? व ती, आपण अर्भकाला मनोहर वाटत नाहीं, ह्मणून कधीं तरी खिन्न होईल काय?"

सामान्यतः या संसारांत प्रत्येक मनुष्याला निरनिराळ्या अनेक विषयांचें ज्ञान असून तो चतुरस्त्र असला पाहिजे. त्याला बऱ्याबाईट सर्व गोष्टी समजल्या पाहिजेत. वाईट गोष्टींचे परिणाम कसे होतात, तेही त्याच्या लक्षांत असले पाहिजेत. तरच त्याच्या बुद्धीचा विकास होतो व त्याच्या हातून मोठमोठीं कार्यें घडतात. ज्यांत

कोणताही रस नाहीं अशा प्रकारचीं निःसत्व पुस्तकें— तीं नीतीचें सर्वस्व आहे असें समजून—तरुण मुलांस वाचावयास दिलीं तर त्यापासून कांहीं एक उपयोग तर व्हावयाचा नाहींच, पण उलट तीं तरुण मुलें नेभळीं व पहिल्या प्रतीचीं अरसिकशिरोमणी मात्र होतील. बाकी तशा पुस्तकांची प्रवृत्ति करणारांचे हेतु अंशतः तरी सिद्ध होतील कीं काय, याची आशाच करावयास नको. कारण नैसर्गिक प्रवृत्तीला अटकाव करतां कसा येईल!

आह्मीं मूळ ग्रंथाचें अक्षरशः भाषांतर केलेलें नाहीं, तरी मुळांतला अर्थ न जाऊं देतां मागच्या पुढच्या भागाची संगति लावून हें पुस्तक तयार केलें आहे. याला **'विदग्धपुरूरवा'** असें नांव ठेविलें आहे. विदग्ध—ह्मणजे रसिक अथवा रंगेला. राजा **पुरूरव्याच्या** एकंदर चरित्रावरून तो विशेष रंगेला होता, ह्मणून त्याला हें नांव दिलें आहे. हें पुस्तक फार थोड्या वेळांत तयार झालें. गेल्या जुलई महिन्याच्या पंचविसाव्या तारखेस आह्मीं हें पुस्तक लिहिण्यास आरंभ केला, व तें आगष्ट महिन्याच्या चवथ्या तारखेस समाप्त केलें. ह्मणजे सरासरी नऊ दिवसांत हें पुस्तक तयार झालें. जलदीनें तयार केल्यामुळें यांत स्थलविशेषीं चुका मुळींच नसतील असें नाहीं, तरी सूज्ञ वाचकांनीं त्याचा यथायोग्य स्वीकार करावा.

शेवटीं आमचे मित्र रा० रा० **वासुदेव मोरेश्वर पोतदार** यांणीं विशेष प्रोत्साहन केल्यावरून आमच्या हातून ही महाराष्ट्रभाषेची सेवा घडली आहे, हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. महाराष्ट्रभाषेंत उपयुक्त ग्रंथांची समृद्धि

व्हावी, असा विचार करून **पोतदार** यांणीं "**पोतदारांची नीतिपर** व **मनोरंजक पुस्तकमाला**" या नांवाखालीं प्राचीन बहुतेक उत्तमोत्तम काव्यें व नाटकें यांच्या आधारानें पुस्तकें लिहवून प्रसिद्ध करण्याचा विचार केला, व त्याप्रमाणें **करुणराघव**, **ललितवत्सराज** पूर्वार्ध व उत्तरार्ध, **चारुदत्त** आणि **वसंतसेना**, **प्रणयिमाधव**, **आर्यचाणक्य**, **विदग्धपुरूरवा**, आणि **राजाअग्निमित्र** हीं पुस्तकें आह्मीं तयार केलीं. हें काम अवघें सुमारें चार महिन्यांत तयार झालें. व आणखीही पुष्कळ पुस्तकें—कांहीं तयार होत आहेत, कांहीं छापत आहेत, अशा स्थितींत आहेत. एकंदरींत आमचे मित्र **पोतदार** यांणीं मोठा खर्च करून हें देशसेवेचें काम आरंभिलें व तें आमच्याकडून घेतलें, याबद्दल फार संतोष वाटतो. व सर्व महाराष्ट्र भाषाभिज्ञांनीं याबद्दल त्यांचे विशेष आभार मानिले पाहिजेत.

मुंबई,
घरनं० २० पोर्चुगीजचर्च लाईन, गिरगांव.
तारीख ४ अक्टोबर सन १८८९.

**वा. शा इ.**

ओंनमः श्रीगणेशाय.

# विदग्धपुरूरवा.

वेदान्तेषु यमाहुरेकपुरुषं व्याप्य स्थितं रोदसी
यस्मिन्नीश्वर इत्यनन्यविषयः शब्दो यथार्थाक्षरः ।
अन्तर्यश्च मुमुक्षुभिर्नियमितप्राणादिभिर्मृग्यते
स स्थाणुः स्थिरभक्तियोगसुलभो निःश्रेयसायास्तु वः ॥

असें सांगतात कीं सर्व जगाचा उत्पन्न कर्ता **ब्रह्मदेव** यानें अनेक प्रकारें जी सृष्टि उत्पन्न केली, त्यांत **चंद्र** नांवाचा पुत्र त्याच्या मानसिक सृष्टींत उत्पन्न झाला. तो मोठा तेजस्वी असून आपल्या अमृतमय किरणांनीं सर्व लोकांला आनंद देणारा व औषधी वनस्पति इत्यादिकांला पोषण करणारा आहे असें पाहून **ब्रह्मदेवानें** त्याला ब्राह्मण, नक्षत्रें आणि औषधी वनस्पति वगैरेंचें पालन करणारा राजा नेमला. त्याची **प्रभा** नांवाची स्त्री होती व सत्तावीस नक्षत्रें याही त्याच्या स्त्रिया होत्या. तरी विशेष कामी असल्यामुळें त्याच्या मनाची शांति झाली नव्हती.

एके दिवशीं त्याच्या घरीं कांहीं उत्सव होता, त्यांत इंद्रादिक इतर देव व **बृहस्पति** इत्यादिक ऋषि आपापल्या स्त्रियांसहवर्तमान तो समारंभ साजरा करण्याकरितां आले होते. त्याप्रमाणें उत्सव आटोपतांच इतर सर्व मंडळी आपापल्या ठिकाणीं परत निघून गेली. पण **बृहस्पतीची स्त्री तारा** ही कांहीं निमित्त करून आपले नवऱ्याबरोबर न

जातां मागें राहिली. ती त्या उत्सवांत वावरत असतां चंद्राची आणि तिची दृष्टादृष्ट होऊन परस्परांचें मन एकमेकांवर आकृष्ट झालें. व त्याप्रमाणें तारा बरेच दिवस चंद्राच्या येथें राहिली.

पुष्कळ वेळ निरोप पाठविले तरी चंद्रानें तारेला तिच्या घरीं पाठविलें नाहीं, व तीही त्याच्यावर आसक्त झाल्याकारणानें जाण्यास तयार झाली नाहीं. असें होतां होतां ती गरोदर झाली; व नंतर मोठी लढाई† वगैरे होऊ-

---

† चंद्र तारेला पाठवीनासा झाला तेव्हां बृहस्पतीनें ती गोष्ट इंद्राला कळविली. व इंद्रानें तारेला पाठविण्याविषयीं चंद्राला सक्तीचा निरोप पाठविला. इंद्रानें तारेच्या संबंधानें चंद्राची पुष्कळ निर्भर्त्सना केली; पण स्वतः इंद्रही अहल्येच्या संबंधानें दोषीच होता. तेव्हां चंद्रानें कर्में वर्में काढून त्याला लागेसारखा उलट निरोप पाठविला. शेवटीं चंद्र सामदामानें तारेला देत नाहीं असें ठरल्यावरून इंद्रानें लढाईची तयारी केली. ह्या मोठ्या संग्रामाला 'तारकामय संग्राम' असें म्हणतात. निरनिराळ्या पुराणांत याचें सुरस व सविस्तर वर्णन केलें आहे.

बृहस्पति आणि शुक्र यांचें परस्पर वैर होतें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. इंद्रानें बृहस्पतीचा पक्ष उचलला तेव्हां अर्थात् सर्व देव त्याच्याबरोबर तिकडे गेले. तेव्हां चंद्रानें दैत्यांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करून प्रथम त्यांचा गुरु शुक्राचार्य याला अनुकूल करून घेतलें. व बृहस्पतीच्या द्वेषास्तव शुक्राचार्यानें तत्काल ती गोष्ट कबूल केली. शुक्राचार्य हा—महादेवाचा गुरुबंधु होता ह्मणून आपल्या गुरुबंधूच्या साह्यार्थ भूत प्रेतगणासह महादेव चंद्राच्या पक्षाला अनुसरला. याप्रमाणें एकंदर देव आणि दैत्य या उभयतांची भयंकर लढाई झाली. शेवटीं दोन्हीही पक्ष सबल असून विनाकारण प्राणिक्षय होत आहे असें पाहून ब्रह्मदेवानें मध्यस्थी करून ही लढाई मिटविली.

न **ब्रह्मदेवाच्या** मध्यस्थीनें **तारा** आपल्या नवऱ्याजवळ गेली. तरी **चंद्रा**पासून तिला एक पुत्र झाला व तो **ब्रम्हदेवानें चंद्रा**लाच दिला.

त्या पुत्राची बुद्धि व त्याचें प्रौढपणाचें वर्तन वगैरे पाहून **चंद्रानें ब्रम्हदेवाच्या** आज्ञेनें **बुध** असें त्याचें नांव ठेवलें. दिवसेंदिवस प्रौढ होऊन त्या पुत्रानें आपला पिता **चंद्र** याला फार आनंद दिला. तो **बुध** भरतारुण्यांत असून एके दिवशीं मेरु पर्वताच्या आसपास संचार करीत असतां इला§ नांवाची एक सुस्वरूप तरुण स्त्री त्याच्या दृष्टी-

---

§ ह्या इलेच्या संबंधानें पुराणांत मोठी चमत्कारिक गोष्ट वर्णन केली आहे. इला ही मुळची स्त्री नसून पुरुष होता. व सूर्यवंशी आद्य राजा अर्थात् वैवस्वत मनु याचा पहिला पुत्र सुद्युम्न याला स्त्रीत्व प्राप्त झालें असून त्याला इला ह्मणत होते. ह्याची कथा अशी आहे कीं, सुद्युम्न हा भरतारुण्यांत आला असून मृगया करीत अरण्यांत संचार करीत होता. करतां करतां ह्या जंबूद्वीपाचे जे नऊ भाग अथवा खंड आहेत, त्यांपैकीं इलावृत नांवाच्या खंडांत तो मृगया करीत गेला. तेथें जातांच त्याला एकाएकी स्त्रीत्व प्राप्त झालें व त्याचा घोडा होता त्याची घोडी झाली आणि बरोबर जे चाकर होते तेही स्त्रीरूप झाले. त्याचा असा रूपविपर्यास होण्याचें कारण महादेवाची मर्यादा हीच होय. ह्मणजे त्या इलावृत खंडांत भगवान् शंकर पार्वतीसहवर्तमान यथेच्छ क्रीडा करीत असतात. एके दिवशीं ती आपल्या क्रीडेंत निमग्न असतां अकस्मात् सनत्कुमारादि ऋषि शंकराच्या दर्शनास आले. ते ब्रह्मचारी असल्यामुळें त्यांला पहाताच पार्वतीला अतिशय लाज वाटली व तिनें—आजपासून या प्रदेशांत जो कोणी पुरुष येईल त्याला तत्काल स्त्रीत्व प्राप्त होईल, असा शाप दिला. व महादेवानें ती मर्यादा मान्य केली. राजपुत्र सुद्युम्न याला वरील मर्यादा

स पडली. तेव्हां तत्काल उभयतांची मैत्री होऊन बुधानें तिचा स्वीकार केला व त्यापासून ती गर्भिणीही झाली. महिने पूर्ण होऊन तिला उत्तम तेजस्वी पुत्र झाला. त्याला चंद्रानें जातकर्मादि संस्कार करून पुरूरवा असें नांव ठेविलें. चंद्र व बुध या उभयतांची देवांत गणना झाल्यामुळें ते स्वर्गातच रहात होते; पण पुरूरव्याची आई इला ही मनूची संतती असल्यामुळें त्याची मनुष्यांत गणना झाली. तो प्रौढ होतांच त्याणें भूलोकांत प्रतिष्ठान† नांवाच्या नगरींत गादी स्थापिली.

---

माहीत नव्हती; ह्मणून त्यानें त्या खंडांत प्रवेश केला व त्याला स्त्रीत्व प्राप्त झाले. स्त्रीत्व प्राप्त होतांच त्याचे मनोधर्मही स्त्रियांसारखेच झाले.

हें वर्तमान आपला कुलपुरोहित वसिष्ठ याकडून वैवस्वत मनूला समजलें व यजमानाच्या पुत्राकरितां वसिष्ठानें शंकराचें आराधन करून त्याला प्रसन्न करून घेतलें. तेव्हां महादेवानें आपलें वचन खोटें न करितां—सुद्युम्न हा एक महिना स्त्री व एक महिना पुरुष होईल, असें सांगितलें. या व्यवस्थेनें सुद्युम्न राज्य करीत होता तरी प्रजेला त्याजपासून संतोष झाला नाहीं; म्हणून वैवस्वत मनूनें इक्ष्वाकु, नृग, शर्याति इत्यादि दुसरे दहा पुत्र उत्पन्न केले; व सर्व राज्य इक्ष्वाकूला दिलें.

इकडे वर सांगितल्याप्रमाणें सुद्युम्नाला स्त्रीभाव प्राप्त झाला असतां त्याच संधीस बुधाची आणि त्याची गांठ पडून त्याला पुरूरवा नांवाचा पुत्र झाला; चंद्रवंशाचा मुळ पुरुष हाच पुरूरवा होय.

† प्रतिष्ठान याला सामान्यतः पैठण असें लोक समजतात व शालिवाहानाचें ज्या ज्या ठिकाणीं वर्णन आलें आहे तेथें तेथें प्रतिष्ठान शब्दानें पैठण घेणें योग्य आहे; पण या ठिकाणीं मात्र तें घेता येत नाहीं. कारण पुरूरव्याचें नगर जें प्रतिष्ठान तें गंगा आणि यमुना या दोन

राजा **पुरूरवा** मोठा पराक्रमी असून लोकप्रिय होता. त्यानें इंद्राचें साह्य करण्याकरितां पुष्कळ वेळां दैत्यांशीं लढाया करून त्यांचा पराभव केला. याला विवाहित पुष्कळ स्त्रिया होत्या, तरी तो मोठा विषयी असल्याकारणानें त्याचें मन शांत नव्हतें. जसा शौर्याच्या कामांत त्याचा मोठा नांवलौकिक होता, तसाच स्त्रैणपगाच्या कामांतही त्याची विशेष प्रख्याति होती. तो स्त्रैण होता तरी आपलीं नित्यकृत्यें व नेमधर्म वगैरे वेळच्यावेळीं करण्याच्या कामांत तो कधींही चुकत नसे.

एके दिवशीं तो सूर्याची पूजा करण्याकरितां स्वर्गलोकीं जाऊन—सर्वत्र ज्याची गति अप्रतिहत चालत असे, अशा रथावर बसून **हेमकूट** पर्वतावरून आपल्या राजधानीकडे परत येत होता. वाटेंत अकस्मात्—महाराज आमचें रक्षणकरा! आह्मी अनाथ आहों, आह्मांला संभाळा. जो देवांचा पक्षपाती असेल व ज्याची आकाशांत देखील गति असेल त्यानें आमचा सांभाळ करावा! हे शब्द त्याच्या कानीं पडले.

ते ऐकून कोणी तरी भयभीत झालें असून आपलें रक्षण करण्याविषयीं विनंति करीत आहे, असें समजून राजा

---

नद्यांच्या संगमाजवळ असल्याचें मुळांत वर्णन केलें आहे. [अंक २ चित्रलेखेचें भाषण पहा.] त्यावरून सांप्रत ज्याला प्रयाग अथवा अलहाबाद ह्मणतात तेंच प्रतिष्ठान असावें, ह्याविषयीं कांहीं संशय रहात नाहीं. शालिवाहनाचें प्रतिष्ठान अथवा पैठण हें प्रयागाइतकें प्राचीन नसून त्याची वसाहत सुमारें दोन हजार वर्षांची असावी असें वाटतें.

आपला रथ उभा करून ह्मणाला, 'कोण आहेत ते? आक्रोश करूं नका. कोणापासून तुमचें रक्षण करावें तें सांगा.'

हे शब्द ऐकून रक्षण करा ह्मणणाऱ्या अप्सरा पुढें येऊन त्यांनीं राजाला नमस्कार केला. आणि त्यांतील **रंभा** नांवाची अप्सरा ह्मणाली, 'दैत्यांच्या गर्वापासून आमचें रक्षण करा.'

**पुरूरवा** ह्मणाला, 'दैत्यांच्या गर्वानें तुमचा काय अपराध केला आहे?'

**रंभा** ह्मणाली, 'ऐकावें महाराज. एखाद्याचें तप अधिक आहे असें समजलें तर त्यापासून शंकित झालेल्या इंद्राला—त्याच्या तपाला विघ्न करणारें सुकुमार शस्त्र, रूपानें गर्वित झालेल्या **श्रीगौरी**च्या अभिमानाचा परिहार व स्त्रीसृष्टीचा केवळ अलंकार अशी जी आमची प्रियसखी **उर्वशी** ती **कुबेरा**च्या घरांतून परत जात असतां, एका दानवानें अर्ध्या वाटेंतच **चित्रलेखे**सहवर्तमान तिला आपली बटीक करून नेलें!'

हें ऐकून राजाला मोठा राग आला. तो ह्मणाला, 'तो दुष्ट कोणत्या बाजूनें गेला हें तुह्मांला ठाऊक आहेका?'

**अप्सरा** ह्मणाल्या, 'होहो. ह्या इकडून ईशान्य दिशेनें तो गेला.'

**राजा** ह्मणाला, 'बायांनो, तर तुह्मी आतां दुःखित होऊं नका. तुमच्या प्रियसखीला परत आणण्याविषयीं मी यत्न करतों.'

हें ऐकून **अप्सरा** ह्मणाल्या, 'सोमवंशांत उत्पन्न झालेल्या आपणाला तसें करणें हें योग्यच आहे.'

**पुरूरवा** ह्मणाला, 'बरें, पण तुह्मी माझी वाट पहात कोणत्या ठिकाणीं बसाल? '

हें ऐकून **अप्सरांनीं** त्या पर्वताचें एक शिखर बोटानें दाखवून—ह्या शिखरावर आह्मी आपली वाट पहात बसतों, असें सांगितलें.

इकडे **राजा** त्यांचा निरोप घेऊन सारथ्याला ह्मणाला, 'अरे, या ईशान्य दिशेला अतिशय जलदीनें घोडे चालीव.' हें ऐकून सारथ्यानें—आज्ञेप्रमाणें करतों असें सांगून त्या दिशेला घोडे मोठ्या त्वरेनें हांकले.

रथ अतिशय त्वरेनें चालला होता, त्याची ती गति पाहून **पुरूरवा** सारथ्याला ह्मणाला, 'शाबास शाबास! यावेळीं रथ इतका जलद चालला आहे कीं, त्यावरून पुढें गेलेल्या **गरुडाला** देखिल मी गांठीन! मग **इंद्राचा** अपराध करणाऱ्या त्या दुष्ट दैत्याला गांठीन यांत कांहीं नवल नाहीं. यावेळीं रथाच्या वेगानें चूर्ण केलेजाणारे मेघ पुढें धांवत आहेत. चक्रें इतकीं जलद फिरत आहेत कीं त्यांच्या आरांच्या मध्यभागीं दुसरी एक आरांची पंक्ति आहे कीं काय असें वाटतें. ह्या घोड्यांच्या मानेवरचें अयाळ वायूच्या समान गतीनें जणुं काय त्यांच्या मस्तकावर चौरीच धरली आहे असें दिसतें. तशीच ही पतका दोहों बाजूंनीं वाऱ्याचा सारखा वेग असल्यामुळें अगदीं मधोमध राहिली आहे.' असें बोलत बोलत **राजा** तेथून दूर गेला.

इकडे **अप्सरा** राजाच्या रथाचा वेग पहात उभ्या राहिल्या होत्या. त्यांणीं ज्या ठिकाणीं आपण तुमची वाट पहात बसतों असें राजाला सांगितलें, त्या ठिकाणीं लवकर जाण्याकरितां **सहजन्या** नांवाची अप्सरा आपल्या सोबति-

णीला ह्मणाली, 'अग, हा **राजर्षि** तर आतां फार दूर गेला, तेव्हां आह्मी उगीच येथें उभें राहून काय करणार? ज्या ठिकाणीं आपण त्याची वाट पहाण्याचा संकेत केला आहे त्या शिखरावरच जाऊन बसूंया.'

**मेनका** ह्मणाली, 'गडे, होहो. असेंच करूं.' असें बोलून त्या साऱ्याजणी ज्या ठिकाणीं उभ्या होत्या तेथून संकेत केलेल्या **हेमकूटा**च्या शिखरावर हळूहळू चढून जाऊं लागल्या. तेव्हां **रंभा** आपल्या सख्यांला ह्मणाली, 'अग, तो **राजर्षि** आमच्या हृदयांतला कांटा काढीलना?'

**मेनका** ह्मणाली, 'गडे, याविषयीं तूं अगदीं संशय घेऊं नकोस.'

**रंभा** ह्मणाली, 'तसें नाहींग. ते मेले दानव मोठे दुर्जेय असतात.'

**मेनका** ह्मणाली, 'असले ह्मणून काय झालें? ह्या **राजर्षी**पुढें त्यांचें कांहीं चालणार नाहीं. जेव्हां जेव्हां मोठा लढाईचा प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां प्रत्यक्ष **महेंद्र**देखिल मनुष्यलोकांतून या **राजा**ला मोठ्या बहुमानानें बोलावून आणून देवांला जय प्राप्त होण्याकरितां यालाच फौजेच्या अग्रभागीं पाठवितो. असा हा मोठा पराक्रमी आहे.'

**रंभा** ह्मणाली, 'सर्वथा विजयी होवो ह्मणजे झालें!'

**मेनका** मध्येंच उभी राहून ह्मणाली, 'गड्यांनो! अमंळ दम धरा. हरिणाचा ज्याच्यावर ध्वज लावला आहे असा हा **चंद्रा**नें दिलेला त्याच राजाचा रथ दिसतो आहे पहा! बहुतकरून विजयी झाल्यावांचून तो कधींही इतक्या लवकर मागें फिरावयाचा नाहीं असें मला वाटतें.'

**मेनका** असें सांगत आहे तों इतक्यांत **पुरूरव्याचा** रथ त्यांच्या जवळ येऊन पोंचला. राजानें एका बाजूला **उर्वशी** व दुसऱ्या बाजूला **चित्रलेखा** यांना बसवून घेतल्या होत्या. **चित्रलेखा** भयभीत होऊन तिनें डोळे झांकले होते. **उर्वशी** तर अगदीं बेशुद्ध झाली होती. व राजानें तिला उजव्या हातानें सांवरून धरली होती.

थोडक्याच वेळानें **चित्रलेखेनें** आपलें मन स्थीर करून डोळे उघडले आणि आपली प्रियसखी **उर्वशी** हिला सावध करण्याचा ती प्रयत्न करूं लागली. वरचेवर तिच्या अंगावरून हात फिरवून—गडे **उर्वशि**, तूं असें करतेस त्याच्या योगानें माझा जिव घाबरतो. लवकर सावध हो, सावध हो, असें ह्मणाली.

**पुरूरवाही** **उर्वशीला** सावध करण्याचा प्रयत्न करूं लागला. तो ह्मणाला, 'सुंदरि§, मन स्वस्थ कर. अग भित्रे, दैत्यांचें भय होतें तें गेलें. **इंद्राचा** महिमा साऱ्या त्रैलोक्याचें रक्षण करण्याला समर्थ आहे. तेव्हां रात्र सरतांच कमलिनी जशी कमळाला प्रफुल्लित करिते, तशी तूंही हे आपले विस्तीर्ण नेत्र उघड.'

उभयतांनीं याप्रमाणें प्रयत्न केला तरी **उर्वशी** अगदीं

---

§ राजा पुरूरवा स्त्रैण होता तरी अधर्मकारी नव्हता. उर्वशीशीं त्याचा कांहीं संबंध नसतां एकदम त्यानें तिला सुंदरी कसें ह्मटलें याविषयीं कोणाला शंका येईल; पण वस्तुतः तसें ह्मणण्यांत त्यानें कांहीं गैर केलें नाहीं. उर्वशी ही—देवांची कां असेना; पण बोलून चालून वेश्याच होती व वेश्येला वारवधू (सर्व लोकांची स्त्री) ह्मणतात, तेव्हां पुरूरव्यानें कांहीं अयोग्य केलें असें वाटत नाहीं.

बेशुद्ध पडली होती. वरचेवर बारीक बारीक श्वास येत होते, तेवढ्यावरून मात्र ती जिवंत आहे असें दिसत होतें. ती तिची अवस्था पाहून **चित्रलेखा** ह्मणाली, 'अगबाई! केवळ श्वास येताहेत एवढ्या वरून मात्र जिवंत आहे अशी दिसणारी ही अद्यापि सावध होत नाहीं, याला काय ह्मणावें? '

हें ऐकून **राजा चित्रलेखेला** ह्मणाला, 'ही तुझी सखी फारच भ्याली आहे असें वाटतें. हें पहा, हिच्या विस्तृत स्तनांच्या मध्यभागीं असलेली मंदारपुष्पांची माळ एकसारखी हालत आहे. तीवरून हिच्या उरांत धडकी बसल्याचें व्यक्त होतें.'

**चित्रलेखा** मोठी कष्टी होऊन ह्मणाली, 'अग **उर्वशी,** अजून तरी आपलें मन स्थीर कर. ह्या तुझ्या अशा स्थितीवरून तूं अप्सरा *नव्हेस असें मला वाटतें.'

**राजा चित्रलेखेला** ह्मणाला, 'भयानें हिच्या उरांत

* या वाक्याचा अर्थ उघडच आहे. अप्सरा अर्थात् देवांच्या वेश्या. ह्या अनेक पुरुषांच्या सहवासानें बऱ्याच धीट झालेल्या असल्या पाहिजेत. त्यांला कदाचित् कांहीं प्रसंग आला तर त्याचें भय वाटणें योग्य नाहीं. ज्या दैत्यानें उर्वशीला हरण केली होती त्यानें तिच्या जिवाला कांहीं अपाय केला नाहीं, व तसें करण्याचा त्याचा इरादाही नव्हता. तिच्या अप्रतिम रूपाला मोहित होऊन—अशी सुंदर स्त्री आपल्याला असावी ह्मणून त्यानें तिला नेलें होतें. तर अशा प्रसंगाचें एखाद्या कुलस्त्रियेला भय वाटावें, वेश्येनें तर हे प्रसंग आनंदकारकच मानायचे; तें एकीकडेस राहून उर्वशी भयभीत झाली ह्मणून चित्रलेखेनें तूं अप्सरा नव्हेस असें ह्मटलें.

एकवेळ कांपरें भरलें आहे, तें फुलासारखें सुकुमार अशा हिच्या हृदयाला अद्याप सोडून जात नाहीं. हें कशावरून समजलें असें ह्मणशील, तर स्तनांच्या मध्यभागीं असणारा व केव्हां केव्हां खालींवर होणारा हिचा पदरत्न हें सुचवीत आहे.'

याप्रमाणें राजा आणि **चित्रलेखा** दोघेंही ती सावध होत नाहीं ह्मणून कष्टी झालीं असतां, अकस्मात् **उर्वशी**नें डोळे उघडले व आंग मोडून ती सावध झाली. **उर्वशी** सावध झाली असें पाहून हर्षानें **राजा चित्रलेखे**ला ह्मणाला, '**चित्रलेखे**, दैवानें तुझा हेतु पूर्ण झाला! तुझी प्रियसखी सावध झाली पहा! चंद्र प्रगट होतांच पूर्वी अंधकारानें भरलेली रात्र जशी रिकामी होते, अथवा जिच्यावरचा पुष्कळसा धूर निघून गेला आहे अशी अग्नीची ज्वाला रात्रीं जशी दिसते, तशी ही सुंदरी आतां मनांत असलेल्या मोहापासून मोकळी झाली आहे असें वाटतें. व सांप्रत—उंचावरून आपल्या पात्रांत पतन पावल्याच्या योगानें गढूळ झालेली गंगा जशी हळूहळू निवळ होते, तशी आतां ही हुशार होत आहे असें दिसतें.'

**राजा**चा तिच्याशीं कांहीं परिचय होता असें नाहीं. तथापि ती सामान्यवनिता असल्याकारून तो वर सांगितल्याप्रमाणें एकदम तिची तारीफ करूं लागला. तेव्हां ती कांहीं संकोच मानील ह्मणून **चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे **उर्वशी**, आतां स्वस्थ हो. संकटांत पडलेल्यावर दया करणाऱ्या ह्या महाराजांनीं तुला त्रास देणारे मेले देवांचे शत्रु जे दानव त्यांचा अगदीं पराभव केला.'

हें ऐकून **उर्वशी राजा**कडे पाहून **चित्रलेखे**ला ह्म-

णाली, 'अग, आपलें सामर्थ्य दाखविणाऱ्या प्रतापी **महें-द्रानें** यावेळीं माझा सांभाळ केला आहे का?'

**चित्रलेखा** ह्मणाली, '**महेंद्रानें** नाहीं, पण **महेंद्रासा-**रखा महापराक्रमी अशा राजर्षि **पुरूरव्यानें** यावेळीं तुझें रक्षण केलें आहे.'

**उर्वशी** राजाचें उत्तम रूप पाहून मोहित होऊन ह्मणाली, 'बापड्या त्या दैत्यानें माझ्यावर हल्ला केला हा खरोखर मोठा उपकारच केला, नाहींतर यांचें (पुरूरव्या-चें) दर्शन कोठून झालें असतें!'

जशी **उर्वशी** राजाला पाहून मोहित झाली, तसा राजाही तिला पाहून मोहित होऊन मनांत ह्मणाला, **ना-रायण**ऋषीला भुलविण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व अप्सरा त्या ऋषीच्या मांडीपासून* उत्पन्न झालेल्या हिला ( उर्व-

---

* उर्वशीच्या उत्पत्तीची कथा पुराणांतरीं मोठी चमत्कारिक व-र्णन केली आहे. विष्णूच्या चोवीस अवतारांपैकींच नर आणि नारा-यण हे दोघे ऋषीही अवतार मानले आहेत. असें सांगतात कीं, ते बदरिकाश्रमांत राहून उग्र तपश्चर्या करूं लागले. तेव्हां—हे आपल्या तपाच्या सामर्थ्यानें कदाचित् आपलें पद घेतील ह्मणून, भयभीत होऊन इंद्रानें त्यांच्या तपाला विघ्न करण्याकरितां उत्तमोत्तम अप्सरा तेथें पाठविल्या. अप्सरांनीं इंद्राच्या हुकमाप्रमाणें त्या ऋषीला भुल-विण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ते दोघे ऋषि—अप्सरा अनेक प्रकारचे हावभाव दाखवीत होत्या, तरी एखाद्या पाषाणाप्रमाणें अगदीं निर्विकार होते! शेवटीं उगीच ह्या अप्सरांला श्रम कां द्यावे ह्मणून व इंद्राला आपला वेडेपणा कळून यावा ह्मणून नारायणऋषीनें आपल्या तपाच्या सामर्थ्यानें—त्या सर्व

शीला) पाहून अतिशय लाजल्या, असें सांगतात तें योग्य आहे. अथवा त्या तपस्वी **नारायण** ऋषीनें हिला उत्पन्न केलें हें देखील ह्मणणें मला खरें वाटत नाहीं. कारण— हिला उत्पन्न करण्याच्या कामांत मनोहर प्रकाश करणारा **चंद्र** हाच स्वतः **ब्रम्हदेव** झाला असावा. तसाच शृंगार हाच ज्याचा मुख्य रस आहे असा मदन व वसंत मास हे हिला उत्पन्न करण्याचे पदार्थ झाले असावे. नाहींतर रात्रंदिवस वेदाभ्यास करून जडबुद्धि झालेला व विषय सेवनाचें कौतुक ज्याच्या मनांतून गेलें आहे, असा तो ह्मातारा मुनि (**नारायण**) हें मनोहर रूप कसा उत्पन्न करूं शकेल?

यात्रमाणें उभयतांची **दृष्टादृष्ट** होऊन एकमेकांवर मनहीं बसलें. एका मोठ्या संकटांतून सोडविल्यामुळें **उर्वशी** राजाची फार उपकारी झाली होती. ती **चित्रलेखे**-ला ह्मणाली, 'गडे **चित्रलेखे**, पण त्या आपल्या मैत्रिणी कोठें असतील बरें?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'सखे, मलाग काय ठाऊक? अभय देणाऱ्या ह्या महाराजांला ठाऊक असेल त्या कोठें असतील तें.'

हें ऐकून राजा **उर्वशीकडे** पाहून ह्मणाला, 'तुझ्या सख्या मोठ्या दुःखांत आहेत. असें पहा कीं, हे सुंदरि, सहज ज्याच्या **दृष्टीस** पडून तूं ज्याचे नेत्र सफल केले

---

अप्सरांला आपल्या रूपगुणांनीं लाजवील अशा प्रकारची ही उर्वशी उत्पन्न केली. व त्या ऋषीनें—ही तुह्मांला घेऊन जा ह्मणून सांगितल्यावरून अप्सरांनीं तिला स्वर्गांत आणली.

2

असशील त्याला देखील तुझा वियोग होईल तर तो सहन व्हायचा नाहीं, व तो तुझ्या भेटीविषयीं उत्सुक होईल; मग ज्यांच्याशीं तुझी फार दिवसांची मैत्री अशा तुझ्या सख्या उत्सुक होतील यांत काय आश्चर्य आहे?'

बायकांला सामान्यतः आपली स्तुति फार आवडते. त्यांतून रूपगुणादिकांनीं गर्वित झालेल्या वेश्यांना तर त्याची फारच आवड असते. **राजानें** वर जी तिची स्तुति केली, ती **उर्वशीला** मनापासून आवडली. ती त्याला उद्देशून मनांत ह्मणाली, हें तुझें भाषण केवळ अमृतच आहे. अथवा **चंद्रापासून**‡ अमृत निघालें तर त्यांत काय आश्चर्य आहे? आणि ह्मणूनच माझें हृदय याच्याकडे पहाण्याविषयीं त्वरा करतें.

इतक्यांत तिच्या सख्या **हेमकूट** पर्वतावर उभ्या राहिल्या होत्या त्या दिसल्यां, तेव्हां त्यांच्याकडे बोट दाखवून **राजा उर्वशीला** ह्मणाला, 'हे सुतनु, **हेमकूटाच्या** शिखरावर उभ्या राहिलेल्या ह्या तुझ्या सख्या—ग्रहण लागून त्यापासून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणें तुझ्या मुखाकडे उत्सुक झालेल्या नेत्रांनीं टक लावून पहात आहेत.'

---

‡ चंद्राचें मंडल अमृतमय आहे अशी प्राचीन आर्यलोकांची समजूत आहे; व तो आपल्या प्रकाशानें टवटवी आणतो, तेव्हां ती समजूत केवळ खोटी आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. 'चंद्रापासून अमृत उत्पन्न होण्यांत कांहीं आश्चर्य नाहीं' असें जें उर्वशीनें ह्मटलें त्याचा अभिप्राय इतकाच कीं, पुरूरवा हा प्रत्यक्ष चंद्राचा नातु होय. तेव्हां त्याचें बोलणें अमृत असें ह्मटलें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं, असा अभिप्राय.

हें ऐकून **उर्वशी** आशेनें आपल्या सख्यांकडे पाहूं लागली. तेव्हां **चित्रलेखा** तिला ह्मणाली, 'अग काय पहातेस? '

उर्वशी ह्मणाली, 'समदुःखसुखी झालेल्यांला डोळ्यांनीं प्राशन करतें. '

हें ऐकून **चित्रलेखा** हंसून ह्मणाली, 'अग, कोणाला!* पहातेस? '

**उर्वशी** ह्मणाली, ' नाहीं नाहीं ! मी प्रणयिजनांकडे पहात आहें.'

इकडे **हेमकूटशिखरावर रंभा, राजा** आला हें पाहून हर्षानें ह्मणाली, ' अग, **चित्रलेखे**सहवर्तमान आपली प्रियसखी **उर्वशी** ।हिला घेऊन विशाखासहित† भगवान् चंद्रासारखा दिसणारा हा राजर्षि प्राप्त झाला !'

**मेनका** लक्ष्यपूर्वक तिकडे पाहून ह्मणाली, 'यावेळीं आपल्याला दोन्हीही प्रिय गोष्टी प्राप्त झाल्या आहेत. एक तर आमच्या या प्रियसखीला ( **उर्वशीला** ) परत आणली व ह्या राजर्षीला कोठें कांहीं जखम वगैरेही झाली नाहीं असें दिसतें. तेव्हां हें फार चागलें झालें.'

---

* चित्रलेखेनें असें विचारलें त्यांत कांहीं खुबी होती. तिच्या मनांत ती राजाकडे पहात आहे कीं काय असें आलें होतें.

† विशाखा ह्या नक्षत्राच्या दोन चांदण्या असतात, व त्या चंद्राच्या जवळ दोहों बाजूंला उगवतात. त्यांचें सादृश्य कल्पून रंभेनें वरील भाषण केलें आहे. चित्रलेखा आणि उर्वशी ह्या दोघी दोन चांदण्या व पुरूरवा चंद्र असा तिचा अभिप्राय.

सहजन्या ह्मणाली, 'सखे, बरें बोललीस. ते दानव* मोठे दुर्जय असतात.'

इकडे उर्वशीच्या सख्या ज्या शिखरावर वाट पहात उभ्या राहिल्या होत्या, त्या शिखरावर आपला रथ येऊन पोंचला असें पाहून राजा सारथ्याला ह्मणाला, 'हेंच तें पर्वत शिखर. तर आतां येथें रथ खालीं उतर.' याप्रमाणें राजाची आज्ञा होतांच सारथ्यानें रथ खालीं उतरला.

आकाशांतून जोरानें रथ खालीं उतरूं लागल्यामुळें त्याच्या वेगानें घाबरी होऊन उर्वशीनें राजाला मिठी मारली. त्या तिच्या स्पर्शाचें सुख अनुभवून राजा मनांत ह्मणाला, ओहो! मी इतके दिवस विषयाचा उपभोग करीत आलों त्याचें आज साफल्य झालें. ह्या रथाच्या वेगानें घाबरी होऊन ह्या हरिणाक्षीनें आपल्या अंगानें माझें अंग दाबलें या योगानें अंगावर जे कांहीं रोमांच उभे राहिले आहेत, त्यांच्या मिषानें प्रत्यक्ष कामदेवाचे जणुं काय अंकुरच उत्पन्न झाले, असें वाटतें!

---

* सृष्टीच्या अगदीं प्रथमकालीं, निरनिराळे प्रजापती अथवा प्रजा उत्पन्न करणारे म्हणून जे होते त्यांत कश्यप नांवाचा ऋषि फार मोठा होता. त्यानें असंख्य प्रजा उत्पन्न केल्या, त्या इतक्या कीं, पाहिजे त्या प्राण्याला कश्यप गोत्र लावतां येतें! त्याला अनेक स्त्रिया होत्या. त्यांत अदिती, दिती आणि दनु या नांवाच्या तीन बायका होत्या. अदितीच्या पुत्रांला आदित्य (देव), दितीच्यांला दैत्य व दनूच्या पुत्रांला दानव, असें ह्मणतात. दैत्य आणि दानव दोघेही सारख्या प्रकृतीचे असल्यावरून त्यांच्या नांवाचा विशेष भेद ठेवीत नाहींत. म्हणून आह्मीही त्यांचा भेद मानला नाहीं.

इतक्यांत रथ जमिनीला लागला. तेव्हां उर्वशी चित्रलेखेला ह्मणाली, 'सखे, अंमळ पलीकडे सर.'

यावर चित्रलेखा ह्मणाली, 'पलीकडे सरण्याला मी समर्थ नाहीं.'

रथ अगदीं जमिनीवर आला असें पाहून रंभा इत्यादि अप्सरा आपआपल्यांत ह्मणाल्या, 'आपलें प्रिय करणाऱ्या राजर्षीला भेटून त्याचा सत्कार करूं या.' असें बोलून त्या सर्वही रथाजवळ आल्या.

त्यांला पाहून राजा सारथ्याला ह्मणाला, 'अरे, रथ येथेंच उभा कर. ही सुंदरी (उर्वशी) ऋतुकालाची शोभा वेलीशीं समागम पावते त्याप्रमाणें उत्सुक झालेल्या सख्यांशीं हिचा समागम होईपर्यंत रथ येथून हालवूं नको.'

हें ऐकून सारथ्यानें रथ उभा केला. तेव्हां त्या अप्सरा राजाच्या सभोंवतीं वेढा देऊन मोठ्या उपकारी होऊन ह्मणाल्या, 'सुदैवानें महाराज विजयी झाले, याचें आह्मांला मोठें कौतुक वाटतें!'

राजा ह्मणाला, 'तुह्मीही आपल्या सखीच्या समागमानें सुखी झालां, याचा मला संतोष वाटतो.'

इतक्यांत चित्रलेखेनें हात देऊन उर्वशीला रथावरून खालीं उतरलें. तेव्हां ती आपल्या सर्व मैत्रिणींला ह्मणाली, 'गड्यांनो, मला घट्ट मिठी मारा. पुनः तुमची भेट होईल असें त्यावेळीं मला वाटलें नव्हतें.' हें ऐकून सख्यांनीं तिला आलिंगन दिलें.

आपल्या मैत्रिणीला सोडवून आणल्याबद्दल अतिशय आभारी होऊन मेनका ह्मणाली, 'सर्वथा शंभर कल्पपर्यंत महाराज सर्व पृथ्वीचें राज्य करोत!'

इतक्यांत पूर्वदिशेकडून मोठ्या त्वरेनें कोणाचा रथ येत आहे असें दिसलें. तें पाहून सारथी राजाला म्हणाला, 'आयुष्मन्, हा पहा पूर्वदिशेकडून मोठ्या त्वरेनें इकडेच रथ येत आहे! हा आतां जमिनीवर उभा राहिला. व त्यावरून लखलखीत सोन्याचीं बाहुभूषणें धारण करणारा विद्युल्लतेसह तेजस्वी दिसणाऱ्या मेघासारखा हा कोणी पुरुष ह्या पर्वतशिखरावर येत आहे!'

हें ऐकून सर्व अप्सरा तिकडे पाहूं लागल्या. व त्यांनीं तो **चित्ररथ** नांवाचा गंधर्व येतो आहे असें ओळखलें.

**उर्वशी** ही **इंद्राची** परम आवडती अप्सरा असून तिला दैत्यानें हरण केलीं, हा त्यानें प्रत्यक्ष **इंद्राचाच** उपमर्द केला असें असून, राजा **पुरूरव्यानें** तिला सोडवून घेतलें. हे आपल्यावर मोठे उपकार केले असें समजून त्याच्या कृतज्ञता प्रदर्शनार्थ **इंद्रानें चित्ररथ** नांवाच्या गंधर्वाला§ मुद्दाम **राजाकडे** पाठविलें होतें. तो त्याच्या जवळ येऊन बहुमानपूर्वक म्हणाला, 'प्रत्यक्ष **इंद्र** आभारी होईल अशा आपल्या पराक्रमाच्या महिम्यानें तुमचा उत्कर्ष झाला हें फार चांगलें झालें.'

राजा **पुरूरवा** लढाईच्या वगैरे कांहीं कार्यप्रयोज-

---

§ जसे आपल्या लोकांत वेश्या व त्यांचे साथीदार अथवा आप्त लोक असतात तसेच स्वर्गलोकांतील गंधर्व हे होत. नृत्य गायन वगैरे करितांना अप्सरांची साथ करणें व त्यांच्या संबंधाची मध्यस्थी करणें आणि स्वतः गायन, नृत्य वगैरे करणें हें यांचे मुख्य कर्म असून यांला उपदेव अर्थात् देवांचे चाकर असे प्राचीन ग्रंथकार म्हणतात. चित्ररथ हा सर्व गंधर्वांचा मुख्य अथवा त्यांचा राजा होता असें पौराणिक म्हणतात.

नाच्या निमित्तानें पुष्कळ वेळां इंद्राच्या येथें गेला होता, त्यामुळें चित्ररथाची वरचेवर गांठ पडून उभयतांची चांगली मैत्री झाली होती. त्याला पाहून राजा रथावरून खालीं उतरला आणि—प्रियमित्राचें स्वागत असो! असें बोलून परस्परांनीं एकमेकांच्या हातांत हात दिले.§

चित्ररथ पुरूरव्याला ह्मणाला, 'मित्रा, केशिनांवाच्या दानवानें उर्वशीला पळवून नेलें असें नारदाकडून वर्तमान समजल्यावरून इंद्रानें तिला परत आणण्याकरितां आमच्या गंधर्वांच्या फौजेला हुकूम दिला होता. आह्मी तयारी करून शत्रूवर निघालों तों तूं हिला सोडवून घेतलीस, हें ऐकून आह्मी तहकुबी केली, आणि मी तुला येथें भेटावयास आलों. तर आतां जणुं काय आपल्या जयाची पताकाच, अशा ह्या उर्वशीला पुढें करून आह्मांसहवर्तमान इंद्राच्या भेटीला ये. उर्वशीचें रक्षण केलेंस या निमित्तानें इंद्राचें फारच मोठें प्रिय तूं केलें आहेस. पूर्वीं नारायण ऋषीनें ही इंद्राला नजर पाठविली, ती आज दैत्याच्या हातून सोडवून तूं परम मित्रानें तिला परत इंद्राला दिली असें झालें आहे.'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'छे छे! मित्रा, असें ह्मणूं

---

§ हातांत हात घालण्याची चाल पाश्चात्य लोकांचें अनुकरण करणाऱ्या एतद्देशीयांनीं मुद्दाम प्रचारांत आणली अशी कांहीं लोकांची समजूत आहे; पण ती अगदीं खोटी आहे. फार प्राचीन ग्रंथांत देखील हस्तग्रहाचा प्रकार आढळतो. पूर्वकाळीं हस्तग्रहणाचा लाभ प्रियमित्रालाच मिळत होता व सांप्रत तो पाहिजे त्याला मिळतो इतकेंच कायतें अंतर!

नको. त्याच्या पक्षाचे लोक शत्रूला जिंकतात हा इंद्राचाच प्रभाव आहे. पर्वतांच्या मोठमोठ्या गुहा व्यापणारा सिंहाच्या गर्जनेचा प्रतिशब्द देखील हत्तीला भेवडावून मारतो, हा त्या सिंहाचाच पराक्रम आहे!'

राजाचें हें अतिशय नम्रपणाचें भाषण ऐकून चित्ररथ ह्मणाला, ' असें बोलणें हें तुझ्यासारख्याला योग्यच आहे. लीनता असणें हें पराक्रमी मनुष्याला मोठें भूषण आहे.'

राजा ह्मणाला, ' सख्या चित्ररथा, मला नगराकडे जाण्याची त्वरा आहे. इंद्राची भेट घेण्याची यावेळीं सवड नाहीं. तर ह्या तुमच्या उर्वशीला तूंच इंद्राकडे पोंचव ह्मणजे झालें. '

हें ऐकून चित्ररथ ह्मणाला, 'तुझी मर्जी असेल तर तसें कां होईना. मीच यांना घेऊन जातों ' अप्सरांला ह्मणाला, ' बायांनो, चला लौकर. '

हें ऐकून बाकीच्या अप्सरा जाण्यास निघाल्या. उर्वशी हळूच चित्रलेखेला ह्मणाली, ' अग, उपकार करणाऱ्या ह्या राजर्षीचा निरोप घेण्याला गडे मला फार कठिण वाटतें. तर यावेळीं तूंच माझें तोंड हो आणि त्यांचा निरोप घे. '

हें ऐकून चित्रलेखा राजाच्या जवळ जाऊन मोठ्या नम्रतेनें ह्मणाली, ' महाराज, उर्वशी विज्ञापना करीत आहे कीं, आपण आज्ञा द्याल तर जणूं काय माझी प्रियसखीच अशा आपल्या कीर्तीला देवलोकांत घेऊन जाईन!'

राजाला उर्वशीचा वियोग सहन होत नव्हता, तरी लाजेनें तो ह्मणाला, 'या. पुनः दर्शन देण्याकरितां या.'

याप्रमाणें **राजाची** आज्ञा होतांच त्या साऱ्याजणी अप्सरा आकाशांत उडाल्या. पण **उर्वशीचें** मन **राजा**कडे गुंतल्यामुळें तिचा वेग कुंठित झाल्यासारखा होऊन एका वेलीच्या फांदीला तिच्या गळ्यांतला हार अडकला व ती पुनः खालीं आली आणि ह्मणाली, 'अरेरे! ह्या वेलाला माझा हार अडकला. गडे **चित्रलेखे**, अंमळ येऊन सोडवून घे ग.'

**राजा**कडे तिचें मन घोटाळतें आहे, असें पाहून **चित्रलेखा** हंसून ह्मणाली, 'अगबाई! हा हार अगदीं घट्ट बसला आहे. गडे **उर्वशि**, ह्याला सोडवून घेणें फार कठीण आहे!'

हें ऐकून **उर्वशी** तिच्या बोलण्याचा अर्थ समजली. हाराचें केवळ निमित्त आहे. तिचें मनच **राजा**कडे गुंतलें आहे; ह्मणून **चित्रलेखा** मोठ्या खुबीनें तें तुझें मन सोडवून घेणें फार कठीण आहे असें ह्मणाली, तें समजून **उर्वशी** ह्मणाली, 'यावेळीं थट्टा करूं नको. लवकर सोडवून घे.'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे, खरोखरच ग सोडवून घेणें कठीण आहे; तथापि कशी तरी सोडवितें.'

तिनें आपल्या मनांतला हेतु जाणला, हें पाहून **उर्वशी**ला देखील हसूं आलें. ती ह्मणाली, 'प्रियसखे **चित्रलेखे**, आतां काय बोलते आहेस त्याची चांगली आठवण असूंदे हं.'

राजाला तिचें अदर्शन असह्य होतें. हार अडकल्याच्या निमित्तानें तिचें पुनः दर्शन झालें, हा एक मोठा लाभच

झाला असें समजून त्या वेलाला उद्देशून मनांत ह्मणाला, ‘ हे वेला, हिच्या जाण्याला क्षणभर विघ्न करणाऱ्या त्वां यावेळीं खरोखर माझें मोठें प्रिय केलेंस. कारण तूं तसें केल्यामुळें विशालनयना ही मागें तोंड फिरविलेल्या स्थितींत पुनः माझ्या दृष्टीस पडली! ’

इकडे **चित्रलेखेनें** तिचा हार अडकला होता तो सोडविला. तरी **उर्वशी राजा**कडे पहात होत्साती मुस्कारे टाकीत आपल्या सख्या वर कशा उडून जात आहेत हें पहात उभी राहिली.

राजानें त्या **केशि**नांवाच्या दैत्याचा पराभव करण्याकरितां वायव्यास्त्र सोडलें होतें, तें त्या दैत्याचा नाश करून परत **राजा**च्या भात्यांत प्रवेश करण्याकरितां आलें. तें पाहून सारथी ह्मणाला, ‘महाराज, इंद्राचा ज्यांनीं अपराध केला आहे अशा दैत्यांला क्षार समुद्रांत फेंकून देऊन हें वायव्यास्त्र, नाग आपल्या बिळांत प्रवेश करतो, त्याप्रमाणें परत तुमच्या भात्यांत शिरलें आहे. ’

अप्सरा जावयाला निघाल्या, तेव्हां आतां येथें रहाण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं, असें पाहून **राजानें** सारथ्याला रथ आपल्या पुढें आणण्यास सांगितलें व त्याप्रमाणें पुढें येतांच तो रथावर बसून जाण्यास तयार झाला.

इकडे आकाशमार्गानें जायला निघालेली **उर्वशी** राजाकडे आशाभूत दृष्टीनें पहात होत्साती ह्मणाली, ‘उपकार करणाऱ्या ह्याला ( **राजा**ला ) पुनः मी पाहीन काय?’ असें बोलून गंधर्वांसहवर्तमान ती निघाली.

राजा तिच्या मार्गाकडे तोंड करून फार वेळ पहात उभा

राहिला होता. तो ह्मणाला, 'काय चमत्कार आहे कोणास ठाऊक! हा मदन दुर्लभ वस्तूवर अभिलाष करतो. ही (उर्वशी) माझें मन बळजबरीनें ओढून घेऊन आकाशांत उडाली. जशी राजहंसी ज्याचा शेवट तुटला आहे असें कमलाचें सूत त्याच्या देंठापासून ओढून घेते, तशी ही अप्सरा माझ्या मनाला ओढून नेत आहे.'

---

# भाग दुसरा.

पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें **उर्वशीला** दैत्यांपासून सोडवून तिच्या रूपगुणांनीं मोहित झालेला **राजा,** ती स्वर्गलोकाला गेल्यामुळें उदास होऊन निरुपायास्तव परत आपल्या नगरांत आला. **उर्वशीनें** त्याचें मन हरण केल्यामुळें **राजा** अगदीं अस्वस्थ झाला होता. सर्वकाळ तिच्याकडे त्याचें लक्ष्य लागलें होतें. प्रधानादिकांच्या आग्रहावरून तो राजकार्यें पहात होता, तरी तिकडे लक्ष्य नव्हतें. त्याचें शरीर देखील अस्वस्थ झालें होतें.

**उर्वशीच्या** संबंधानें त्याच्या मनांत जे अनेक विचार घोळत होते, ते कोणास सांगण्यास देखील त्याला लाज वाटत होती. **माणवक** नांवाचा एक ब्राह्मण त्याचा नर्मसचिव ( खुषमस्कऱ्या ) होता. त्यानें अस्वस्थतेचें कारण विचारल्यावरून **राजानें** झालेली सर्व हकीगत त्याला सांगितली. कारण एखादी गोष्ट आपले मनांत सर्वकाळ घोळत असली, तर ती आपले प्रियमित्राला सांगितल्यावांचून रहावत नाहीं. **माणवक** हा त्याचा परम विश्वासू मित्र असून त्याच्या जवळ कांहीं पडदा ठेवण्याचें कारण नाहीं; ह्मणून **राजानें** ही गुह्य गोष्ट त्याला सांगितली.

**माणवक** हा बोलून चालून भटोबा असून खुषमस्कऱ्याच होता. **राजानें** सांगितलेली गुप्त गोष्ट त्याच्या मनांत फारवेळ टिकली नाहीं. तो त्याच्याकडून निघाला आणि राजवाड्यांत इकडे तिकडे संचार करीत होता. तो आपल्याशींच ह्मणाला, अरे बापरे! एखादा श्राद्धाला सांगितलेला

ब्राह्मण गळ्याकडे येई तों खीर खाऊन तट्ट फुगतो, तशी माझी अवस्था झाली आहे. **राजानें** सांगितलेल्या त्या गुप्त गोष्टीनें जणुं काय माझें पोट फुटत आहे. आणि येथें तर पुष्कळ मंडळी बसली आहे. माझ्यानें आपली जीभ कांहीं आवरवत नाहीं. तर कचेरींत बसलेला **राजा** हिकडे येई-पर्यंत मनुष्यांचा विशेष जेथें संचार नाहीं, अशा ह्या दे-वळाच्या मुखशाळेवर जाऊन बसतों, असा विचार करून **माणवक** त्या मुखशाळेंत जाऊन बसला.

**राजाचें** चित्त अस्वस्थ झालें आहे, ही गोष्ट त्याची पट्टराणी **काशिराज**दुहिता **वसुमती** हिच्या तेव्हांच ल-क्ष्यांत आलें. तिनें विचारून पाहिलें; पण अस्वस्थतेचें खरें कारण तिला सांगण्यासारखें नव्हतें; ह्मणून **राजानें** तिला सांगितलें नाहीं.

नवऱ्याचें चित्त अस्वस्थ झालें तर बायकांला त्याविषयीं मोठी काळजी लागणें अगदीं साहजिक आहे. त्यांतून हे राजश्री (**पुरूरवा**) पडले रंगेले. अस्वस्थ होण्यासारखें दुसरें कांहींच योग्य कारणही नाहीं. तेव्हां **वसुमतीला** फारच काळजी लागली, व कोणातरी स्त्रीवर स्वारीचें मन आसक्त झालें आहे असा तिनें तर्क बांधला.

**निपुणिका** नांवाची तिची एक विश्वासू दासी होती. **राजाचें** मन अस्वस्थ होण्याचें कारण काय त्याचा खुलासा काढण्याचें काम राणीनें तिला सांगितलें. व **माणवक** हा त्याचा खुषमस्कऱ्या आहे, त्याला कदाचित् कांहीं माहीत असेल तर त्याच्याकडून याचा अंत काढ, असें सांगून तिनें दासीला **माणवकाकडे** पाठविलें. ती त्याचा शोध करीत करीत त्या देवळाजवळ आली आणि मनांत ह्मणाली, त्या

मेल्या माकडाला (माणवकाला) आतां पहावा तरी कोठें! आणि आह्मी त्याची वरचेवर थट्टा करतों, तेव्हां तो माझ्याशीं सरळ बोलेल याचा देखील नेम नाहीं. पण मी कसें तरी त्याचें मन वळवून घेऊन त्याच्याकडून हें गुप्त वर्तमान समजून घेईन. गवताच्या काडीवर पडलेल्या दवाच्या थेंबाप्रमाणें तें गुप्त वर्तमान त्याच्या पोटांत मुळींच फार वेळ रहायचें नाहीं असें वाटतें!

असा विचार करीत करीत ती त्याला शोधते आहे, तों मुखशाळेवर बसलेला **माणवक** अकस्मात् तिच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून **निपुणिका** ह्मणाली, हा चित्रांत काढलेल्या वानरासारखा आपल्याशींच कांहीं फुटफुटत बसला आहे, तर आतां याच्याजवळ जाऊन गोड गोड बोलून याला आधीं आपलासा करून घेतला पाहिजे. असा विचार करून **निपुणिका माणवकाच्या** जवळ गेली, आणि तिनें त्याला नमस्कार केला.

**माणवकानें**—तुझें कल्याण असो! ह्मणून तिला आशीर्वाद दिला. आणि मनांत ह्मणाला, ह्या दुष्ट बटकीला पाहून ती गुप्त गोष्ट माझें पोट फोडून बाहेर निघते आहे काय असें वाटतें! दासीला ह्मणाला, 'अग **निपुणिके**, राणीसहवर्तमान संगीतांत निमग्न असावयाचें सोडून यावेळीं तूं इकडे कोठें निघाली आहेस?'

**निपुणिका** ह्मणाली, 'राणीसाहेबांच्या आज्ञेनें तुमच्याच भेटीला आलें.'

**माणवक** ह्मणाला, 'त्या तुझ्या राणीनें काय सांगितलें आहे?'

**निपुणिका** ह्मणाली, 'बाईसाहेब ह्मणाल्या, तुमची

आतांशीं माझ्यावर अगदीं दया नाहीं. कारण मला असह्य वेदना होत असून मी अशी दुःखित आहें, तरी तुह्मी माझ्याकडे पहात देखील नाहीं.'

**माणवक** ह्मणाला, 'अग **निपुणिके**, राणीला इतकें दुःख व्हायला काय झालें? माझ्या प्रियमित्रानें (**राजानें**) कांहीं तिचें अप्रिय केलें काय?'

**माणवकानें** असें विचारतांच **निपुणिकेला** फार चांगली संधि मिळाली. **राजा उर्वशीविषयीं** फार उत्कंठित झाला होता, तरी तो आपल्या मनांतली अस्वस्थता कोणालाही न कळण्याविषयीं विशेष खबरदारी घेत होता. स्वप्नांत देखील त्यानें कधीं **उर्वशीचें** नांव घेतलें किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें तिच्यावरचा अनुराग व्यक्त केला, असें मुळींच नव्हतें. तथापि त्या धूर्त **निपुणिकेनें माणवकाकडून** खरी गोष्ट काढून घेण्याकरितां मुद्दाम खोटेंच सांगितलें. ती ह्मणाली, 'महाराजांनीं दुसरें कांहीं केलें नाहीं; पण जिच्याकरितां ते इतके उत्कंठित झाले आहेत, त्या स्त्रीच्या नांवानें सहज त्यांनीं बाईसाहेबांला हाक मारली.'

हें त्या छटेल दासीचें सांगणें बिचाऱ्या त्या भोळ्या ब्राह्मणाला खरें वाटलें. तो ह्मणाला, 'वाहवा! आमच्या मित्रानें (**राजानें**) आपण होऊनच ती गुप्त गोष्ट उघड केली. तेव्हां आतां मी ब्राह्मण आपली जीभ आवरण्यास कसा समर्थ होईन!' दासीला ह्मणाला, 'अग **निपुणिके**, त्यानें (**राजानें**) काय **उर्वशीचें** नांव घेऊन राणीला हाक मारली?'

हें ऐकून **निपुणिका** मनांत ह्मणाली, माझें काम झालें;

तरी पण ह्या भटोबाकडून आणखी मिळेल तितका खुलासा काढला पाहिजे. **माणवकाला** ह्मणाली, 'आर्या, ती **उर्वशी** ह्मणतात ती कोण?'

**माणवक** ह्मणाला, 'अग, **उर्वशी** नांवाची एक अप्सरा आहे. तिचें दर्शन झाल्यापासून त्याला (**राजाला**) उन्माद चढल्या सारखा झाला आहे, व त्यामुळें केवळ तुझ्या धनिनीलाच दुःख देतो असें नाहीं, तर मला गरीब ब्राह्मणाला देखील फार पीडा देतो. मला कांहीं खाऊं देत नाहीं, किंवा पिऊं देत नाहीं. सारावेळ आपल्या त्याच गोष्टी चालल्या असतात.'

हें ऐकून दासी मनांत ह्मणाली, महाराजाच्या गुप्त गोष्टरूपी किल्ल्याला मी खिंड पाडली, तर आतां हें वर्तमान बाईसाहेबांला जाऊन सांगावें. असा विचार करून ती जाऊं लागली.

तेव्हां **माणवक** तिला ह्मणाला, 'अग **निपुणिके**, राणी **वसुमतीला** सांग कीं, प्रिय मित्राला (**राजाला**) **उर्वशी** समागमरूप मृगतृष्णेपासून निवृत्त करतां करतां मी तर अगदीं थकून गेलों आहें. तुझें मुखकमल पाहिल्यावर कदाचित् त्याचा तो नाद सुटला तर सुटेल.'

राणी **वसुमतीनें राजाचें** मन वळविण्याविषयीं किती प्रयत्न केले होते ते **माणवकाला** माहीत नव्हते. त्यानें सांगितलेला निरोप ऐकून **निपुणिका** ह्मणाली, 'तुह्मी ह्मणतां तें बाईसाहेबांला सांगतें. मला लवकर परत गेलें पाहिजे. तर आतां येतें.' असें सांगून **निपुणिका** निघून गेली.

इकडे **राजा** सभेंत बसून कामकाज पहात होता, तों

सायंकालचा समय झाला असून कचेरी बरखास्त करण्याची वेळ झाली असें पाहून **राजाला** सूचना करण्याकरितां भाट ह्मणाले, 'महाराजांचा जयजयकार असो! लोकांच्या अंतापर्यंत ह्या प्रजांची तमोवृत्ति* ज्यानें नाहींशी केली आहे असा सूर्य, आणि आपण या उभयतांचा अधिकार व उद्योग एक सारखाच आहे असें आह्मांस वाटतें. आपणा दोघांतून तेजाचा अधिपति भगवान् सूर्य आतां क्षणभरच आकाशांत रहाणार आहे, तेव्हां सरकार आपणही दिवसाच्या या सहाव्या† भागांत विश्रांति घ्यावी, अशी विनंति आहे.'

हें ऐकून **राजानें** कचेरी बरखास्त केली. कामाकडे लक्ष्य लागल्यामुळें कचेरीच्या वेळांत त्याचें मन अंमळसें स्थिर होतें; पण कचेरी बरखास्त करतांच पुनः **उर्वशी** त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहून तिनें त्याचें मन अस्वस्थ केलें. अशा वेळीं कांहीं तरी कर्मणूक करून वेळ घालविणारा काय तो त्याचा प्रियमित्र **माणवक**. तेव्हां **राजा** कचेरींतून उठतांच **माणवकाकडे** येण्यास निघाला.

इकडे **माणवक** कचेरी बरखास्त होण्याची वाटच

---

* या शब्दांत श्लेष आहे. तमोवृत्ति या शब्दानें अज्ञानावस्था, व अंधकारावस्था, या दोहोंचेंही ग्रहण करतां येतें. राजपक्षीं अज्ञान व सूर्यपक्षीं अंधकार घ्यावा.

† धर्मशास्त्रकारांनीं सामान्यतः दिवसाचे सहा काल अथवा भाग कल्पना करून प्रत्येक भागांत निरनिराळीं कर्मे करावयास सांगितलीं आहेत. सहावा भाग अर्थात् सायंकाळ ही काम करण्याची वेळ नसून अंमळ विश्रांति अथवा संध्यावंदनादि कर्मे करण्याची वेळ आहे, असें भाटांनीं सुचविलें.

पहात होता. भाटांनीं संध्याकाळ झाल्याचें मोठ्यानें पुकारलें, तें ऐकून—**राजा** आतां मोकळा झाला, असें समजून **माणवक** त्या देवळाच्या मुखशाळेवरून खालीं उतरला, आणि राजा येण्याच्या वाटेवर उभा राहिला; तों **राजा** त्याच्या दृष्टीस पडला. **राजाला** पाहतांच—कचेरी बरखास्त करून स्वारी इकडेच येत आहे तर आपण अंमळ त्याच्याकडे पाठ करून उभें रहावें, असा विचार करून मुद्दाम **राजाकडे** न पाहतां **माणवक** तिकडे पाठ करून उभा राहिला.

इतक्यांत **राजा** तेथें येऊन त्यानें त्याच्या पाठीवर थाप मारली आणि दोघांची भेट झाली.

**माणवकानें**—तब्यत कशी काय आहे असें विचारलें तेव्हां **राजा** ह्मणाला, 'ती देवलोकची सुंदरी (**उर्वशी**) ज्यावेळीं माझ्या प्रथमच दृष्टीस पडली, तेव्हां पासून ज्याचा प्रहार कधींही फुकट जायचा नाहीं, अशा मदनाच्या बाणानें ज्याला भोंक पाडलें आहे अशा माझ्या हृदयांत ती शिरली आहे.'

**राजाच्या** बोलण्याचें कांहीं उत्तर न देतां **माणवक** ह्मणाला, 'आपली ती **काशिराज**दुहिता राणी **वसुमती** खरोखर फार दुःखित झाली आहे.'

हें ऐकून यानें कांहीं तरी इकडची हकीकत तिला सांगितली असेल असें समजून **राजा** ह्मणाला, 'अरे, पण तुझ्याजवळ जी मी एक गुप्त गोष्टीची ठेव ठेवली आहे तिचें तूं चांगलें रक्षण करीत आहेसना?'

हें ऐकून **माणवक** मनांत ह्मणाला, काय सांगावें!

ती वटकीची पोर **निपुणिका** तिनें मला फसविलें. नाहीं तर यानें (राजानें) मला असें कां विचारलें असतें? असें बोलून **माणवकानें** आपली जीभ घट्ट धरली.

**राजा** ह्मणाला, 'अरे, तूं असा उगी कां राहिलास? मी विचारलें त्याचें उत्तर कां सांगत नाहींस?'

**माणवक** ह्मणाला, 'अरे, मी आपली जीभ अशी घट्ट धरिली आहे कीं, जिच्या योगानें तुला देखील उत्तर मिळत नाहीं!'

हें ऐकून **राजाला** असें वाटलें कीं, खरोखरच यानें ती गोष्ट कोणाला सांगितली नसेल. तो ह्मणाला, 'चांगलें केलेंस. बरें पण, आतां आपल्या मनाची कर्मणूक कशानें करावी?'

**माणवक** पोटावरून हात फिरवून ह्मणाला, 'स्वयंपाक घरांत जाऊंया ह्मणजे झालें!'

**राजा** ह्मणाला, 'तेथें काय आहे?'

**माणवक** ह्मणाला, 'काय ह्मणजे? तेथें पंचपक्वान्नांचें सर्व सामान तयार केलेलें असून पक्वान्नें करण्याची योजना चालली असेल. तें कसें काय करतात तें पहात बसलों ह्मणजे उत्कंठित झालेल्या मनाची कर्मणूक करतां येईल!'

**राजा** ह्मणाला, 'तेथें तुला पाहिजे तें दृष्टीस पडेल यामुळें तुझ्या मनाची कर्मणूक होईल; पण दुर्लभ वस्तूची प्रार्थना करणाऱ्या मीं आपली कर्मणूक कशी करून घ्यावी!'

**माणवक** ह्मणाला, 'खरोखर तूंही आपल्या त्या उर्वशीच्या दृष्टीस पडला आहेसना?'

**राजा** ह्मणाला, 'होय. मग त्यापासून काय होणार?'

**माणवक** ह्मणाला, 'तर मग ती आतां दुर्लभ आहे असें वाटत* नाहीं.'

**राजा** ह्मणाला, 'उत्तम लावण्याचा तरी तिच्यावर मोठा अलौकिक पक्षपात आहे.'

**माणवक राजाला** हंसविण्याकरितां ह्मणाला, 'तूं असें ह्मटलेंस यावरून मला अधिक कौतुक वाटतें. तुझी ती **उर्वशी** अत्यंत सुंदर आहे ह्मणतोस, तर जसा मी अद्वितीय कुरूप आहें, तशीच का ती अद्वितीय सुंदर आहे?'

**राजा** ह्मणाला, 'वेड्या **माणवका**, काय सांगूं! तिच्या प्रत्येक अवयवाचें वर्णन करणें फारच कठीण आहे असें समज. ह्मणून मी तुला संक्षेपतः सांगतों तें ऐक.'

**माणवक** ह्मणाला, 'अहो, आमची स्वारी ऐकायला तयारच आहे.'

**राजा** ह्मणाला, 'अरे, ती भूषणाचें भूषण आहे. चटिपटीची विशेष चाटिपटी आहे. तिचें शरीर सौंदर्याच्या संबंधानें ज्याची उपमा द्यावयाची त्याचेंही उपमान† आहे.

**माणवक** ह्मणाला, 'हो, ह्मणूनच दिव्य रसाचा अभिलाष करणाऱ्या त्वां इतरांला वर्ज करून चातकाचें व्रत घेतलें आहेस असें वाटतें. बरें पण, तूं आतां कोणीकडे निघालास?'

---

* माणवकाच्या बोलण्याचा असा अभिप्राय कीं, ज्यापेक्षां तूं इतका सुंदर आहेस त्यापेक्षां जसा तूं तिला पाहून भुललास तशी तीही तुला पाहून भुललीच असेल व त्यामुळें ती दुर्लभ आहे असें नाहीं.

† 'उपमान' म्हणजे ज्याची उपमा द्यावयाची ती वस्तु.

**राजा** ह्मणाला, 'उत्सुक झालेल्या मनुष्याला एकांत स्थलावांचून दुसरी गति नाहीं. तर तूं मला आतां प्रमद-वनांत घेऊन जा.'

**माणवका**च्या मनांत यावेळीं तिकडे जायाचें नव्हतें; पण राजानें चल ह्मटल्यावरून निरुपायास्तव—असे इकडून या ह्मणून त्यानें त्याला प्रमदवनाकडे नेलें.

उभयतां प्रमदवनाच्या जवळ पोंचले, तेव्हां **माणवक** ह्मणाला, 'हा पहा, प्रमदवनाचा तट दिसतो आहे. यावेळीं तूं येथें आलास ह्मणून झाडांला नम्र करून हा दाक्षिणवायु सामोरा येऊन त्यानें तुझा सत्कार केला आहे.'

**राजा** कामी झाला होता. कामी पुरुषाला प्रत्येक गोष्टींत त्याच्या मनांत जें असतें तेंच दिसतें. **माणवका**-चें भाषण ऐकून **राजा** बागेकडे पाहून ह्मणाला, 'ह्या वायूला तूं विशेषण दिलेंस तें योग्य आहे. हा मोगरीच्या वेलाची शोभा वाढवीत आहे. कुंदाच्या वेलीला जणुं काय नाचवीतच आहे. यावरून एकीकडे स्नेह आणि एकीकडे अनुकूलता हीं दाखवीत असल्यामुळें तो कामी पुरुषासारखा दिसतो.'

हें ऐकून **माणवक** मनांत ह्मणाला, याचा (**राजाचा**) अभिनिवेश योग्यच आहे. उभयतां असें बोलत बोलत त्या प्रमदवनाच्या दरवाज्यांत येऊन पोंचले. तेव्हां **राजानें** **माणवकाला** आधीं आंत घालून मग आपण प्रवेश केला.

वस्तुतः अस्वस्थ झालेल्या मनाला शांत करण्याकरितां ह्मणून तो त्या बागेंत गेला होता; पण बागेची शोभा पाहून त्याला फारच त्रास झाला. तो ह्मणाला, 'गड्या

माणवका, अरे चित्ताच्या अस्वस्थतारूप आपत्तीचा परिहार करावा ह्मणून ह्या बागेंत प्रवेश करण्याचा विचार मनांत आणला होता; पण हें तर उलटच झालें. ही बाग माझ्या मनाला शांति देण्याला कारण होत नाहीं. नदीच्या प्रवाहांतून वहात असलेला मनुष्य पाण्याच्या गतीच्या उलट—मोठ्या जोरानें पोहत असला तरी त्याचा काय उपयोग?'

माणवक ह्मणाला, 'तें कसें बरें?'

राजा ह्मणाला, 'ऐक. हें माझें मन दुष्प्राप्य वस्तूची आशा करीत असून कांहीं केल्या त्यापासून निवृत्त होत नाहीं. तशांत ह्याला आधींच मदन अगदीं क्षीण करीत आहे, अशा वेळीं दक्षिणेकडच्या सुगंधि वायूनें ज्यांचीं पांढरीं दिसणारीं कोंवळीं पानें उडविलीं आहेत, अशा ह्या बागेंतल्या उत्तम आंब्याच्या वृक्षांनीं मोहोर प्रकट केलेला पाहून माझ्या मनाची कशी शांति होईल!'

माणवक ह्मणाला, 'असे विलाप करूं नकोस. मनोरथ पूर्ण करणारा मदनच लवकर तुझें साह्य करील.'

राजा ह्मणाला, 'बरें बोला! हें ब्राह्मणाचें वचन मी आपल्या पदरांत बांधतों.' असें बोलून उभयतां बागेंत शिरले.

तेव्हां माणवक ह्मणाला, 'नुकताच वसंत ऋतु प्रवृत्त झाल्यामुळें ह्या प्रमदवनाला कशी शोभा आली आहे ती पहा.'

राजा ह्मणाला, 'खरोखर मी चांगलें लक्ष्यपूर्वक पाहतों. हें पहा, येथें स्त्रियांच्या नखामारखें पांढरें असून किंचित् आरक्त दिसणारें व दोहों बाजूंला किंचित् काळसर असें कोरांटीचें फूल दिसत आहे. तसेंच ह्या लहानशा

अशोकाचें लाल झाल्यामुळें सुंदर दिसणारें फूल उंवलायला झालें आहे. बारीक बारीक कणांच्या पुढें लागलेले रजःकण काळसर दिसताहेत, अशी ही नुकतीच आलेली आंब्याची मंजरी पहा. यावेळीं ही वसंतलक्ष्मी बाल्य आणि तारुण्य या अवस्थांच्या मध्ये आहे असें दिसतें.'

**राजा** एका नादांत गुंग असल्यामुळें तो वसंतलक्ष्मीचेंच वर्णन करीत होता; पण बिचाऱ्या **माणवकाचे** पाय दुखूं लागले. त्याच्या मनांत कोठें तरी बसायचें होतें. इतक्यांत एक बटमोगऱ्याच्या वेलीचा सुंदर मंडप दृष्टीस पडला. त्याला पाहून **माणवक** ह्मणाला, 'हा पहा नीळमण्याची शिला जेथें बसविली आहे असा हा बटमोगरीचा मंडप भ्रमरांच्या समुदायानें खालीं पाडलेल्या पुष्पांनीं जणुं काय तुझी पूजाच करीत आहे, असा दिसतो. तर क्षणभर येथें विश्रांति घेऊन याच्यावर आपण अनुग्रह करावा.'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'तुझी इच्छा असली तर तसें कां होईना? ' असें बोलून दोघेही त्या लतामंडपांत जाऊन बसले.

नंतर **माणवक** ह्मणाला, 'मित्रा, आतां बसला आहेसना येथें ह्या सुंदर वेलींचे रमणीय चाळे पाहून **उर्वशीची** तुला उत्कंठा लागली आहे ती कशी तरी तूं आपली पुरी करून घे. '

हें ऐकून **राजा** सुस्कारा सोडून ह्मणाला, 'ज्यांना पुष्कळ फुलें आलीं आहेत, व ज्यांच्या ढाप्या नम्र झाल्या आहेत अशाही ह्या बागेंतल्या वेली पाहून त्या **उर्वशीचें** सौंदर्य अवलोकन करण्याचें ज्यांला वेड लागलें आहे

असे हे डोळे तृप्त होत नाहींत. तर कांहीं तरी असा उपाय शोधून काढ कीं, ज्याच्या योगानें माझा हेतु सफल होईल.'

हें ऐकून **माणवक** हंसून ह्मणाला, 'पूर्वीं अहल्येची इच्छा करणाऱ्या **इंद्राला** वज्र साह्यकारी होतें, आणि यावेळीं **उर्वशी**विषयीं उत्सुक झालेला जो तूं त्या तुझा मी साह्यकारी झालों आहें. वस्तुतः तुह्मी दोघेही उन्मत्त आहां!'

**राजा** ह्मणाला, 'तें असो. तूं कांहीं उपाय शोधून काढीत नाहींस का?'

हे ऐकून **माणवक** डोळे झांकून ध्यानस्थ बसून **राजाला** ह्मणाला, 'हा पहा, मी आतां उपाय चिंतन करीत बसलों आहें. पुनः कांहीं तरी विलाप करून माझा समाधिभंग मात्र करूं नकोस.' इतक्यांत उजवा डोळा लवला, हें शुभ निमित्त पाहून मनांत ह्मणाला, अरे, एकून मी मसलत करणारा आहें खरा.

**माणवक** उपाय शोधून काढण्याविषयीं ध्यान करीत आहे असें पाहून **राजा** ह्मणाला, 'ती पूर्णचंद्रमुखी **उर्वशी** प्राप्त होणें कठीण आहे. कामानें वेडा झाल्यामुळें मी ह्या कांहीं तरी चेष्टा करीत आहें. जेव्हां इच्छित हेतूची सिद्धि सन्मुख असते, तेव्हां मन एकाएकीं आपोआप तृप्त होतें.' असें बोलून तो मदनानें उत्सुक झाला.

त्यानें वरील वाक्य तोंडांतून काढलें, इतक्यांत **उर्वशी** आणि **चित्रलेखा** विमानांत बसून तेथें प्राप्त झाल्या. जसा राजा **पुरूरवा उर्वशीच्या** दर्शनानें मोहित होऊन उत्सुक झाला होता, तशीच तीही **राजाला** मोहित

होऊन उत्सुक झाली होती. **राजाचा** निरोप घेऊन **इंद्रा**च्या आज्ञेप्रमाणें ती देवलोकांत गेली, तरी तेथें तिला चैन पडली नाहीं. सर्वकाल **राजाचें** चिंतन करीत होती. एकवेळ **राजाला** पाहून आपल्या मनाचें समाधान करावें, ह्मणून ती आपली प्रियसखी **चित्रलेखा** हिच्या सहवर्तमान यावेळीं विमानांत बसून तेथें आली.

ती विमानांत बसून निघाली तरी कोणीकडे जायचें हें तिनें कांहींच सांगितलें नव्हतें, ह्मणून **चित्रलेखा** तिला ह्मणाली, 'गडे **उर्वशी,** कांहीं कार्याचा उद्देश नसतां असें उगीच कोणीकडे जायचें? '

**राजाचें** चिंतन करून मदनानें व्यथित झालेली **उर्वशी** लाजून ह्मणाली, 'सखे, हेमकूटपर्वताच्या शिखरावर माझ्या गळ्यांतली माळ वेलीला अडकली आणि मी तुला ती सोडीव ह्मणून सांगितलें, तेव्हां तूं हंसून ह्मणालीस— ती घट्ट बसली आहे, सोडवतां येणार नाहीं. आणि यावेळीं ' कांहीं काम नसतां उगीच कोठें जायचें? ' ह्मणून विचारतेस हें काय? '

**चित्रलेखा** तिच्या बोलण्याचा मतलब समजून ह्मणाली, 'तर काय त्या राजर्षि **पुरूरव्याकडे** निघालीस? '

**उर्वशी** ह्मणाली, 'होय होय. हा माझा निर्लज्जपणाचा उद्योग आहे! '

**चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे, तथापि हें ऐकून घे. तूं आधीं कोणाला तेथें पाठविलें आहेस का? '

**उर्वशी** ह्मणाली, 'दुसऱ्या कोणाला पाठविणार? मनालाच पाठविलें आहे! '

**चित्रलेखा** ह्मणाली, 'तुला तिकडे कोण जा ह्मणत आहे?'

**उर्वशी** ह्मणाली, 'आणखी कोण ह्मणणार? प्रत्यक्ष मदनच मला तिकडे जा ह्मणून सांगत आहे!'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'तर मग यावर माझें कांहींच बोलणें नाहीं.'

थोड्या दिवसां पूर्वी **केशिदैत्यानें** तिला वाटेंत पळवून नेली होती, त्या गोष्टीचें तिला अजून विस्मरण झालें नव्हतें, ह्मणून **उर्वशी** ह्मणाली, 'तर मला आतां तिकडे घेऊन चल आणि कांहीं विघ्न न येईल अशी वाट काढ.'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे, स्वस्थ हो. भगवान् देवगुरु **बृहस्पति** यांनीं शिखाबंधिनी* नांवाची विद्या आपल्याला सांगितली आहे. तिच्या योगानें आह्मी देवांचे शत्रु दैत्य इत्यादि यांला अलंघनीय झालों आहों.'

**केशिदैत्यानें उर्वशीला** पळवून नेलें व त्या दोघी अप्सरांला तर वरचेवर बाहेर जाण्याचा प्रसंग येतो, तेव्हां पुनः आणखी तसें संकट न यावें ह्मणून देवगुरु **बृहस्पति** यानें **उर्वशी** आणि तिची सखी **चित्रलेखा** या दोघींला ती शिखाबंधिनी विद्या सांगितली होती; पण **उर्वशीचें** मन **पुरूरव्याकडे** वेधल्यामुळें तिला त्या विद्येचें मुळींच स्म-

---

* विद्या हा शब्द सामान्यतः प्रसिद्ध विद्येचा वाचक आहे; तरी मंत्रशास्त्रकर्ते निरनिराळ्या मंत्रांनीं प्राप्त व्हावयाच्या सिद्धींला विद्या म्हणतात. शिखाबंधिनी अर्थात् आवरण करणारी अशी विद्या. म्हणजे शत्रूपासून आपला बचाव करण्याकरितां आपल्याला त्याच्या दृष्टीस न पडूं देणारा मंत्र, असा त्याचा येथें अर्थ घ्यावा.

रण राहिलें नव्हतें. **चित्रलेखेनें** तिचें नांव घेतलें; तेव्हां **उर्वशी** ह्मणाली, ' त्या विद्येचा प्रयोग कसा करायचा याचें तुला चांगलें स्मरण आहे का? '

**चित्रलेखा** ह्मणाली, ' हें सगळें हृदयालाच माहित आहे. '

त्या याप्रमाणें बोलत आहेत इतक्यांत त्यांचें विमान **प्रतिष्ठाना**च्या जवळ येऊन पोंचलें. तेव्हां **राजा**च्या महालाकडे बोट दाखवून **चित्रलेखा** ह्मणाली, 'सखे, पहा पहा! भगवती **भागीरथी** आणि **यमुना** यांच्या संगमानें पवित्र झालेल्या उदकांत जणु काय आपलें प्रतिबिंब पहात आहे, व ह्या **प्रतिष्ठान** नगराच्या मस्तकावरचें आभरणच अशा त्या राजर्षीच्या घराजवळ आह्मी येऊन पोंचलों आहों. '

हें ऐकून **उर्वशी** आशेनें **राजा**च्या महालाकडे पाहून ह्मणाली, 'अग बाई! मला तर हा स्वर्गच येथें आला आहे असें वाटतें. पण गडे, संकटांत पडलेल्यावर दया करणारा तो ( **पुरूरवा** ) यावेळीं कोठें असेल बरें? '

त्यांचें विमान आकाशांत असल्यामुळें खालच्या प्रदेशांत काय चाललें आहे तें सर्व त्यांना दिसत होतें. **चित्रलेखा** प्रमदवनांत बसलेल्या **राजा**ला पाहून तो तेथें आहे हें **उर्वशी**ला न सांगतां ह्मणाली, 'जणु काय **इंद्रा**च्या नंदनवनाचाच† एक प्रदेश, अशा ह्या प्रमदवनांत खालीं उतरून आपण त्याचा शोध काढूंया. '

---

† स्वर्गलोकचा राजा इंद्र याची एक अप्रतिम बाग आहे तिला नंदनवन असें ह्मणतात.

असा विचार करून दोघीही विमानांतून प्रमदवनांत उतरल्या, आणि अंमळ पुढें जातात तों माणवकासहवर्तमान राजा मोगरीच्या मंडपांत बसला होता तो त्यांच्या दृष्टीस पडला. राजाला पाहून चित्रलेखा आनंदानें ह्मणाली, 'सखे, हा पहा येथ—आधीं उदय पावलेला भगवान् चंद्रमा कौमुदीची* वाट पहातो त्याप्रमाणें तुझा हृदयवल्लभ तुझी वाट पहात आहे.'

हें ऐकून उर्वशी राजाला पाहून ह्मणाली, 'गडे, पूर्वी आपण याला पाहिलें होतें, त्यापेक्षांही हा महाराज यावेळीं मला फारच प्रियदर्शन वाटतो.'

चित्रलेखा ह्मणाली, 'बरोबर. असें होणें योग्यच आहे. तर मग ये आपण त्याच्या जवळ जाऊं.'

उर्वशी राजावर आसक्त झाली होती, तरी तो आपल्यावर किती अनुरक्त झाला आहे हें तिला माहीत नव्हतें. स्त्रियांला—ज्यांच्यावर त्या प्रीति करतात त्यांची, आपल्यावर प्रीति आहे का नाहीं, हें पाहण्याची फार इच्छा असते. त्यांतून उर्वशीसारख्या चाखाळ बायकोला तर ती विशेषच असली पाहिजे. ह्मणून ती ह्मणाली, 'मी यावेळीं त्याच्या जवळ जात नाहीं. तिरस्कारिणी† विद्येनें आपल्या-

---

* कौमुदी ह्मणजे चंद्राची कांति. चंद्र अगदीं प्रथमच दिसूं लागतो तेव्हां त्याची विशेष प्रकारची कांति त्याच्या बरोबर उदय पावत नाहीं. थोड्यावेळानें तो बराच वर आला म्हणजे ती त्याला प्राप्त होते हें प्रसिद्धच आहे. याच गोष्टीला अनुलक्षून वर वर्णन केलें आहे.

† तिरस्कारिणी हें पडद्याचें देखील नांव आहे. पडदा त्याच्या आड असलेल्या वस्तूला दडवतो ह्मणून त्याला तिरस्कारिणी म्हणतात.

ला अदृश्य करून त्याच्या जवळ जाऊन तो काय काय बोलतो तें आधीं ऐकतें. आपल्याजवळ बसलेल्या मित्रा-सहवर्तमान हा येथें एकांतांत काय बोलतो आहे तें प्रथम ऐकिलें पाहिजे.'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'जसें तुला आवडेल तसें कर.' नंतर दोघीही तिरस्करिणी विद्येनें आपल्याला आच्छादून घेऊन **राजाच्या** जवळ गेल्या.

इकडे **माणवकानें** कांहीं तरी उपाय शोधून काढण्या करितां समाधि लावली होती. तो बराच वेळ ध्यानस्थ बसून एकाएकीं तोंडावरचें पांघरूण काढून **राजाला** ह्मणाला, 'अहो, दुर्लभ अशा प्रेमळ मनुष्याच्या समागमाचा उपाय मी चिंतन केला आहे.'

त्यानें असें सांगितलें, तरी **राजा** आपल्याच नादांत होता. त्यानें त्यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं पण **उर्वशीला** तें भाषण ऐकून मोठी हुरहुर लागली. ती ह्मणाली, 'हा (**राजा**) जिचा शोध करीत आहे; व याला तसें करायला लावून जी आपला विनोद करून घेत आहे अशी कोणती धन्य स्त्री असावी बरें ही?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'तूं अंमळ ध्यान करून पहा ह्मणजे झालें. कोण ती तेव्हांच तुला समजेल.'

**उर्वशी** ह्मणाली, 'गडे, एकाएकीं आपल्या सामर्थ्यानें तसें करण्याविषयीं मला भय वाटतें.'

---

अशाच प्रकारचा एक मंत्र आहे कीं, ज्याच्या योगानें आपलें शरीर दुसऱ्याला अदृश्य करतां येतें, आणि यालाच तिरस्करिणी विद्या म्हणतात.

इकडे आपण काय बोललों तें राजानें ऐकिलें नाहीं, ह्मणून माणवक पुनः ह्मणाला, 'अहो! दुर्लभ प्रणयिजनांच्या समागमाचा उपाय मी योजला आहे असें ह्मणतों.'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'मित्रा, सांग तर.'

माणवक ह्मणाला, 'हें पहा. तूं आतां असें कर कीं, स्वप्नं पडतील आणि त्या स्वप्नांत तिचा समागम होईल अशी तूं आतां खूप झोंप घे, किंवा तुझ्या त्या उर्वशीची तसबीर काढून तिच्याकडे पाहून आपल्या मनाची करमणूक कर.'

उर्वशीला हुरहुर लागली होती असें वर सांगितलेंच आहे. माणवकाचें भाषण ऐकून ती आनंदानें आपल्या मनाला ह्मणाली, 'भित्र्या हृदया, आतां तरी तुझें समाधान होऊंदे.'

माणवकानें जे दोन उपाय सांगितले, त्यांवर राजा ह्मणाला, 'अरे, त्या दोन्हीही गोष्टी माझ्या हातून होणें कठीण आहे. कारण कामाच्या बाणप्रहारांनीं हें हृदय नेहमीं सशल्य असतें, तेव्हां स्वप्नांत प्रियजनांचा समागम करून देणारी निद्रा कशी प्राप्त होईल बरें? त्या सुमुखीचें चित्र काढायला लागलों तरी तें चित्र पुरतें केल्यापूर्वींच माझ्या डोळ्यांतून पाण्याचे लोट वाहणार नाहींत असें नाहीं. अर्थात् चित्र अपुरतें राहिल्यामुळें त्यानेंही मनाची करमणूक होणार नाहीं.'

हें ऐकून चित्रलेखा ह्मणाली, 'सखे, हें बोलणें तूं ऐकिलेंस का?'

उर्वशी ह्मणाली, 'हो ऐकलें; पण हृदयाला तेवढें पुरेसें झालें नाहीं.'

इकडे **माणवकानें** आपल्या मतें पुष्कळ वेळ विचार करून जे दोन उपाय शोधून काढले होते, ते **राजाला** नापसंत झाल्यावरून अंमळ हिरमुसल्यासारखा होऊन तो त्याला ह्मणाला, 'बाबा, आमचें शहाणपण इतकेंच, याहून अधिक कांहीं मला सुचत नाहीं.'

**राजा** सुस्कारा सोडून ह्मणाला, 'माझ्या मनांत अत्यंत कठीण असें किति दुःख होत आहे! हें तिला (उर्वशीला) माहित नसेल. अथवा ती देवलोकांत राहणारी आहे, तिनें आपल्या दिव्य प्रभावानें मी आपल्यावर अनुरक्त झालों आहें हें जाणलें असेल व ह्मणूनच ती माझी अवज्ञा करीत असेल. तिच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या माझ्या समागममनोरथाला फलप्राप्ति न झाल्यामुळें निरस करून मदन धन्य होवो!'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे **उर्वशी**, हेंही ऐकलेंस का?'

**उर्वशी** ह्मणाली, 'अरेरे! हा मला देखील अशीच समजतो! मी याच्यावर किती अनुरक्त झालें आहें तें याला कळलें पाहिजे; पण पुढें जाऊन त्याच्या दृष्टीस पडवत नाहीं. ह्मणून आपल्या सामर्थ्यानें एक भूर्जपत्र उत्पन्न करून त्याच्यावर लेख लिहून याच्या पुढें टाकावा असें मला वाटतें.'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'तसें करणें मला देखील मान्य आहे.' याप्रमाणें आपला विचार **चित्रलेखे**ला मान्य होतांच **उर्वशीनें** तेथल्या तेथें एक भूर्जपत्र उत्पन्न करून त्यावर आपल्या मनाची स्थिति व्यक्त कर-

णारा एक श्लोक लिहून तिनें तें पत्र अकस्मात् **माणवक** आणि **राजा** यांच्या मध्यें टाकलें.

**माणवक** हा भित्रा ब्राह्मणच होता. अकस्मात् तें भूर्जपत्र खालीं पडलेलें पाहून ती सर्पाची कांत असेल असें समजून भ्याला आणि—मेलोंरे मेलों! अरे हें काय? ही सर्पाची कांत मला खायला आली आहे! असें ओरडला.

**राजानें** तें भूर्जपत्र ओळखलें आणि घाबरलेल्या **माणवकाला** ह्मणाला, 'वेड्या, अरे ही सर्पाची कांत नव्हे. हें भूर्जपत्रावर कांहीं लिहिलेलें आहे.'

**माणवक** ह्मणाला, 'हो. आतां समजलों. अदृश्य असलेल्या **उर्वशीनें** तुझे विलाप ऐकून भूर्जपत्रावर अनुरागसूचक कांहीं लिहून सोडलें असावें असें वाटतें.,

**राजा** ह्मणाला, 'मनोरथाला दुसरी गतिच नाहीं.' भूर्जपत्र हातांत घेऊन वाचून हर्षानें ह्मणाला, 'गड्या तुझा तर्क खरा आहे.'

**माणवक** ह्मणाला, 'पण त्यावर काय लिहिलें आहे तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.'

हें ऐकून **उर्वशीला** फार समाधान वाटलें. ती **माणवकाला** उद्देशून ह्मणाली, 'वाहवा! आर्या, यावरून तूं मोठा रसिक आहेस खरा.'

इकडे **राजा माणवकाला** ह्मणाला, 'ऐक. हें पहा काय लिहिलें आहे तें वाचतों.' असें सांगून त्यानें त्यावर कविता लिहिली होती ती वाचली.

**नाथा जसा तूं मम अनुरागा ।**
**नेणासि मीही न तवानुरागा ॥**

पाहोनि प्रीती सुरतरु शयनीं ।
नंदनवायुहि आगीचि मानीं ॥ १ ॥

यावर **उर्वशी** ह्मणाली, 'गडे, आतां हा काय बोलेल बरें?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'आणखी बोलणार काय! म्लान झालेल्या कमलाच्या देंठासारख्या आपल्या शरीरानें यानें काय बोलायचें तें सुचविलेंच आहे.'

इकडे **माणवक** ह्मणाला, 'ओहो! बरें झालें. भुकेलेल्या मला लाडवांच वाण मिळावें, तसें तुझ्या मनाचें समाधान करणारें हें भूर्जपत्र तुला मिळालें!'

**राजा** ह्मणाला, 'समाधान करणारें ह्मणून काय विचारतोस. उभयतांचा अनुराग समानच आहे असें सुचविणारें व ज्याचा अर्थ फार सुंदर आहे, असें त्या माझ्या प्रियेनें या पत्रावर जें कांहीं लिहिलें आहे तें वाचून—जिचे डोळे धुंद झाले आहेत, अशा त्या प्रियेच्या मुखाजवळ पापण्या तांठ केलेलें आपलें मुखच नेलें काय, असें यावेळीं मला वाटतें!'

**उर्वशी**लाही असेंच वाटत होतें, ह्मणून ती ह्मणाली, 'या ठिकाणीं आह्मां उभयतांची प्रीति एकसारखीच आहे.'

**राजा** प्रेमानें सद्गदित झाला होता, यामुळें त्याच्या अंगाला घाम सुटला होता; ह्मणून तो **माणवका**ला ह्मणाला, 'मित्रा, माझ्या बोटांला घाम आला असल्यामुळें यावरचीं अक्षरें पुसून जात आहेत, तर त्या माझ्या प्रियेची ही ठेव (भूर्जपत्र) अंमळ तूं हातांत धर.'

हें ऐकून **माणवका**नें भूर्जपत्र हातांत घेतलें, आणि

ह्मणाला, 'बरें तर मग ती तुझी **उर्वशी** याप्रमाणें तुझ्या मनोरथवृक्षाला फूल दाखवून फलाविषयीं* दगा देईल काय?'

इकडे **उर्वशी चित्रलेखे**ला ह्मणाली, 'अग **चित्रलेखे**, गडे आतां याला प्रत्यक्ष दर्शन दिलेंच पाहिजे. पुढें जाण्याविषयीं घाबरलेलें माझें मन मी अंमळ स्थीर करतें, तोंपर्यंत तूं पुढें जा आणि मला जें पाहिजे आहे तेंच याच्याजवळ बोल.'

हें ऐकून **चित्रलेखा**—तसें करतें, असें सांगून तिनें आपल्यावरची तिरस्करिणी विद्या दूर केली; आणि **राजा**च्या पुढें जाऊन—महाराजांचा जयजयकार असो! असें ह्मणाली.

**राजा** जिच्याविषयीं उत्कंठित झाला होता, तिची प्रियसखी **चित्रलेखा** एकाएकीं दृष्टीस पडतांच आनंदाच्या भरांत **राजा**ची बरीच गडबड उडाली. तो तिचें स्वागत करून ह्मणाला, 'हे कल्याणि **चित्रलेखे**, आपल्या सखीसहवर्तमान तूं माझ्या पूर्वीं दृष्टीस पडली होतीस, त्यावेळीं जो मला आनंद झाला होता, तो सांप्रत त्या मैत्रिणीवांचून तूं एकटीच आल्यामुळें **गंगे**वांचून जशी **यमुना** आनंदकारक वाटत नाहीं, तशी यावेळीं तूं मला विशेष आनंदकारक वाटत नाहींस.'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'घाई करूं नका. प्रथम मेघांची पंक्ति दिसते आणि मग विद्युल्लता दृष्टीस पडते.'

---

* बहुतकरून ज्या वृक्षादिकांला फळें येतात त्याला आधीं फूल येत असतें व त्या फुलांतूनच मागें अथवा पुढें फळाचा प्रादुर्भाव होतो; याला अनुलक्षून माणवकानें तिचा अनुराग हें फूल व समागम हें फळ अशी कल्पना करून वरील भाषण केलें आहे.

**माणवक** हंसून ह्मणाला, 'अरेरे! मी तर समजलों होतों ही **उर्वशीच** ह्मणून. पण ही **उर्वशी** नव्हे, तेव्हां तिची कोणी तरी दासी असावीसें वाटतें.'

**राजानें** तेथलीच एक शिला तिला आसनार्थ दिली व तिनेंही खालीं बसली.

**चित्रलेखा** ह्मणाली, 'महाराज, **उर्वशी** आपल्याला शिरसानमस्कार करून विनंती करीत आहे.'

**राजा** ह्मणाला, 'तिची काय आज्ञा आहे?' **चित्रलेखा** ह्मणाली, 'ती अशी विनंति करते कीं, **केशिदैत्यानें** माझ्यावर अरिष्ट आणलें होतें, त्यावेळीं महाराजांनींच माझें रक्षण केलें. ती मी सांप्रत तुमच्या दर्शनानें उत्पन्न झालेल्या मदनानें फारच पीडलेली आहें, यामुळ पुनः महाराजांच्या दयेला पात्र झालें आहें.'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'अग सखे **चित्रलेखे**, ती प्रियदर्शना तुझी सखी अत्यंत उत्सुक झाली आहे असें सांगतेस, पण ह्या **पुरूरव्याला** तिच्याकरितां किती दुःख होत आहे तें मात्र पहात नाहींस. तिची माझ्याकडे व माझी तिच्याकडे एकसारखीच प्रार्थना आहे. याकरितां यत्न कर आणि चंद्राला त्याच्या कांतीप्रमाणें तिचा माझ्याशीं समागम करून दे.'

**उर्वशीप्रमाणेंच** माझीही तिला प्रार्थना आहे, असें **राजानें** सांगितल्यावरून **चित्रलेखा** परत **उर्वशीजवळ** येऊन तिला ह्मणाली, 'सखे **उर्वशी**, अशी इकडे ये. मदन अत्यंत भयंकर आहे, ह्मणून तुझ्या प्रियतमाची यावेळीं †मी दूतिं झालें आहें.'

---

† नवरा बायको अथवा आशुकमाशुक या उभयतांची मध्यस्थी

तिरस्करिणी विद्येला दूर करून **उर्वशी चित्रलेखेला** ह्मणाली, 'अग, तूं फारच अव्यवस्थित आहेस. इतक्या लवकरच तूं मला सोडलीस असें वाटतें.'

हें ऐकून **चित्रलेखा** हंसून ह्मणाली, 'आतां या घटकेंतच कोण कोणाला सोडतें तें समजून येईल! तूं पूर्वीप्रमाणें आपला आकार मात्र स्वीकार.'

**उर्वशी** ही देवांची वेश्या होती, व वेश्यांला एखाद्या अनोळखी मनुष्याजवळ देखील जाण्याला कांहीं भय वाटत नाहीं; तथापि **उर्वशी** सांप्रत आपल्या वेश्यापणाच्या विरुद्ध वर्तन करीत होती. वेश्येनें कोणत्याही पुरुषावर आपलें मन आसक्त होऊं देतां कामानये; पण तसें न करितां **उर्वशी** राजा **पुरूरव्या**वर अतिशय आसक्त झाली होती. व प्रेमातिशयामुळें तिच्या अंगांत थोड्याशा सात्विकभावाचें वारें येऊन ती राजाजवळ जातांना लज्जित होऊन कांहींशी भयभीतही झाली होती. अशा स्थितींत अडखळत अडखळत तिनें—महाराजांचा जयजयकार असो! असें ह्मटलें.

तिला पहातांच **राजा** आनंदित होऊन एकदम उठून तिच्याजवळ जाऊन ह्मणाला, 'हे सुंदरी! तुझ्या तोंडांतून हा जयशब्द ऐकण्यापूर्वीं मी असें समजत होतों कीं, हा जयशब्द कायतो इंद्राजवळच आहे; पण आतां तो त्याच्यापासून दुसऱ्या पुरुषाजवळ अर्थात् माझ्याजवळ प्राप्त§

---

करणाऱ्या स्त्रीला संस्कृत भाषेंत दूति ह्मणतात, व साहित्यशास्त्रकारांनीं हिचें फार मोठें माहात्म्य वर्णन केलें आहे.

§ राजाच्या या भाषणांतील अर्थ बराच गूढ आहे. उर्वशी ही

झाला.' असें बोलून हाताला धरून तिला आपल्या आसनावर बसवून घेतलें.

विचारा **माणवक** उगीच तेथें बसला होता. त्याला कोणींच कांहीं विचारलें नाहीं अथवा नमस्कारही केला नाहीं. ह्मणून तो **राजाला** ह्मणाला, 'गड्या, तुझ्या राज्यांत कशी स्थिति आहे कोणास ठाऊक. तुझा प्रियमित्र आणि ब्राह्मण याला देखील नमस्कार मिळत नाहीं हा काय चमत्कार!'

हें **माणवकाचें** उपरोधिक बोलणें ऐकून **उर्वशी** त्याचा मतलब समजली. आपण नमस्कार केला नाहीं ह्मणून यानें हें असें ह्मटलें असें समजून तिनें हंसत हंसत **माणवकाला** नमस्कार केला. तेव्हां तो संतुष्ट होऊन ह्मणाला, 'तुझें कल्याण असो!'

याप्रमाणें **राजानें** कित्येक रात्रीच्या रात्री अलोचन जागरणें करून जिच्या उत्कंठेचें दुःख धारण केलें, त्या **उर्वशीची** एकदांची भेट होऊन **राजाचा** जीव अंमळ खालीं बसला. सर्व मंडळी आपापल्या आसनांवर बसली असून आतां पुढें कांहीं गोष्टीचा उपक्रम निघणार होता; पण इतक्यांत त्या प्रियसमागमाला एक विघ्न उपस्थित झालें.

स्वर्गलोकांत देवांचा नाट्याचार्य **भरतमुनि** यानें एक **लक्ष्मीस्वयंवर** नांवाचें नाटक रचलें असून तें देवांच्या स-

---

इंद्राची आवडती वेश्या असून ती काय तो त्याचाच जयजयकार करीत होती, अर्थात् त्याच्या वांचून दुसऱ्या पुरुषाचा स्वीकार करीत नव्हती. तिनें आज आपला जयजयकार केला, तेव्हां अर्थात् ती आपल्याला प्राप्त झाली असा त्याचा अभिप्राय असावा.

भेंत पात्रद्वारा प्रयोग करून दाखवायचें, असा हेतु ध-रून त्यानें उर्वशी इत्यादि कांहीं निवडक अप्सरांना तें नाटक शिकवून त्यांना तयार केल्या होत्या. त्याचा यात्र दिवशीं प्रयोग करावा असा निश्चय ठरला, व त्याप्रमाणें ज्या ज्या पात्राला जो जो भाग त्यानें शिकविला होता, तो तो त्यांच्याकडून पुनः एकवेळ ह्मणवून घ्यावा, असा वि-चार करून भरतमुनीनें अप्सरांना बोलाविलें; बाकी सर्व आल्या पण उर्वशी आणि चित्रलेखा त्याला भेटल्या नाहींत. तेव्हां यावेळीं त्या कोठें आहेत हें जाणून त्यानें इंद्राकरवीं तत्काळ एक दूत पाठविला.

तो दूत उर्वशी पुरूरव्याजवळ बसली होती तेथें ये-ऊन चित्रलेखेला ह्मणाला, 'अग चित्रलेखे, तुझी प्रिय-सखी उर्वशी हिला लवकर घेऊन चल. कारण, भरतमु-नीनें जो नाटकाचा प्रयोग तुह्मांला शिकविला आहे तो सुंदर अभिनयाचा प्रयोग आपला यजमान भगवान् इंद्र इतर सर्व लोकपालांसहवर्तमान पाहण्याची इच्छा करीत आहे.'

देवदूत सर्वांला दिसला नाहीं तरी त्याचें भाषण चांग-लें ऐकूं आलें. तें ऐकून उर्वशी फारच दुःखित झाली. चित्रलेखा ह्मणाली, 'गडे, ह्या दूतानें काय सांगितलें तें तूं ऐकिलेंस ना? तर आतां घे महाराजांचा निरोप आणि चल लवकर.'

*उर्वशी मुस्काग मोडून ह्मणाली, 'बाई, माझ्यानें कां-हीं एक बोलवत नाहीं.'*

हें ऐकून चित्रलेखा उर्वशीबद्दल राजाला ह्मणाली, 'महाराज, उर्वशी विनंति करीत आहे कीं, आह्मी परा-धीन आहों. महाराज आज्ञा देतील तर देवांचा राजा

भगवान् इंद्र याचे आपण अपराधी न व्हावें असें करण्या-स मी इच्छितें.'

इतके दिवस दुःख भोगून नुकतीच कोठें जिची भेट झाली; अद्याप दोन गोष्टी देखील झाल्या नाहींत, अशा स्थितींत उर्वशीला पुरूरव्याच्यानें कसा निरोप देववेल! त्याचा गळा भरून आल्यामुळें तोंडांतून शब्द देखील निघेना; पण कसा तरी आलेला वेळ सांवरून तो ह्मणाला, 'मी तुह्मांला आपल्या यजमानाच्या आज्ञेप्रमाणें वागण्याच्या कामीं आड येणार नाहीं. पण इतकेंच कीं, तुह्मांला आमची आठवण मात्र असूंद्या.'

ज्या स्त्रीपुरुषांचें मन एकमेकांवर अतिशय आसक्त झालेलें असतें, त्यांचा दुर्दैवानें वियोग होण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्यानें परस्परांशीं कांहीं बोलवत नाहीं. **पुरूरवा** व **उर्वशी** हीं परस्परांवर इतकीं अनुरक्त होतीं, तरी यावेळीं एक अक्षर देखील त्यांच्या तोंडांतून निघालें नाहीं. उर्वशीला वियोगाचें दुःख फार झालें आहे, असें तिच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें. अशा स्थितींत ती निरुपाया-स्तव **राजाकडे** एकसारखी पहात होत्साती **चित्रलेखेसह**-वर्तमान विमानांत बसून निघून गेली.

इकडे **राजा** दुःखित होऊन सुस्कारा सोडून ह्मणाला, 'सांप्रत हे माझे डोळे असून निष्फळ झाल्यासारखे आहेत!'

**माणवक**, तें भूर्जपत्र दाखवून **राजाचें** समाधान करावें ह्मणून, भूर्जपत्र पाहूं लागला; पण तें वाऱ्यानें उडून गेल्यामुळें त्याला कोठें दिसलें नाहीं. तेव्हां—अरे! माझें भूर्जपत्र—इतकें अर्धेंच बोलून मनांत ह्मणाला, अरेरे! उ-

वंशीच्या दर्शनानें आश्चर्यांत निमग्न झालेल्या माझ्या हातांतून तें भूर्जपत्र सुटून गेलें तरी मला समजलें नाहीं.

**माणवक** अर्धेंच बोलून थांबला तेव्हां **राजा** ह्मणाला, 'अरे, तुझ्या मनांत काय बोलायचें आहे?'

भूर्जपत्र गेलें तेव्हां आतां त्याचें नांव देखाल काढूं नये, असा विचार करून **माणवक** ह्मणाला, 'हाय, माझ्या मनांत हें बोलायचें होतें कीं, तू असें आंग टाकूं नकोस. त्या **उर्वशीचें** मन तुझ्या ठिकाणीं अगदा बळकट बांधल्यासारखें झालें आहे. जरी ती येथून गेली तरी आपला स्नेह कमी करील असें वाटत नाहीं.'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'होय. माझ्या मनांत देखील असेंच येतें. कारण तिनें जाण्याच्या वळीं—**इंद्राची** ताबेदार असल्यामुळें शरीर तिच्यानें माझ्याजवळ ठेववत नव्हतें; तरी आपल्या अधिकारांत असलेलें हृदय, स्तनांचा कंप व इतर चाळे आणि सुस्कारा यांहीं, माझ्याजवळ ठेवलें आहे असें वाटतें.'

**माणवक** आपल्या मनांत ह्मणाला, 'माझ्या पोटांत धस्स होत आहे. कोणत्या वेळीं हा (**राजा**) त्या भूर्जपत्राचें नांव घेईल कोणास ठाऊक. यानें त्याची कधींच आठवण न काढली तर बरें.

**माणवक** मनांत असें चिंतन करीत आहे, इतक्यांत **राजाला** भूर्जपत्राचें स्मरण झालें. तो ह्मणाला, 'गड्या **माणवका**, अगदीं उदास झालेल्या मनाला कोणत्या साधनानें आतां रमवावें बरें! तें भूर्जपत्र इकडे आण पाहूं.'

भूर्जपत्र गेलें हें **माणवकाला** पूर्वींच ठाऊक होतें. तरी **राजाच्या** देखत चहूंकडे शोधून कोठें मिळालें नाहीं, ह्म-

णून दुःखित होऊन ह्मणाला, 'अरे देवा! तें कोठेंच दिसत नाहीं.' राजाला ह्मणाला, 'मित्रा, तें भूर्जपत्र दिव्य होतें अर्थात् उर्वशीबरोबरच तें निघून गेलें असावें.'

हें ऐकून तिरस्कारपूर्वक त्याच्याकडे पाहून **राजा** ह्मणाला, 'मूर्ख बेटा कोठला. प्रत्येक कामांत गाफल!'

**माणवक** ह्मणाला, 'मित्रा, असा रागावूं नकोस. इकडे तिकडे शोध करून पाहतों.' असें बोलून आपण उठून—इकडे असेल, तिकडे असेल. ह्या इकडे असेल, असें करीत चहूंकडे शोधूं लागला.

इकडे हा असा प्रसंग चालला आहे, तों अंतःपुरांतून **राजा**चें शरीर अस्वस्थ आहे असें ऐकून राणी **वसुमती** **निपुणिके**ला बरोबर घेऊन त्याच्या समाचाराला आली.

**निपुणिकेनें राजा माणवका**सहवर्तमान नुकताच प्रमदवनांतल्या एका कुंजांत शिरला आहे, हें वर्तमान **राणी**ला सांगितल्यावरून ती तिकडेच आली. आणि **निपुणिके**ला ह्मणाली, 'अग, खरेंच का आर्य **माणवका**सहवर्तमान आर्यपुत्र कुंजांत प्रवेश करीत असतां तुझ्या दृष्टीस पडले?'

**निपुणिका** ह्मणाली, 'बाईसाहेबांला मी कधीं खोटी विनंति केली आहे का?'

**राणी** ह्मणाली, 'तर आतां त्या कुंजाच्या जवळ जाऊन त्याच्या आड राहून आपल्या मित्राबरोबर ते काय बोलताहेत तें ऐकत उभी राहतें.'

**निपुणिका** ह्मणाली, 'बाईसाहेबांची मर्जी असेल तसें करावें. हा पहा तो कुंज जवळच दिसतो आहे.'

**माणवका**च्या हातांतून भूर्जपत्र उडून गेलें हें वर

सांगितलेंच आहे. तें उडत उडत बरेंच दूर गेलें होतें, तें राणी येत असतां सहज तिच्या दृष्टीस पडलें. तें पाहून ती ह्मणाली, 'अग निपुणिके, दक्षिणेकडच्या वाऱ्यानें हें इकडेच उडून येत आहे हें काय असावें बरें? नव्या फडक्याप्रमाणें दिसत आहे.'

निपुणिका नीट पाहून ह्मणाली, 'हें आतांच वाऱ्यानें परतलें यामुळ त्याच्या वरचीं अक्षरें स्पष्ट दिसत आहेत. हें भूर्जपत्र आहे.'

ती असें सांगत आहे, इतक्यांत तें भूर्जपत्र राणीच्या पैंजणाला अडकलें. तेव्हां चटकन् निपुणिकेनें तें उचलून घेऊन राणीच्या हातांत दिलें, आणि—हें वाचून पहावें असें सांगितलें.

राणीनें वाचलें असतें, पण तें बहुतकरून शृंगारिक असावें असें वाटल्यावरून, तें परत निपुणिकेच्या हातांत देऊन ह्मणाली, 'तूंच वाच. जर कांहीं वाईट साईट मजकूर नसला तर मी ऐकेन.'

हें ऐकून निपुणिका तें पत्र वाचून ह्मणाली, 'बाईसाहेब, तेंच हें वर्तमान. जी लोकवार्ता आपल्या कानावर आली होती, त्यांतलाच मजकूर यांत आहे. महाराजांला उद्देशून उर्वशीनें कांहीं काव्य रचून पाठविलें आहे असें वाटतें. हें बहुतकरून आमच्या हातीं लागलें नसतें, पण आर्य माणवकाच्या धांदली स्वभावानें हें आह्मांस मिळालें.'

राणी वसुमती ह्मणाली, 'त्यांतला मतलब काय आहे तो समजून घे.' हें ऐकून निपुणिकेनें तो श्लोक वाचला.

तो ऐकून राणी ह्मणाली, 'आतां अप्सरेची इच्छा करणाऱ्या त्याला (राजाला) ह्याच पत्राच्या निमित्तानें भेटूंया.'

याप्रमाणें निपुणिकेला सांगून तें पत्र हातांत घेऊन राणी राजाजवळ आली.

इकडे राजा उर्वशीच्याच नादांत निमग्न होऊन वरचेवर त्या भूर्जपत्राची आठवण करीत होता; व माणवकानें तें हरवलें ह्मणून तो त्याच्यावर रागावला होता. इतक्यांत दक्षिणेकडून सुंदर वारा आलेला पाहून भूर्जपत्राचा राजाला विसर पाडावा, ह्मणून माणवक ह्मणाला, 'मित्रा, वाऱ्याच्या वेगानें चालणारें, ह्या प्रमदवनाच्या जवळ असणाऱ्या क्रीडापर्वताच्या* समीप हें काय दिसत आहे?'

हें ऐकून राजा आसनावरून उठून ह्मणाला, 'भगवन् मलयमारुता, माझ्यावर यावेळीं तूं कृपा कर. आपल्याला सुगंध येण्याकरितां वेलींच्या फुलांचे सुवासिक रजःकण पाहिजे तर घेऊन जा उगीच—माझ्या प्रियेचा केवळ हातच, असें तें भूर्जपत्र हरण करून तुला काय उपयोग आहे! प्रियेच्या हातचा लेख, तिचें चित्र इत्यादि विरहकालीं करमणुकीच्या अनेक उपायांनीं कसा तरी ज्यानें जीव धारण केला आहे, अशा दुःखी मनुष्याला उगीच पराभूत करणें हें तुला आवडतही नाहीं.'

इकडे राजाचें हें भाषण ऐकून निपुणिका राणीला ह्मणाली, 'बाईसाहेब, ह्या भूर्जपत्राचाच तिकडे (राजाकडे) शोध चालला आहे असें वाटतें.'

राणी ह्मणाली, 'बरें, काय आहे तें पहातें.'

---

* बागेंत क्रीडा करण्याकरितां जो कृत्रिम पर्वत तयार करीत असतात, त्यालाच क्रीडापर्वत म्हणतात.

**राजा** त्या भूर्जपत्राविषयीं तळमळत आहे, इतक्यांत जवळच कांहींसें पडलेलें दिसलें तें पाहून **राजाला** आपलें भूर्जपत्रच आहे असें वाटलें. त्यानें तें काय आहे ह्मणून पहाण्यास सांगितल्यावरून **माणवकानें** तें वर उचललें तों भूर्जपत्र नसून तें मोराचें पीस होतें.

तें पाहून **माणवक राजाला** ह्मणाला, 'मित्रा, ज्याचीं केसरें अगदीं म्लान झालीं आहेत, अशा ह्या मोराच्या पिसानें तुला फसविलें.'

तें भूर्जपत्र असेल असें समजून **राजाला** थोडी उमेद आली होती. ती **माणवकाचें** भाषण ऐकून उदास होऊन ह्मणाला, 'मी दुर्दैवी सर्वथा यावेळीं मेलोंच यांत कांहीं संशय नाहीं!'

**राजा** याप्रमाणें भूर्जपत्राकरितां अगदीं व्याकुळ झाला आहे असें पाहून, हीच आपल्याला पुढें जाण्याला उत्तम संधि आहे असें जाणून राणी **वसुमती** तें भूर्जपत्र हातांत घेऊन एकदम **राजाजवळ** गेली आणि—आर्यपुत्र, असे दुःखित होऊं नका. हें पहा तें भूर्जपत्र, असें बोलून तिनें तें **राजाच्या** पुढें टाकलें.

राजा **पुरूरवा** इतका वेडा झाला होता. रात्रंदिवस **उर्वशीकडे** त्याचें ध्यान लागलें होतें, तरी त्यानें आपली राणी **वसुमती** हिचा अपमान केला नव्हता. ज्या ज्या वेळीं तिच्या भेटीचा प्रसंग येई त्या त्या वेळीं—त्याचें मन स्थीर नव्हतें तरी—मोठ्या बेताबातानें आपली मानसिक स्थिति राणीला न कळूं देण्याविषयीं तो प्रयत्न करीत होता. असें असून तें भूर्जपत्रच तिच्या हातीं मिळालें व त्या योगानें अर्थात् राणीला आपलें सर्व कृत्य

समजलें, या गोष्टीची त्याला फार लाज वाटली. तो गोंधळून मनांत ह्मणाला, अरेरे! प्रत्यक्ष हिला हें आमचें सर्व गुह्य समजलें हें फार वाईट झालें. पण आतां काय उपाय?

नंतर तिच्या हाताला धरून ह्मणाला, 'देवीचें स्वागत असो.'

राणी ह्मणाली, 'यावेळीं स्वागत कसचें? हे माझें दुरागतच झालें आहे.'

हा टोला ऐकून तर **राजाचा** फारच गोंधळ झाला. व यावरून राणीला आपली सर्व हकीकत पुरती समजली असें जाणून हळूच **माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, आतां येथें काय करावें?'

**माणवक** हळूच ह्मणाला, 'अरे, मुद्देमाल मिळाल्यावरून ठरलेल्या चोराला आणखी पुढें कांहीं बोलायचें ह्मणून असतें का?'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'मूर्खा! ही थट्टेची वेळ नव्हे, कांहींतरी उपाय सांग.'

**माणवक** ह्मणाला, 'तर तुह्मी आतां त्या तुमच्या रागीट बायकोच्या पायांवर डोकें ठेवून— बाईसाहेब, प्रसन्न व्हा, असें ह्मणा ह्मणजे झालें.'

**राजा** ह्मणाला, 'खरेंच. शेवटीं याच्याशिवाय दुसरा कांहीं उपाय दिसत नाहीं. **राणीला** ह्मणाला, 'प्रिये, खरोखर मी हें पत्र मुळींच शोधीत नव्हतों. ज्या पत्राचा मी शोध करीत होता, तें पत्र कांहीं राजकीय मसलतीचें आहे.'

**राणी** ह्मणाली, 'असें बोललेंच पाहिजे. आपलें सौभाग्य आपणच दडवल्यावांचून कसें चालेल?'

इतक्यांत कांहीं तरी बोलून **राणीला** हंसवावें ह्मणून **माणवक** ह्मणाला, 'अहो बाईसाहेब, त्वरा करा. ह्या आमच्या प्रियमित्राला जेवायला घाला. पित्तानें याचें डोकें अगदीं फिरलें आहे. दोन घास खाऊन याला अंमळ स्वस्थ होऊं द्या.'

ही त्याची थट्टा ऐकून **वसुमती निपुणिकेला** ह्मणाली, 'ह्या ब्राह्मणानें आपल्या मित्राचें चांगलें समाधान केलें नाहीं ग?'

**माणवक** ह्मणाला, 'खरोखर पहाल तर मी आपल्या मित्राला विचित्र खाऊ देऊन त्याचें समाधान केलें आहे.'

**राजा** अंमळ रागावून ह्मणाला, 'मूर्खा! या तुझ्या बोलण्यानें मी अपराधी नसतां मुद्दाम अपराधी ठरलों जात आहें.'

राणी **वसुमती** ह्मणाली, 'महाराज, यांत आपला कांहीं अपराध नाहीं, मीच अपराध केला आहे. कारण, यावेळीं माझें दर्शन आपल्याला अगदीं प्रतिकूल वाटत असूनही मी पुढें उभी राहिलें आहें. असो; मी आपली जातें येथून.' असें बोलून रागानें जायाला निघाली.

तिचें समाधान करीत होत्साता **राजा** ह्मणाला, 'खरेंच मी अपराधी आहें. हे रंभोरु! आतां प्रसन्न हो आणि हा राग सोडून दे. धनी रागावल्यावर चाकर निरपराधी आहे असें कसें ह्मणतां येईल!' असें बोलून राजानें तिच्या पायांवर डोकें ठेवलें.

वस्तुतः यावेळीं तिनें आपला राग सोडला पाहिजे

होता; पण ती मनांत ह्मणाली, अधीरपणानें एवढ्यावरच समाधान मानून मी ह्या प्रार्थनेला बहुमान देणार नाहीं असें ह्मणतें, पण मेलें मन अगदीं सरळ असल्यामुळें पुढें पश्चात्ताप होईल ह्मणून भय वाटतें! असा विचार करून **राजाला** झिटकारून **राणी** तशीच फणकाऱ्यानें निघून गेली.

ती गेली हें पाहून **माणवक राजाला** ह्मणाला, 'गड्या, आतां ऊठ. उगीच कां दुःख करतोस? गढूळ झालेल्या पावसाळ्यांतल्या नदीसारखी ती तुझी शिरजोर बायको प्रसन्न ( स्वच्छ ) न होतां गेली.'

हें ऐकून तो वर उठला. वस्तुतः राजा **पुरूरव्याची** केवढी योग्यता! तो एकटा सार्वभौमपदवीचा उपभोग करीत होता, इतकेंच नव्हे, तर त्रैलोक्यांत त्याचा दरारा होता. **इंद्रा**दिक देव त्याची मर्जी अप्रसन्न न करण्याविषयीं प्रयत्न करीत होते. मोठमोठे वीर त्याच्या पायांचे रज झेलीत होते. अशा **राजाला** यःकश्चित् त्याच्या बायकोनें इतकें तुच्छ करावें, हें मोठें आश्चर्य! राणी **वसुमतीनें राजाला** झिटकारिलें, तरी त्याला त्याचा मुळींच राग आला नाहीं. स्त्रीरूपिणी मायेचा प्रभाव फार विलक्षण आहे. मोठमोठे साऱ्या जगाला जिंकणारे वीर देखील ह्या स्त्रीरूपिणी मायेच्या पायांवर लोळत असतात व ती त्यांला कस्पटासमान मानते!

**राजा माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, राणी रागावून गेली हें कांहीं चांगलें झालें नाहीं. आवडत्या मनुष्यानें त्यांच्यावर प्रेम असल्यावांचून हवें तितकें गोडगोड भाषण केलें, तरी चतुर स्त्रियांच्या तें मनांत देखील जात नाहीं.

जसा खोटा मणि उत्तम पारख्याच्या मनांत भरत नाहीं, तशीं तीं भाषणें त्यांना मुळींच आवडत नाहींत.'

यावर **माणवक** ह्मणाला, 'अरे, ती रागावून गेली हें तुला एक प्रकारें चांगलेंच झालें. डोळे आलेल्या मनुष्याच्या समोर दिव्याची जोत कशाला पाहिजे?'

**राजा** ह्मणाला, 'छत्! असें बोलूं नको. अरे, माझें मन **उर्वशी**कडे लागलें आहे, तरी **राणी**चा पूर्वीप्रमाणेंच मी बहुमान ठेवतों. खरोखर ती रागावली असतां मला मुळींच चैन पडलें नसतें; पण यावेळीं मी तिच्या पायां पडलों तरी ती मला झिटकारून गेली ह्मणून जरा मन घट्ट केलें आहे.'

**माणवक** ह्मणाला, 'अहो महाराज, तुमचें तें धैर्य घटकाभर असूंद्या एका बाजूला. भुकेल्या ब्राह्मणाचे प्राण वांचतील अशी कांहीं तजवीज करा. ही जेवणाखाणाची वेळ आहे. अगदीं दोनप्रहर झाली आहे.'

हें ऐकून **राजा** सूर्याकडे पाहून ह्मणाला, 'अरे हो! खरेंच, दोन प्रहर झाली. हे पहा मोर उन्हानें संतप्त झाल्यामुळें झाडाच्या मुळांत थंड छायेखालीं येऊन बसले आहेत; तसेच पांगाऱ्याच्या कळ्या फोडून हे भ्रमर त्यांच्या आंत जाऊन बसले आहेत. हे कारंडव पक्षी तापलेलें सरोवरांतलें पाणी सोडून किनाऱ्यावरच्या थंड कमलिनीच्या आश्रयाला बसले आहेत. तसेंच या क्रीडागृहांतल्या पिंजऱ्यांत असलेला पोपटही उन्हानें व्याकूळ होऊन पाणी मागतो आहे.' असें बोलून **माणवकासहवर्तमान राजा** स्नानसंध्या करायाला निघून गेला.

---

# भाग तिसरा.

मागच्या भागांत **इंद्राच्या** हुकुमावरून **उर्वशी** स्वर्गलोकाला गेली हें सांगितलेंच आहे. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें जाणें तिला भाग होतें, ह्मणून ती **राजाला** सोडून गेली; तरी तिचें मन एकसारखें त्याच्याकडेच लागलें होतें. त्या दिवशीं नाटक करायचें असा संकेत ठरला होता. त्याप्रमाणें **भरतमुनीनें** पूर्वीं शिकवून तयार केलेल्या अप्सरांना त्या त्या पात्रांचा वेष देऊन **लक्ष्मीस्वयंवर** नामक नाटकाचा प्रयोग केला; पण जिचें मन राजा **पुरूरव्याकडे** गुंतलें होतें, अशा **उर्वशीचा** त्या नाटकांत मोठा प्रमाद घडला.

**भरतमुनीचे पेलव** आणि **गालव** या नांवांचे दोघे प्रिय शिष्य होते. नाटकाचा प्रयोग करण्याकरितां जातेवेळीं **भरतमुनीनें पेलवाला** बरोबर घेऊन **गालवाला** अग्निहोत्राच्या रक्षणाकरितां आश्रमांतच ठेविलें होतें. त्याला तो प्रयोग पाहण्याची मोठी उमेद होती; पण गुरूच्या आज्ञेपुढें उपाय नाहीं, ह्मणून तो आश्रमांतच राहिला. नाटकाचा प्रयोग पूर्ण करून **भरतमुनि** परत आश्रमांत आले, तेव्हां त्या दोघां शिष्यांची भेट झाली. **गालवाला पेलव** केव्हां भेटेल व त्याच्याकडून नाटकाची खबर आपण केव्हां ऐकून घेऊं असें झालें होतें.

**पेलव** दृष्टीस पडतांच **गालव** ह्मणाला, ‘ गड्या, मी रात्रीं ह्या आश्रमांत अग्निहोत्र राखीत बसलों होतों आणि तूं गुरूजींच्या बरोबर तिकडे गेला होतास, तर

आतां सांग पाहूं तिकडची हकीकत. गुरूजींच्या नाटक-प्रयोगानें देवसभा खुष झाली कीं नाहीं?'

हें ऐकून **पेलव** ह्मणाला, '**गालवा**, देवसभा कशी खुष झाली असेल हें मला कांहीं समजत नाहीं. कारण, **सरस्वतीनें** केलेल्या त्या **लक्ष्मीस्वयंवर** नांवाच्या नाटकाच्या प्रयोगांत **उर्वशीनें** मुख्य पात्राचा वेष घेतला होता; पण ती निरनिराळ्या रसांचा आविर्भाव करतेवेळीं उन्मत्त झाल्यासारखी दिसत असून वरचेवर चुकत होती.'

**गालव** ह्मणाला, 'अरे, ह्या तुझ्या बोलण्यावरून तिच्या हातून कांहीं दोष झाला असेल असें वाटतें. आणि तूं त्या दोषाचा उल्लेख न करितां अर्धेंच बोललास.'

**पेलव** ह्मणाला, 'अंः! त्यांत काय आहे? अरे, प्रमादानें तिच्या भाषणांत चूक झाली.'

**गालव** ह्मणाला, 'कशी काय चूक झाली ती सांग.'

**पेलव** ह्मणाला, 'अरे, त्या नाटकांतलें मुख्य पात्र **लक्ष्मी**. तिचें सोंग **उर्वशीनें** घेतलें होतें. आणि **वारुणी**-देवीचें§ सोंग **मेनकेनें** घेतलें होतें. स्वयंवराचा प्रसंग आला

§ समुद्रापासून अमृत काढण्याकरितां देव आणि दैत्य यांनीं समुद्राचें मंथन केलें, अशी पुराणांतरीं सविस्तर कथा वर्णन केली आहे. मंथन करतेवेळीं अमृत निघण्यापूर्वीं लक्ष्मी, कौस्तुभ नांवाचा मणि, कल्पवृक्ष इत्यादि उत्तम वस्तु समुद्रांतून निघाल्या. वारुणी हें सुरेचें नांव आहे. त्या सुरेच्या देवतेलाही वारुणीच म्हणतात, तीही यावेळीं उत्पन्न झाली. लक्ष्मी आणि वारुणीदेवी ह्या एकाच ठिकाणांतून म्हणजे समुद्राच्या पोटांतून निघाल्यामुळें, त्यांचें परस्पर सख्य अथवा बहिणींचें नातें लागतें. लक्ष्मी अप्रतिम रूपवती स्त्री असल्यामुळें देव आणि

तेव्हां **वारुणी**देवी तिला ह्मणाली, 'गडे **लक्ष्मी**, सर्व त्रैलोक्यांतले पुरुष येथें आले आहेत. **विष्णू**सहवर्तमान सर्व लोकपाल आले आहेत. तर यांतून कोणत्या पुरुषावर तुझें मन बसलें आहे?'

ह्या तिच्या प्रश्नाचें—**लक्ष्मी**चें सोंग घेतलेल्या **उर्वशी**नें भलतेंच उत्तर दिलें. तिनें **पुरुषोत्तमावर** (**विष्णूवर**) मन बसलें आहे असें ह्मणायचें, तें सोडून चटकन्—**पुरूरव्यावर** मन बसलें आहे, असें तिच्या तोंडांतून निघालें.

हें ऐकून **गालव** ह्मणाला, 'पुढें जसें व्हायचें असेल तशी बुद्धि होते. आणि इंद्रियें देखील त्यालाच अनुलक्षून चालतात याला काय उपाय? बरें पण तिच्या तोंडचे हे शब्द ऐकून गुरुजी तिच्यावर रागावले नाहींत?'

**पेलव** ह्मणाला, 'होहो. गुरुजींनीं तिला तत्काल शाप दिला, पण **इंद्रा**नें तिच्यावर अनुग्रह केला.'

**गालव** ह्मणाला, 'तो कसा काय?'

---

दैत्य या उभयतांचेंही तिच्यावर मन बसलें व तिच्या निमित्तानें आपसांत कलह होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां अमृत बाहेर काढायचें हें आपलें मुख्य कारण तसेंच राहील, म्हणून इंद्रानें कलह मिटविण्याकरितां सर्वांना सांगितलें कीं, 'ही लक्ष्मी स्त्री आहे. तेव्हां हिच्यावर कोणी बलात्कार करणें योग्य नाहीं. हिच्या स्वयंवराची तयारी करावी म्हणजे त्यांत तिच्या इच्छेस येईल त्याला ती वरील.' ही युक्ति देव आणि दैत्य या उभयतांनाही मान्य झाली. व त्याप्रमाणें स्वयंवरांत तिनें विष्णूला वरलें, अशी कथा आहे. तिला अनुसरून हें नाटक रचलें होतें. व स्वयंवराच्या प्रसंगीं वारुणीदेवी लक्ष्मीचें साह्य करायला आली होती.

**पेलव** ह्मणाला, 'गुरुजी **उर्वशीला** ह्मणाले, 'तूं, मी शिकविलें होतें तें सोडून, भलतेंच नांव घेतलेंस, त्यापेक्षां तूं ह्या देवलोकांत राहणार नाहींस.'

याप्रमाणें गुरुजींनीं तिला शाप दिला, तेव्हां लाजेनें खालीं तोंड घातलेल्या **उर्वशीकडे** पाहून **इंद्र** तिला ह्मणाला, 'ज्या राजर्षि **पुरूरव्यावर** तुझें मन बसलें आहे तो माझा युद्धप्रसंगांत साह्य करणारा मित्र आहे. याकरितां तूं आतां त्याचेंच प्रिय कर. त्याच्या पासून तुला संतान होईपर्यंत तूं त्या **पुरूरव्याजवळ** खुशाल रहा.'

हें ऐकून **गालव** ह्मणाला, 'दुसऱ्याच्या पराक्रमाला बहुमान देणाऱ्या **इंद्राला** असें करणें योग्यच आहे.'

**पेलव** वर पाहून ह्मणाला, 'अरे, काय आह्मी गोष्टी सांगत बसलों आहों! या बोलण्याच्या नादांत आंघोळीची वेळ देखिल चुकली. चल आतां आपण स्नान करून गुरुजींच्या सेवेला हजर होऊं या.' असें बोलून ते दोघेही स्नानास निघून गेले व स्नान वगैरे आटपून आपल्या गुरूच्या सेवेंत तत्पर झाले.

वर सांगितल्याप्रमाणें **इंद्राला**, **उर्वशीनें** दुसरीकडे रहावें, हें मुळींच आवडत नव्हतें, तरी राजा **पुरूरवा** वरचेवर मोठमोठ्या लढाईच्या प्रसंगांत त्याचें साह्य करीत होता, तेव्हां त्याला राजी ठेवण्याकरितांच **इंद्रानें उर्वशी**ला तशी आज्ञा केली. **उर्वशीला** कोणात्याही निमित्तानें **पुरूरव्याची** सोबत पाहिजेच होती. वस्तुतः स्वर्गासारख्या सर्व सुखाच्या माहेरघरांत राहणारीला ह्या दुःखी मृत्युलोकांत राहणें ही कांहीं लहानसहान शिक्षा नव्हे, व तीबद्दल विशेष दुःख झाल्यावांचून रहावयाचें नाहीं; पण

**पुरूरव्या**च्या समागमाची इच्छा करणाऱ्या **उर्वशी**ला, **भरत**मुनीचा शाप हा शाप वाटला नसून, मोठा अनुग्रहच वाटला; आणि ती **पुरूरव्या**जवळ जाण्याच्या तयारीला लागली.

वर सांगितल्याप्रमाणें **राजा**च्या सुदैवानें दुःखाग्नीनें संतप्त झालेल्या त्याच्या शरीराला शांत करण्याकरितां अमृताची वृष्टि त्याच्यावर वळली होती. ती प्राप्त होण्याचाच काय तो अवकाश होता, तों तिला योग्य संधिही मिळाली.

राणी **वसुमती** रागावून गेली होती हें वर सांगितलेंच आहे. ती आपल्या महालांत गेल्यावर कांहीं वेळानें राग शांत झाल्यावर तिला आपल्या कृत्याचा मोठा पश्चात्ताप झाला. **राजा** आपल्या पायां पडला असून त्याला आपण धिक्कारलें हें आपण चांगलें केलें नाहीं, असें तिला वाटलें. तथापि स्त्रियांचा स्वभाव मोठा मानी असल्यामुळें योग्य समय मिळाल्यावांचून राजाची पायधरणी करण्यालाही तिला फार लाज वाटूं लागली.

इकडे **राजा**ही तिनें आपल्याला झिटकारलें ह्मणून त्या दिवसापासून राणीच्या भेटीला गेला नाहीं. याप्रमाणें त्या दोघां नवराबायकोंत अबोला आला. दोघेंही एकमेकांच्या भेटीविषयीं उत्कंठित झालीं होतीं; तथापि अभिमानानें आपण आधीं कां भेटावयाला जावें? असें त्यांच्या मनांत येत होतें.

**राजा उर्वशी**च्या नादांत असल्यामुळें तो राणीविषयीं फारसा उत्कंठित नव्हता. पण ती त्याच्याविषयीं अतिशय उत्कंठित झाली असून तो पायां पडला असतांही आपण त्याचा अनादर केला, हें तिच्या मनाला एकसारखें खात

होतें; तथापि कांहीं तरी निमित्त असल्यावांचून **राजाला** कसें भेटावें याची तिला फार लाज वाटत होती. बरेच दिवस गेले तरी कांहीं निमित्त मिळालें नाहीं, तेव्हां कौमुदीव्रत नांवाचें तिनें एक व्रत आरंभिलें आणि त्या व्रताच्या निमित्तानें **राजाला** भेटण्याची योजना केली.

व्रताला आरंभ केला, त्या दिवशीं **निपुणिके**च्या हातीं तिनें **राजाला** निरोप पाठविला होता व सांगतेच्या वेळीं आपण अवश्य तेथें यावें अशी विनंती केली होती. व **राजा**नेंही ती मान्य केली होती. त्याप्रमाणें सांगतेचा दिवस ठरवून त्या दिवशीं तिनें **राजाला** पुनः आठवण देण्याकरितां जनानखान्यांतल्या चोपदाराला **राजा**कडे पाठविलें.

राजे लोकांच्या जनानखान्यांत बहुतकरून पंढ, कुबडे, मुके, बहिरे किंवा म्हातारे अशाच प्रकारचे नोकर ठेवण्याची पूर्वकाळीं चाल होती. त्याप्रमाणें हा चोपदारही अगदीं म्हातारा होता. **राणी**चा हुकूम होतांच तो बिचारा म्हातारा काठी टेंकीत टेंकीत **राजा**कडे निघाला. त्याच्यानें चालवत नव्हतें. पण हुकुमाप्रमाणें गेलें पाहिजे, म्हणून तो कसा तरी हळू हळू चालला होता. तो मनांत म्हणाला, भर तारुण्यांत द्रव्य संपादन करण्याविषयीं सर्व कुटुंबी लोक यत्न करीत असतात, आणि आपलें वय उतार झालें म्हणजे कुटुंबाचा भार मुलाच्या मस्तकावर ठेवून आपण खुशाल हरि हरि म्हणत विश्रांति घेतात; पण आमचें सगळेंच उलटें झालें आहे. मी इतका म्हातारा झालों, तरी अद्याप चाकरी सुटत नाहीं. दिवसेंदिवस वेळच्या वेळीं काम न झाल्यामुळें धन्याकडून आपला अपमान सहन करावा लागतो. अशी ही या वयांतली आमची

सेवा एक प्रकारें बंदिशालाच ह्मटली तरी चालेल. दुसऱ्या कोणाचीही चाकरी करतां येईल, पण बुवा बायकांची चाकरी करणें फारच कठीण आहे! असो.

**काशिराजा**ची कन्या राणी **वसुमती** हिनें मला आज्ञा केली आहे कीं, 'व्रताची सांगता करण्याकरितां मी आपला अभिमान एकीकडे ठेवून **निपुणिके**करवीं महाराजांला विनंति केली आहे. त्याच गोष्टीची आज तूं त्यांच्याकडे जाऊन आठवण दे.' यावेळीं महाराज संध्याकाळच्या स्नानसंध्येंत गुंतले आहेत, तर त्यांचें तें कृत्य आटपतांच आपण त्यांला **राणी**ची विनंति कळवावी.

संध्याकाळची शोभा पाहून ह्मणाला, दिवस सरण्याच्या वेळची या राजवाड्यांतली स्थिति मोठी रमणीय आहे. खेळण्याकरतां बाळगलेले, वासयष्टीवरीं† जणुं काय खोदलेच आहेत, असे झोंपेनें आळसावलेले हे मोर स्तब्ध बसले आहेत. जाळ्यांतून निघालेल्या धूपाच्या धुरांनीं हे पारवेच आहेत कीं काय असा आगाशांवर संदेह होत आहे. जिकडे तिकडे रांगोळ्या घालून गंध फूल लावून पूजा केलेले दिवे त्यांवर ठेवीत आहेत.

इतक्यांत **राजा** संध्या आटपून दुसऱ्या महालांत जायाला निघाला होता, तो ह्या चोपदाराच्या **दृष्टीस** पडला. राजे लोकांची विलक्षण चैन असते. त्यांतूनही तो विलासी असला ह्मणजे मग तर फारच. राजा **पुरूरवा** या महालांतून त्या महालांत जात होता तरी त्याच्या बरोबर कांहीं स्त्रिया मशाली पेटवून सभोंवती चालत होत्या.

---

† जमिनींत एक खांब रोंवून त्याच्यावर पक्षी राहण्याकरितां एक लहानसें घरटें तयार करतात त्याला वासयष्टि म्हणतात.

त्यांना पाहून चोपदार मनांत ह्मणाला, कुंळविणींनीं हातांत धरलेल्या मशालींनीं वेढलेला हा **राजा**—पायथ्याशीं सभोंवतीं फुललेल्या पांगाऱ्याच्या झाडांनीं वेष्टिलेल्या पर्वतासारखा दिसतो. आतां आपण सहज याच्या दृष्टीस पडूं अशा ठिकाणीं उभे राहून तो येण्याची वाट पहावी. असा विचार करून चोपदार **राजा** येण्याच्या वाटेंत एका बाजूला उभा राहिला.

इकडे **उर्वशी**च्या दर्शनाविषयीं उत्कंठित झालेला **राजा** मनांत ह्मणाला, राजकार्यांत मन गुंतल्यामुळें त्यावेळीं उत्कंठा अंमळ कमी झाली होती. अशा स्थितींत दिवस फारसा संकटावांचून गेला; पण आतां विनोद करण्याचें कांहीं साधन नसल्यामुळें अत्यंत मोठी वाटणारी ही रात्र कशी घालवावी!

इतक्यांत **राजा** अगदीं जवळ आला असें पाहून चोपदार पुढें होऊन त्यानें त्याला मुजरा केला, आणि मोठ्या नम्रतेनें ह्मणाला, 'महाराज, राणी साहेब विनंति करताहेत कीं, मणिहर्म्य नांवाच्या महालाच्या गच्चीवरून चंद्र चांगला दिसतो, तर तेथें आपण माझी वाट पहावी. रोहिणीचा समागम होईतोंपर्यंत आपण तेथें असावें अशी माझी प्रार्थना आहे.'

हें ऐकून **राजा** चोपदाराला ह्मणाला, 'अरे, राणीला विनंति कर कीं, तुझी मर्जी असेल ती गोष्ट मला मान्य आहे.'

**राजा**चें उत्तर ऐकून चोपदार त्याला मुजरा करून निघून गेला. इकडे **राजा माणवका**ला ह्मणाला, 'गड्या, खरेंच का रे **राणी**नें व्रत केलें आहे, आणि त्याकरतांच ही सर्व तयारी आहे?'

**माणवक** ह्मणाला, 'मला तर असें वाटतें कीं, ती त्या दिवशीं रागानें तुला झिटकारून गेली होती, त्या गोष्टीचा तिला पश्चात्ताप झाला असेल. व आज हें व्रताचें निमित्त करून त्या दिवशीं जो तिच्याकडून तुझा अपमान झाला तो दूर करावा असें तिच्या मनांत असेल.'

**माणवका**चा हा तर्क वस्तुतः खरा होता व तो **राजा**लाही मान्य झाला. तो ह्मणाला, 'तूं बरावर सांगितलेंस. कारण नवऱ्यानें नमस्कार केला तरी त्याचा तिरस्कार करून जाणाऱ्या बायकांना नंतर मोठा पश्चात्ताप होतो; तरी गुप्तपणें त्या फार लाजत असतात. व प्रियपतीच्या संबंधानें त्यांना एक प्रकारचा हृद्रोगच लागतो. बरें असो. **राणी**च्या सांगण्याप्रमाणें आपण त्या मणिहर्म्याच्या गच्चीवर जाऊन तिची वाट पहात बसूं या.' असें बोलून **माणवका**सह तो तिकडे जाण्यास निघाला.

त्या महालाच्या जवळ पोंचतांच **माणवक** पुढें होऊन **राजा**ला ह्मणाला, 'गंगेच्या लाटांसारखा शीतल अशा स्फटिकांच्या पायऱ्यांचा हा जिना आहे. या जिन्यावरून नेहमीं रमणीय दिसणाऱ्या ह्या मणिहर्म्यपृष्ठावर चढ.'

हें ऐकून **राजा**सह सर्व मंडळी त्याच मार्गानें वर चढली. गच्चीवर गेल्यावर आकाशाकडे पाहून **माणवक** ह्मणाला, 'चंद्रोदय आतां लवकरच होईल असें वाटतें. कारण, अंधकारानें मोकळें झालेलें हें पूर्वदिशेचें तोंड लाल दिसतें आहे.'

**राजा** ह्मणाला, 'चांगलें बोललास. उदयकालच्या गुप्त चंद्राच्या किरणांनीं अंधकाराला दूर झुगारून दि-

त्यामुळें जणुं काय पुढें आलेले अंधकाररूपी केंस मागें सारले आहेत असें हें पूर्वदिशेचें मुख माझ्या डोळ्यांला मनोहर वाटतें.'

इतक्यांत चंद्र दिसूं लागला. त्याला पाहून **माणवक** हंसत हंसत **राजा**ला ह्मणाला, 'हा पहा अर्ध्या फोडलेल्या लाडवासारखा दिसणारा ओषधींचा राजा भगवान् चंद्र उदय पावला आहे!'

त्यानें चंद्राला लाडवाची उपमा दिली ती ऐकून **राजा** हंसून ह्मणाला, 'खादाडाला पाहिजे तो विषय आला तरी त्याचें खाण्यावर पर्यवसान होतें.' चंद्राला नमस्कार करून ह्मणाला, 'हे भगवन् नक्षत्रांच्या राजा, धर्मिष्ठ लोकांचीं क्रियाकर्मे यथाकालीं व्हावीं ह्मणून सूर्यांत प्रवेश करणाऱ्या‡ व स्वतः चंद्ररूपानें अमृतवृष्टि करून पितर आणि देव यांना तृप्त करणाऱ्या, रात्रीच्या वेळीं चहूंकडे पसरलेल्या अंधकाराचा नाश करणाऱ्या, शंकराच्या मस्तकावर राहणाऱ्या, भगवन् तुला नमस्कार असो!'

चंद्र हा, राजा **पुरूरव्या**चा आजोबा होतो. तेव्हां तें नातें मनांत आणून **माणवक राजा**ला ह्मणाला, 'अहो महाराज, या (आपल्या) ब्राह्मणाच्या मुखानें तुमचे आजोबा तुह्मांला आज्ञा देत आहेत. ते ह्मणतात, आतां किती वेळ असे उभे रहाणार. एकदां खालीं बसा. तर माझ्या—नाहीं नाहीं आजोबांच्या आज्ञेनें आपण

‡ चंद्र हा स्वतः प्रकाशमान नसून सूर्याच्या प्रकाशानें त्याला तेज येतें, या गोष्टीला अनुसरून वरील वर्णन आहे, असें समजावें.

एकदांचे खालीं बसाल तर मीही घटकाभर सुखानें खालीं बसेन असें ह्मणतों.'

चंद्राकडे पाहण्याच्या नादांत **राजा** फार वेळ उभा राहिला होता. व सर्व मंडळी त्याच्या बरोबर तिष्ठत होती, ह्मणून **माणवकानें** वर सांगितलेलें मुद्दाम ढोंग केलें. त्याचा मतलब समजून **राजा**—बरें तसें कां होईना, बसूंया —असें ह्मणून खालीं बसला. आणि मशाली घेतलेल्या दासी सभोंवतीं उभ्या होत्या, त्यांच्याकडे पाहून ह्मणाला, 'चंद्राचा प्रकाश पडला आहे, तेव्हां आतां ह्या मशाली ठेवून उजेडाची द्विरुक्ति कशाला हवी? तर मशाली घेऊन जा आणि तुह्मी विश्रांति घ्या.' याप्रमाणें **राजाची** आज्ञा होतांच त्या दिवटिवाल्या दासी मुजरा करून निघून गेल्या.

यावेळीं दुसरें कोणी जवळ नव्हतें ह्मणून चंद्राकडे पाहून **राजा माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, **राणी** यायला आणखी दोन घटकांचा अवकाश लागेल असें वाटतें, आणि यावेळीं येथें अगदीं एकांत आहे ह्मणून तुला माझी काय अवस्था झाली आहे ती सांगतों.'

**राजा** आपली जी अवस्था सांगणार तींत बहुतकरून **उर्वशीचा** समागम घडत नाहीं ही गोष्ट येणार, असें समजून **माणवक** ह्मणाला, 'अहो, पण ती तुमची (**उर्वशी**) येथें कोठें दिसत नाहीं. तथापि तिचें तें प्रेम पाहून आशेनें कसा तरी जीव धारण करतां येईल.'

**राजा** ह्मणाला, 'हो. असें खरें; तथापि माझ्या मनाला फार संताप होत आहे. वांकड्या तिकड्या शिळा मध्यें पडल्यामुळें ज्याचा वेग खळित झाला आहे असा नदीचा प्रवाह आणि वरचेवर प्रियजनांच्या समागमसु-

खाला विघ्नें आलीं आहेत असा काम हे दोन्ही एकसारखे होतात.'

**माणवक** ह्मणाला, 'तूं काळजी करूं नकोस. तिच्या उत्कंठेनें दुःखित झाल्यामुळें तुझें हें शरीर गलित झालें आहे, त्यावरून अप्सरांशीं तुझा समागम होईल असें दिसतें.'

इतक्यांत **राजाचा** उजवा हात स्फुरण पावला. हा एक चांगला शकुन झाला असें समजून तो ह्मणाला, 'अत्यंत व्यथित झालेल्या मला आशा उत्पन्न करणारीं भाषणें बोलून जसा तूं समाधान करतोस, तसाच हा माझा उजवा हातही स्फुरण पावून समाधान करीत आहे.'

**माणवक** ह्मणाला, 'हं. हें माझें बोलणें खोटें आहे असें समजूं नको. माझ्या सारख्या महाब्राह्मणाचें वाक्य कधींही खोटें व्हायचें नाहीं.'

हें ऐकून **उर्वशी**विषयीं उत्कंठित झालेला **राजा** आशाभृत होऊन बसला.

इकडे या उभयतांचा संवाद चालला असतां **माणवकानें** आपलें वचन खोटें होणार नाही असें सांगितलें. त्याप्रमाणें सुदैवानें त्याचें वचन खरें होण्याचा प्रसंग आला. **उर्वशीला** शाप झाला होता हें वर सांगितलेंच आहे. ती **राजाकडे** येण्याविषयीं तयार झाली असून चांगली संधि मिळण्याची वाट पहात होती. ती याच वेळीं आपली प्रियमैत्रीण **चित्रलेखा** हिच्यासहवर्तमान अभिसारिकेचा†

---

† जी स्त्री प्रियपुरुषाशीं संकेत करून नियमित स्थलीं त्याच्या भेटीला जाते, तिला 'अभिसारिका' म्हणतात. अशा अभिसारिका स्त्रियांचा पेहराव निराळ्या प्रकारचा असतो. दुसऱ्याला

वेष घेऊन विमानांत बसून **राजाकडे** येण्यास निघाली. आपण केलेला नट्टापट्टा पाहून **चित्रलेखेला** ह्मणाली, 'गडे, यावेळीं मी केवळ मोत्यांचेच दागिने घातले आहेत, व काळी पैठणी नेसलें आहे. हा माझा वेष तुला आवडलाना?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'यावेळच्या तुझ्या वेषाची प्रशंसा करण्याची माझी तर शक्ति नाहीं. हें मात्र माझ्या मनांत येतें कीं, यावेळीं मीच **पुरूरवा** व्हावें.'

**उर्वशी** ह्मणाली, 'गडे, मी तर अगदीं असमर्थ आहें. तेव्हां तूंच जाऊन त्याला घेऊन ये, नाहीं तर मला तरी त्या भाग्यशाली पुरुषाजवळ घेऊन जा.'

यावेळीं **उर्वशीचें** विमान **प्रतिष्ठान** नगराच्या जवळ येऊन पोंचलें होतें. हें पाहून **चित्रलेखा** ह्मणाली, '**कैलास** पर्वताच्या शिखरासारखें शोभिवंत त्या तुझ्या प्रियतमाचें गृह **यमुनेंत** प्रातिबिंबित झाल्यासारखें दिसतें आहे. यावरून आपण अगदीं त्याच्या जवळ आलों आहों.'

**उर्वशी** ह्मणाली, 'तर मग माझें हृदय चोरणारा तो ( **पुरूरवा** ) यावेळीं कोठें आहे व काय करतो आहे, तें आपल्या प्रभावानें समजून घे.'

हें ऐकून **चित्रलेखा** मनांत ह्मणाली, घटकाभर हिच्याशीं खेळलें पाहिजे. **उर्वशीला** ह्मणाली, 'सखे, मनोरथानें कल्पना केलेल्या प्रियेच्या समागमाचा अनुभव घेत एका विलासी जाग्यांत बसलेला तो माझ्या दृष्टीस पडला.'

---

आपली ओळख पटूं नये म्हणून त्या काळें वस्त्र नेसतात व जे दागिने अंधारांत चकचकीत दिसणार नाहींत तेच अंगावर घालतात. रत्नांचे अलंकार त्यांचा प्रकाश पडेल ह्मणून मुळींच धारण करीत नाहींत. हें मुळांत उर्वशीच्या भाषणावरूनच व्यक्त झालें आहे.

**उर्वशी** ह्मणाली, 'चल, माझें हृदय हें तुझें सांगणें खरें मानीत नाहीं. सखे **चित्रलेखे**, खरोखर तूं आपल्या मनाला विचारून हें बोलतेस का? प्रियसमागम होण्यापूर्वीं-च त्यानें माझें हृदय चोरून नेलें.'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'तर मग हा पहा, मणिहर्म्यांच्या गच्चीवर फक्त **माणवकाला** मात्र बरोबर घेऊन बसला आहे. चल आपण त्याच्याजवळ जाऊं ये.'

इकडे **राजा माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, जशी जशी रात्र वाढते तशी तशी ही माझी मदनबाधाही वाढत चालली आहे.'

यावेळीं **उर्वशी राजाच्या** जवळ उभी राहून गुप्त-रूपानें तो आपल्या मित्राशीं काय बोलतो तें ऐकत होती. **राजाचें** वरील भाषण ऐकून ती **चित्रलेखेला** ह्मणाली, 'गडे, या वाक्याचा अर्थ स्पष्ट समजत नाहीं, यामुळें माझें हृदय कांपूं लागलें आहे. आमचा संशय निवृत्त होईपर्यंत आपण येथेंच उभ्या राहून याचे उद्गार ऐकूं या.' हें तिचें सांगणें **चित्रलेखेलाही** मान्य झालें, आणि दोघी तेथेंच उभ्या राहिल्या.

इकडे **माणवक** ह्मणाला, 'तापलेल्या शरीराला थंड करणारे हे चंद्राचे अमृतमय किरण सेवन कर ह्मणजे बरें वाटेल.'

**राजा** ह्मणाला, 'गड्या, असल्या उपायांनीं हा रोग जाण्यासारखा नाहीं. कारण असें पहा कीं, सुगंधि पुष्पांची शय्या, तसेंच चंद्राचे किरण, मलयागरु चंदनाचा सर्वांगाला लेप, रत्नांचे हार हीं सर्व साधनें माझ्या मदन-बाधेला दूर करण्यास समर्थ नाहींत. केवळ ती दिव्य

स्त्री **उर्वशी** किंवा तिच्या संबंधाच्या कथा यांनींच काय तें होईल.'

हें ऐकून **उर्वशी** आपल्या हृदयाला ह्मणाली, 'बा हृदया, तूं मला सोडून याच्याकडे गेलेंस त्याचें फळ तुला यावेळीं प्राप्त झालें.'

**राजाच्या** बोलण्यावर **माणवक** ह्मणाला, ' मीही असाच दुःखी होतों. जेव्हां जेव्हां मला बासुंदी किंवा श्रीखंड मिळत नाहीं, तेव्हां तेव्हां त्यांचेंच मनांत चिंतन करतों व त्यांच्याच गोष्टी बोलून कशी तरी मनाची करमणूक करून घेतों! '

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'तुझ्या सारख्या खादाडाला तसें होण्याचा संभव आहे व तें तुला लवकरच मिळेल.'

**माणवक** ह्मणाला, 'असें असेल तर ती (**उर्वशी**) ही तुला लवकरच प्राप्त होईल.'

**राजा** ह्मणाला, 'गड्या, मला असें वाटतें कीं,—

इतक्यांत इकडे **चित्रलेखा** ह्मणाली, 'अग असंतुष्टे, आतां हा काय बोलतो तें ऐक.'

**माणवक** ह्मणाला, ' बरें तुला काय वाटतें तें सांग पाहूं. '

**राजा** ह्मणाला, ' अरे, प्रथम तिची भेट झाली होती त्या वेळीं रथाच्या हिसक्यानें ती ह्या माझ्या उजव्या अंगावर येऊन पडली. तेव्हां या अंगाला जो तिचा धक्का लागला, त्याच्या योगानें हें उजवें अंग धन्य झालें. आणि हें बाकीचें शरीर केवळ पृथ्वीला भारभूत झालें आहे! '

**उर्वशीला** जें ऐकावयाचें होतें तें ऐकू आलें. ती ह्मणाली, ' आतां कशाला वेळ लावूं?' असें बोलून ती एक-

दम **राजाच्या** पुढें जाऊन उभी राहिली; पण तिनें आपल्या अंगावरची तिरस्करिणी विद्या दूर केली नव्हती, यामुळें ती त्याला दिसली नाहीं, ह्मणून तो स्वस्थ होता. हें पाहून **उर्वशी** ह्मणाली, 'अग **चित्रलेखे**, मी अगदीं पुढें येऊन उभी राहिलें आहे, तरी महाराज मजविषयीं उदासीनच आहेत.'

**चित्रलेखा** हंसून ह्मणाली, 'अग, तूं फारच गडबड केलीस. आपल्या अंगावरची तिरस्करिणी काढून घेतल्यावांचून तूं कशी त्याच्या दृष्टीस पडशील?'

**उर्वशी राजाच्या** भेटीविषयीं अगदीं आतुर झाली होती व **चित्रलेखेनें** सांगितल्याप्रमाणें तिरस्करिणी काढून घेऊन **राजाच्या** दृष्टीस पडायची तिची तयारी चालली होती; पण इतक्यांत एक विघ्न प्राप्त झालें. **राणी** चंद्राची पूजा करण्याकरितां तेथें येणार होती ती अगदीं जवळ येऊन पोंचली. हातांत मशाली घेतलेल्या दासी तिच्या सभोंवतीं चालत असून चोपदारीण—बाईसाहेब, अशा इकडून या, असें सांगत होती. तो तिचा शब्द ऐकून सर्वांचे कान तिकडे लागले व **उर्वशी चित्रलेखेस**हवर्तमान हिरमुसल्यासारखी झाली. तिनें आपल्या अंगावरची तिरस्करिणी विद्या काढून घेतली नाहीं.

**राणी** जवळ आली असें समजून **माणवक राजाला** ह्मणाला, 'अहो महाराज, तुमच्या त्या राणीसाहेब अगदीं जवळ आल्या आहेत, तर आतां असे दुर्मुख होऊन बसूं नका. चेहरा आनंदित करून तिच्या दृष्टीस पडा. नाहींपेक्षां तुमचें सगळें बाहेर पडेल एखादें!'

**राजा** ह्मणाला, 'तूंही अगदीं नम्र होऊन बैस.'

**उर्वशी चित्रलेखे**ला ह्मणाली, 'अग, आतां येथें राहून काय करायचें आहे?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'दुःखित होऊं नकोस. यावेळीं तूं थोडावेळ अंतरली आहेस तरी मी ह्या **राणी**कडे पाहिलें त्यावरून ही **राजा**ला रमविण्याकरितां आलेली दिसत नाहीं. हिच्या वेषावरून ही व्रतस्थ आहे असें वाटतें. तेव्हां ही फार वेळ येथें राहील असें दिसत नाहीं.'

इतक्यांत पूजेचें साहित्य व फलाहाराचे पदार्थ ताटांत भरून घेतलेल्या दासींसहवर्तमान राणी **वसुमती** गच्चीवर येऊन पोंचली. ती चंद्राकडे पाहून ह्मणाली, 'हा भगवान् मृगलांच्छन यावेळीं **रोहिणी**चा योग झाल्यामुळें फारच शोभतो आहे.'

हें ऐकून समयोचित बोलणारी **निपुणिका** ह्मणाली, 'बाईसाहेब जवळ गेल्या ह्मणजे महाराज साहेबही असेच रमणीय दिसतील.'

**राणी**च्या बरोबर फराळाचीं ताटें भरलेलीं आलीं आहेत असें पाहून **माणवक राजा**ला ह्मणाला, 'अहो, समजलें का तुह्मांला? ही आतां वाण देखील देणार आहे असें वाटतें. तुह्मी प्रार्थना केल्यावांचून चंद्राच्या व्रताच्या निमित्तानें हिनें राग सोडला, यामुळें ही आज माझ्या डोळ्यांला चांगली वाटते.'

हें ऐकून **राजा** हंसून ह्मणाला, 'तूं ह्मणतोस त्या दोन्हीही गोष्टी घडण्याचा संभव आहे. तथापि तुझी दुसरी गोष्ट मला खरी वाटते. कारण असें पहा कीं, यावेळीं हिनें सफेत वस्त्र परिधान केलें आहे. विशेष अलंकार वगैरे घातले नसून केवळ आवश्यक तेवढेच मंगलकारक दागि-

ने धारण केले आहेत. मस्तकावर सुवासिक फुलें न धारण करतां केवळ दूर्वा धारण केल्या आहेत. व्रताच्या निमित्तानें हिनें आपला ताठा सोडला असून ही माझ्यावर प्रसन्न झाली आहे हें हिच्या शरीरावरूनच दिसतें.'

या उभयतांचें असें बोलणें चाललें आहे, तों **राणी राजाच्या** अगदीं जवळ येऊन—महाराजांचा जयजयकार असो! असें ह्मणाली. लगेच तिच्या बरोबरच्या दासींनींही **राजाला** नमस्कार केला.

वस्तुतः **माणवकाला राणीनें** नमस्कार केला नव्हता, तरी तो बळेंच ह्मणाला, 'तुझें कल्याण असो!' **राजानें** तिचें स्वागत करून हाताला धरून तिला आपल्या आसनावर बसवून घेतलें.

राणी **वसुमती** ही मोठी पोक्त असून आपल्या नवऱ्यावर तिचें अतिशय प्रेम होतें. तिची शांत व गंभीर अशी मूर्ति पाहून **उर्वशी चित्रलेखेला** ह्मणाली, 'हिला देवी ह्मणतात हें योग्यच आहे. आपल्या तेजानें ही **महेंद्राची स्त्री शचि** हिच्याहून कोणत्याही प्रकारें कमी नाहीं.'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'एकून अशा गोष्टी बोलायला तुला दुसरें तोंड आहे तर.'

इकडे राणी **वसुमती राजाला** ह्मणाली, 'आर्यपुत्रासह कांहीं व्रताची सांगता करायची आहे, तर घटकाभर आपल्याला उपरोध होईल तो सहन केला पाहिजे.'

**राजा** ह्मणाला, 'छेछे! असें ह्मणूं नको. हा आमच्यावर मोठा अनुग्रहच आहे. उपरोध नव्हे.'

**माणवक राजाला** ह्मणाला, 'वाणें घेण्याच्या निमि-

त्यानें असा तुझ्याकडून वरचेवर उपरोध झाला तरी चांगलेंच आहे.'

**राजा राणी**ला ह्मणाला, 'बरें पण या व्रताचें नांव काय?'

हें ऐकून **राणी निपुणिके**च्या तोंडाकडे पाहूं लागली. तेव्हां **निपुणिका** ह्मणाली, 'सरकार, ह्या व्रताला प्रिय-प्रसादन ( नवऱ्याला प्रसन्न करणारें ) असें ह्मणतात.'

हें ऐकून **राजा राणी**कडे पाहून ह्मणाला, 'प्रिये, जर हें असें असेल तर हे कल्याणी, कमळाच्या देंठासारखें कोमळ हें तुझें शरीर ह्या व्रताच्या निमित्तानें विनाकारण कां व्याकूळ करतेस? जो मी तुझा प्रसाद व्हावा ह्मणून इच्छा करीत आहें, त्या आपल्या दासाला प्रसन्न करून घेण्याचा तूं प्रयत्न करतेस हें काय?'

माधुकाला आपल्या प्रियपुरुषाची दुसऱ्या कोणावर प्रीति असली तर तें मुळींच आवडत नाहीं. त्यांतून विवाहित स्त्रीवर तर त्याची प्रीति असतांच कामा नये, असें त्यांच्या मनांत असतें. **राजा**चें वरील भापण अतिशय नम्रता व प्रेमसूचक होतें तें ऐकून **उर्वशी** आपल्या मनांत कचरली, व हंसून **चित्रलेखे**ला ह्मणाली, 'अग, ह्याचा तर ह्या आपल्या बायकोवर अतिशय लोभ आहे असें दिसतें हें काय?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'अग वेडे! तुला ह्या रंगेल्या नागरिक पुरुषांची बतावणी माहीत नाहीं काय? दुसऱ्या स्त्रीवर ज्यांचें हृदय आसक्त झालें आहे असे नागरिक आपल्या बायकोवर फारच प्रेम दाखवितात.'

इकडे **राणी राजा**ला ह्मणाली, 'ह्या व्रताचाच हा

प्रभाव. आपण माझ्याशीं असें गोड बोलत आहां हें ह्या व्रताच्याच प्रभावानें.'

**माणवक** मध्येंच **राजाला** ह्मणाला, 'आतां तूं उगीच बैस. तूं जें उत्तम भाषण केलेंस त्याचें खंडन करणें युक्त नाहीं.'

**राजाला** खुष करण्यापेक्षां त्याचा खेळगडी **माणवक** याला खुष करण्याची विशेष जरूर होती. कारण, अशा थोर लोकांच्या घरीं नवराबायकोंत मोठमोठे अनर्थ उत्पन्न करण्याला त्यांच्या जवळचीं मनुष्येंच कारण असतात. ही गोष्ट **राणी**च्या लक्ष्यांत नव्हती असें नाहीं. **माणवकाला** खुष करण्याचें मुख्य साधन कायतें गोड गोड पदार्थ. ते तिनें बरोबर आणलेच होते. त्याचें वरील भाषण ऐकून **राणी** दासींला ह्मणाली, 'अग पोरींनो, तें फराळाचें साहित्य इकडे घेऊन या, आणि पूजेचीही तयारी करा. ह्या गच्चीवर चंद्राचे किरण पडले आहेत तों मी त्याची पूजा करून घेतें.'

हें ऐकून दासींनीं पूजेचें साहित्य व फलाहाराचे पदार्थ वगैरे **राणी**च्या पुढें आणून ठेविले. तेव्हां **राणीनें** गंध पुष्प इत्यादिक उपचारांनीं **चंद्राची** पूजा केली आणि दासीला ह्मणाली, ' अग, हीं फराळाचीं ताटें घेऊन आर्य **माणवकाची** लाडवांनीं पूजा करा, आणि त्या ह्मातार्‍या चोपदारालाही त्यांतले थोडेसे द्या.'

**राणी**ची अशी आज्ञा होतांच दासींनीं फराळाचे पदार्थ **माणवकाच्या** पुढें नेऊन ठेवले. आणि—भटजीबुवा, बाईसाहेबांनीं हें आपणांला वाण दिलें आहे, याचा स्वीकार करावा, अशी त्यांनीं विनंती केली.

लाडवांचें ताट पहातांच **माणवकाला** अतिशय आनंद झाला. त्यानें मोठ्या हर्षानें तें ताट उचलून घेतलें आणि **राणी**ला ह्मणाला, 'तुझें कल्याण असो! ह्या व्रताचें तुला उदंड फळ मिळेल.'

**माणवका**प्रमाणेंच चोपदारालाही फराळ दिला, तेव्हां तो मोठ्या नम्रतेनें स्वीकार करून त्यानें **राणी**ला आशीर्वाद दिला. याप्रमाणें इतर मंडळीला शांत करून **राणी** **राजा**ला ह्मणाली, 'आर्यपुत्र, अंमळ हिकडे—

**राजा** ह्मणाला, 'काय आज्ञा आहे? हा मी तयार आहें.'

नंतर **राणी**नें त्याची पूजा केली आणि हात जोडून ह्मणाली, 'हें देवांचें दंपत्य भगवान् **चंद्र** व त्याची प्रियपत्नी **रोहिणी** यांना साक्षीला ठेवून मी आर्यपुत्राला प्रसन्न करून घेतें. आजपासून आर्यपुत्र ज्या स्त्रीची इच्छा करीत असेल व जी आर्यपुत्राच्या समागमाची इच्छा करीत असेल, तिच्यासहवर्तमान खुशाल आर्यपुत्रानें वागावें. माझी त्या कामीं कांहीं एक आडकाठी नाहीं.'

**राणी**चें हें वरील भाषण मोघम होतें. त्यांत कोणत्याही स्त्रीच्या नांवाचा उल्लेख नव्हता ह्मणून **उर्वशी** तें ऐकून घाबरली. कारण, हा रंगेला **राजा** आणखी कोणावर आसक्त झाला असेल तर कोणास ठाऊक. ह्मणून ती ह्मणाली, 'अगबाई! ही ( **राणी** ) कोणत्या स्त्रीला उद्देशून असें ह्मणाली हे कांहीं माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. मी तर याच्यावर ( **राजावर** ) विश्वास ठेवून आपलें हृदय अगदीं मोकळें केलें आहे.'

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे, उगीच कां

घाबरतेस? ह्या उदारमनाच्या पतिव्रता स्त्रीनें ( **राणीनें** ) आज्ञा दिल्यामुळें ह्या राजर्षीशीं तुझा समागम निर्विघ्नपणें होईल यांत कांहीं संशय नाहीं.'

**राणीनें** यावेळीं **राजाला** जी परवानगी दिली ती ह्मणजे आपल्या संतोषानें दिली असेल असें **माणवकाला** वाटलें नाहीं. एकंदरींत **राजा उर्वशीवर** अतिशय आसक्त झाला आहे व त्याचें मन मागें हटविणें फार अशक्य आहे. तेव्हां आपण उगीच त्याच्या इच्छेच्या आड येऊन काय उपयोग? कदाचित् त्याला अतिशय राग आला तर तो आपल्यावरच प्रतिकूळ होईल, असें समजून **राणीनें** यावेळीं **राजाला** यथेच्छ वर्तन करण्याची परवानगी देऊन आपला बोज राखला असावा, असें समजून **माणवक** हळूच **राजाला** ह्मणाला, 'कैद्याच्या मागें लागलेला शिपाई त्यानें आपला हात तोडला असतां निरुपायास्तव —जा, खुशाल जा; जीवदान केल्याचें पुण्य तरी मिळूं दे, असें ह्मणतो तद्वत् हें आहे.'

**राणीला** ह्मणाला, 'बाईसाहेब, आपण असें ह्मणतां, तर हा (**राजा**) काय आपल्यावर उदासीन झाला आहे का?'

हें ऐकून **राणी** ह्मणाली, 'मूढा! अरे मी आपल्या सुखाला फांटा देऊन आर्यपुत्राला कोणत्याही रीतीनें सुख व्हावें अशी इच्छा करतें. एवढ्यावरून तो मला प्रिय आहे किंवा नाहीं याचा विचार कर.'

यावर **राजा** तिला ह्मणाला, 'हे रागिट स्वभावाचे प्रिये! तूं दुसऱ्या स्त्रीला मला देण्याविषयीं समर्थ आहेस; पण तसें करून मला आपला दास करावा असें तुझ्या

मनांत आहे का? तूं मला जसा समजत असशील तसा मी खरोखर नाहीं.'

**राणी** ह्मणाली, 'तसें असो किंवा नसो. प्रियप्रसादन नांवाचें जें व्रत मीं केलें होतें, तें यथाशास्त्र संपूर्ण केलें. आतां माझें काम झालें.' दासींना ह्मणाली, 'पोरींनो, चला ग आपण आपल्या जाऊंया.'

**राणी** फारशी प्रसन्न होऊन जात नव्हती व **उर्वशी**-कडे मन लागल्यामुळें यावेळीं तिनें तेथें फार वेळ बसावें असें **राजाच्या**ही मनांत नव्हतें, तरी तिची मर्जी राखण्या-साठीं **राजा** ह्मणाला, 'प्रिये, जर मला सोडून तूं जा-शील तर खरोखर मला तूं कांहीं प्रसन्न केलें नाहींस असें मी समजेन.'

**राणी** ह्मणाली, 'आपलें सांगणें मीं कधीं मोडलें नाहीं; पण यावेळीं मीं नियमांत आहें ह्मणून मला गेलेंच पाहिजे.' असें सांगून दासींसहवर्तमान ती निघून गेली.

**राणी** केव्हां येथून जाईल याची **उर्वशी** वाटच प-हात होती. तरी त्या उभयतांच्या संवादांत आपल्याला ज्या ज्या गोष्टीचा खुलासा पाहिजे आहे तो सहज मि-ळेल, ह्मणून ती त्यांच्या बोलण्याकडे लक्ष्य लावून बसली होती. **राणी** निघून गेली, तेव्हां पूर्वसंकेताप्रमाणें तिनें एकदम **राजाला** भेटावयाचें होतें, पण ती मनांत अंमळ क-चरल्यासारखी झाली होती. ती **चित्रलेखेला** ह्मणाली, 'अग, ह्या राजर्षीला आपली बायको फार आवडते असें वाटतें, व यामुळें आपण त्याच्या जवळ जाऊं नये असें मनांत येतें, तरी कांहीं केल्या मेलें मन मागें हटत नाहीं याला काय करूं?'

**चित्रलेखा** ह्मणाली, ‘ ज्याची जेथें आशा स्थिर झाली असेल त्याला तेथून कसें मागें फिरवितां येईल? ’

इकडे **राजा** उगीच बसला आहे असें पाहून **माणवक** त्याला ह्मणाला, ‘मित्रा, आतां तुला काय बोलायचें असेल तें खुशाल मन मोकळें करून बोल. रोगी असाध्य आहे असें समजलें ह्मणजे वैद्य जसा त्याला सोडून देतो, तसें आज **राणीनें** तुला लवकरच सोडून दिलें आहे. ’

हें ऐकून **राजा** ह्मणाला, ‘ बरें पण **उर्वशी**—

इकडे **उर्वशी** मनांत ह्मणाली, ‘काय कृतार्थ होईल?’

**राजा** ह्मणाला,—‘हळूच पैंजणांचा आवाज तरी माझ्या कानांवर येईल असें करील काय? अथवा एकाएकीं पाठीमागून येऊन माझे डोळे हळूच धरील काय? अथवा ह्या गच्चीवर उतरली असून किंचित् भयभीत झालेल्या तिला तिची चतुर सखी हळू हळू माझ्याकडे ओढीत आणील काय? ’

हें ऐकून **चित्रलेखा** ह्मणाली, ‘गडे **उर्वशी**, यानें आतां हे उद्गार काढले आहेत, त्याप्रमाणें तूं याचा मनोरथ पूर्ण कर.’

हें ऐकून **उर्वशी** किंचित् भयानें घामाघूम होऊन—कसला तो मनोरथ? असें बोलून **राजाच्या** पाठीमागें हळू हळू जाऊन एकदम तिनें त्याचे डोळे झांकले.

इकडे **चित्रलेखेनें** **माणवकाला**—ती कोण आहे हें **राजाला** न सांगण्याविषयीं इषारा केला.

**राजा** तिच्या स्पर्शाचा अनुभव घेऊन **माणवकाला** ह्मणाला, ‘ गड्या, ही **नारायणमुनीच्या** मांडीपासून उत्पन्न झालेली स्त्री (**उर्वशी**) असावी असें वाटतें.’

**माणवक** ह्मणाला, ' हें तुला कसें समजलें? '

**राजा** ह्मणाला, ' त्यांत काय समजायचें? कारण, तसें नसतें तर केवळ हाताचा स्पर्श झाला या योगानें माझ्या अंगाला घाम येऊन रोमांच कसे उभे राहतील? कुमुद सूर्याच्या किरणांनीं कधींही विकासित होत नाहीं. तें चंद्राच्याच किरणांनीं होतें. '

इकडे **उर्वशी** ह्मणाली, ' अग बाई! हें काय? वज्रलेपानें जडविल्याप्रमाणें माझे दोनीही हात अगदीं चिकटले आहेत. कांहीं केल्या तेथून सुटत नाहींत. ' असें बोलून लवकरच **राजा**च्या डोळ्यांवरून हात काढून घेऊन प्रेम व भीति यांनीं संकुचित होऊन ती डोळे झांकून उभी राहिली.

**राजा**नें तिला हातांनीं अलिकडे ओढून घेतलें. तेव्हां हळूच डोळे उघडून ह्मणाली, 'महाराजांचा जयजयकार असो!'

**चित्रलेखा** ह्मणाली, ' मित्रा, तुझें कुशल आहेना? '

**राजा** ह्मणाला, ' सर्व कांहीं योग्य आहे. '

इतक्यांत **उर्वशी राजा**च्या अंगाला चिकटून **चित्रलेखे**ला ह्मणाली, ' अग, **राणी**नें महाराज मला दिले आहेत, ह्मणून मी ह्यांच्या प्रेमळ स्त्रीसारखी यांच्या शरीराला अगदीं चिकटलें आहें. मीं असें केलें ह्मणून तूं दोषदृष्टीनें पहाणारी असें मला समजूं नको.'

**माणवक** त्या दोघींला ह्मणाला, ' अहो, तुह्मांला येथेंच कसा सूर्यास्त झाला? '

**राजा उर्वशी**कडे पाहून ह्मणाला, ' **राणी**नें दिलें ह्मणूनच जर तूं माझ्या शरीराला यावेळीं चिकटत असशील,

तर अगदीं पहिल्या प्रथम भेट झाली त्यावेळीं तूं माझें हृदय चोरलेंस तें कोणाच्या संमतीनें चोरलें होतेंस?'

राजाचें हें भाषण मोठें खुबीचें होतें. यावर उर्वशीला योग्य उत्तर कांहीं सुचलें नाहीं, ह्मणून ती स्तब्ध बसली. हें पाहून चित्रलेखा राजाला ह्मणाली, 'मित्रा, ही तर अगदीं निरुत्तर झाली आहे. आतां माझी एक विनंति आहे ती ऐकून घे.'

राजा ह्मणाला, 'सांग काय तें? तुझ्याकडेच माझें लक्ष्य आहे.'

चित्रलेखा ह्मणाली, 'हा आतां वसंतऋतु सरत आला आहे. पुढच्या ऋतूंत मी सूर्याची सेवा करणार आहें ह्मणून मला गेलें पाहिजे. तेव्हां सांगायचें ह्मणून दुसरें कांहीं नाहीं. ही माझी प्रियसखी उर्वशी स्वर्गलोकांत येण्याविषयीं उत्कंठित† न होईल असें कर ह्मणजे झालें.'

चित्रलेखेचें भाषण मोठें खुबीदार होतें. तुझ्यायेथें कोणत्याही रीतीनें हिला दुःख न होईल तर ही आनंदानें येथें राहील; नाहींतर तिला स्वर्गांत येण्याची इच्छा होईल. तेव्हां तिला कांहीं दुःख होईल असें करूं नये इतकेंच तिचें सांगणें होतें. त्यावर माणवक ह्मणाला, 'अहो बाई, तुमच्या त्या स्वर्गांत आठवण करण्यासारखें काय

---

† चित्रलेखेचें हें भाषण मोठें खुबीदार आहे. पतिगृहीं असणाऱ्या मुली—तेथें त्यांना असंतोष वाटल्यावांचून माहेरचें स्मरण करीत नाहींत. उर्वशी कुलकन्यका नव्हती. व आप्तांनीं वराला जें कांहीं सांगावयाचें तें चित्रलेखेनेंच सांगितलें पाहिजे होतें ह्मणून तिणें तसें सुचविलें.

आहे? तेथें कांहीं खायचें नाहीं कांहीं प्यायचें नाहीं. सारावेळ अनिमेष§ नेत्रांनीं माशांचें व्रत धारण करायचें एवढेंच कीं नाहीं?'

**राजा माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, जेथल्या सुखाला उपमाच नाहीं, अशा स्वर्गाचा विसर पाडणें हें आमच्यानें कसें होईल? पण मी इतकेंच सांगतों कीं, हा **पुरूरवा** अन्य कोणत्याही स्त्रीला न मिळणारा असून असा ह्या **उर्वशीचा** दास आहे. याहून अधिक माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं.'

हें ऐकून **चित्रलेखेला** अतिशय आनंद झाला. ती **राजाला** ह्मणाली, 'मजवर आपण हा मोठा अनुग्रह केला. आतां आणखी मला सांगायचें ह्मणून कांहीं राहिलें नाही. **उर्वशीला** ह्मणाली, 'बाई **उर्वशि**, आतां घाबरी न होतां मला जाण्यास निरोप दे.'

हें ऐकून **उर्वशीच्या** मनांतही तिनें जावें असेंच होतें. कारण स्त्रीपुरुषांच्या गांठी पडल्या ह्मणजे मग तेथें दुसरा कोणी मनुष्य असला तर त्याची अडचण होते. तथापि त्या मैत्रिणीच्या विरहाविषयीं दुःखित होऊन **उर्वशी** तिला मिठी मारून प्रेमानें ह्मणाली, 'सखे, मला विसरूं नकोस बरें!'

हें ऐकून **चित्रलेखा** हंसून ह्मणाली, 'ह्या मित्राशीं

---

§ असें सांगतात कीं, स्वर्गांतल्या देवांचे डोळे झांकले जात नाहींत, सार्वकाळ ते उघडेच असतात; ह्मणूनच देवांला अनिमिष ह्मणतात. माशाचेही डोळे झांकले जात नाहींत अशी प्रसिद्धि आहे. तिला अनुसरूनच माणवकानें उभयतांचें सादृश्य कल्पिलें आहे.

( **पुरूरव्याशीं** ) संगत झालेल्या तुला, मींच अशी मागणी केली पाहिजे; असें असून तूं माझ्याजवळ कां मागतेस?' असें बोलून **राजाला** नमस्कार करून **चित्रलेखा** निघून गेली.

आतां राहतांपैकीं काय ती **माणवकाची** अडचण राहिली होती. तोही मोठा चतुरच होता. तो **राजाला** ह्मणाला, 'मित्रा, मनोरथ पूर्ण होऊन तुला आनंद प्राप्त झाला हें पाहून मला फार संतोष वाटतो.'

**राजा उर्वशीला** दाखवून ह्मणाला, 'ही पहा माझ्या मनोरथांची सिद्धि. शेंकडों मांडलिक राजे वरचेवर माझ्या पायां पडतात असें हें पृथ्वीचें एकछत्री राज्य देखील मला तितकें वाटत नाहीं. आज हिच्या ( **उर्वशीच्या** ) चरणांचें दास्य प्राप्त करून घेऊन मी जसा कृतार्थ झालों आहें, तसा त्या राज्यानेंही कृतार्थ झालों नव्हतों.'

**उर्वशी** ह्मणाली, 'यावर आणखी कांहीं बोलायचें माझें मुळींच सामर्थ्य नाहीं.'

**राजा उर्वशीला** हातानें धरून ह्मणाला, 'हें काय आश्चर्य आहे कोणास ठाऊक. इच्छित वस्तूचा लाभ झाल्यामुळें ह्या सर्वही वस्तु सांप्रत अविरुद्ध झाल्या आहेत. कारण जे चंद्राचे किरण मला पूर्वीं अतिशय संताप देत होते, ते आतां शरीराला सुख देत आहेत. तसेच प्रतिकूळ वाटत असलेले मदनाचे बाण सांप्रत अनुकूल वाटत आहेत. हे सुंदरि, जें जें ह्मणून त्यावेळीं प्रतिकूळ भासल्यामुळें कठीण वाटत होतें, तें तें यावेळीं तुझ्या समागमानें मला अनुकूल झालें आहे.'

**उर्वशी** ह्मणाली, ' मी आपल्याला यायला फार वेळ लावला यामुळें अपराधी झालें आहे.'

**राजा** ह्मणाला, ' सुंदरि, असें ह्मणूं नको. पुष्कळ दुःख भोगून जें सुख मिळतें तेंच फार गोड वाटतें. उन्हानें तापलेल्या मनुष्यालाच वृक्षाची छाया शांत करणारी होते.'

आतां फार वेळ झाला असें पाहून **माणवक उर्वशी**-ला ह्मणाला, ' संध्याकाळच्या वेळच्या रमणीय अशा ह्या चंद्रकिरणांचें तूं फार वेळ सेवन केलेंस, आतां घरांत जाण्याचा समय आहे.'

**राजा** ह्मणाला, ' तर ह्या तुझ्या सखीला (**उर्वशीला**) जनानखान्याची वाट दाखीव.'

हें ऐकून **माणवक** तिला घेऊन जाऊं लागला, त्या-वेळीं **राजा** ह्मणाला, ' हे सुंदरि, यावेळीं ही माझी एक प्रार्थना आहे.'

**उर्वशी** ह्मणाली, ' कसली ती? '

**राजा** ह्मणाला, ' पूर्वी मनोरथ पूर्ण झाला नाहीं ह्मणून माझ्या रात्री जशा शंभरपटीनें वाढल्याप्रमाणें जात होत्या, तशाच, आतां तुझा समागम झाल्यामुळें, जर वाढतील तर मी आपल्याला धन्य मानीन! '

# भाग चवथा.

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें बहुत दिवस जिच्या समागमाविषयीं राजा **पुरूरवा** अगदीं ध्यान लावून बसला होता, त्या **उर्वशीचा** चिरकालिक समागम त्याला प्राप्त झाला. संतान होईपर्यंत **पुरूरव्या**जवळच रहा, अशी **इंद्राची** आज्ञा झाल्यावरून **उर्वशी** राजा **पुरूरव्याच्या** येथें मोठ्या आनंदांत राहिली. **राजानें** तिला आपली पट्टराणी केलें. प्रतिदिवशीं नवे नवे चैनीचे पदार्थ सेवन करून व मनास वाटेल त्याप्रमाणें क्रीडा करून उभयतां सर्वकाळ विषयसुखांत अगदीं निमग्न झालीं होतीं.

राजा **पुरूरव्यानें उर्वशीच्या** नादांत राज्य कारभाराला अगदीं रजा दिली. तो रात्रंदिवस **उर्वशीशीं** क्रीडा करण्यांत आपला सारा वेळ घालवूं लागला. असें करतां करतां उभयतांनीं **गंधमादन*** पर्वतावर जाऊन क्रीडा करावी असा विचार केला, आणि सर्व राज्य प्रधानांच्या हातीं देऊन **राजानें उर्वशी**सहवर्तमान त्या अरण्यांत प्रयाण केलें.

---

* हिमालयपर्वत हा मोठा विस्तीर्ण आहे. त्याच्या लांबचलांब ओळींत अनेक लहान मोठीं शिखरें व उपशिखरें आहेत. शंकराचें प्रियवसतिस्थान जो कैलास नांवाचा पर्वत तो ह्याच हिमालयाचें एक मोठें उंच शिखर होय. गंधमादन हा त्या कैलासपर्वताचें एक शिखर असें ह्मणतां येईल. सांप्रत कैलास या नांवाच्या शिखराची विशेष प्रसिद्धि आहे. व कित्येकांनीं तो पाहिलाही असेल. पण गंधमादनाची मात्र ह्मणण्यासारखी कोठें प्रसिद्धि असल्याचें दिसून येत नाहीं.

तेथें गेल्यावर **राजानें** त्या देवभूमींत दिव्य आणि मानुष अशा अनेक प्रकारच्या पदार्थांचा अनुभव घेतला, व त्या प्रदेशांत अंगाला घाम अथवा थकवा वगैरे कांहीं येत नसल्यामुळें तेथें त्याची अविश्रांत क्रीडा चालू झाली. त्यानें याप्रमाणें बाकीची सर्व दगदग सोडून केवळ विषयरसांत सर्वकाळ पोंहण्याची योजना केली, पण ती फार वेळ सारखी चालली नाहीं.

विषयानंद हा बहुतकरून दुःख परिणामी असून त्याला विघ्नें वारंवार येतात, असें जें सत्पुरुषांचें ह्मणणें आहे तें कांहीं खोटें नव्हे. **उर्वशी**सारखी दिव्य स्त्री, **पुरूरव्या**सारखा सर्वगुणसंपन्न पुरुष व **गंधमादना**सारखा दिव्य प्रदेश या सर्व गोष्टींची अनुकूलता झाली असूनही तेथें त्यांच्या क्रीडारसाचा बिघाड झाला. तो कोणत्या प्रकारें व कसा झाला हें **उर्वशी**ची प्रिय मैत्रीण **चित्रलेखा** व **सहजन्या** ह्या दोघी अप्सरांच्या संवादांत व्यक्त होणार आहे ह्मणून आह्मी निराळा देत नाहीं. असो.

**उर्वशीला पुरूरव्याच्या** हातीं देऊन **चित्रलेखा** परत स्वर्गलोकास गेली. प्रतिदिवशीं सूर्याची आराधना करण्याचा तिचा नेम होता. त्याप्रमाणें ती सूर्याची उपासना करून तिकडून परत येत असतां **सहजन्या** नांवाची तिची मैत्रीण तिला भेटली.

**चित्रलेखा** प्रियसखी **उर्वशी** हिच्या वियोगानें अत्यंत दुःखित झाली होती. तिचें मन उदास झालें असून वरचेवर तिला **उर्वशी**ची आठवण होत होती. यावेळीं **उर्वशी**चा कांहीं वाईट परिणाम झाल्याचें समजून ती फारच व्याकूळ झाली आणि तिच्यानें पुढें चालवेनासें झाल्या-

वरून एका सरोवराच्या कांठीं बसून विलाप करीत होती. ती आपल्याशींच ह्मणाली, 'प्रियसखीच्या वियोगानें दुःखित झालेली तिची मैत्रीण व्याकुळ होऊन, सूर्यकिरणांच्या स्पर्शानें ज्यांतील कमलें प्रफुल्लित झालीं आहेत, अशा सरोवराच्या कांठीं विलाप करीत आहे.' चहूंकडे पाहून त्या सरोवरांतल्या दोघी हंसींला उद्देशून ह्मणाली, 'सहचरीच्या दुःखानें पोळलेल्या प्रेमळ दोघी सख्या सरोवराच्या तीरावर डोळ्यांवाटे अश्रूंच्या धारा सोडीत दुःख करीत आहेत.'

**सहजन्या** हीही **उर्वशीची** मैत्रिणच होती, तथापि तिच्यासंबंधीं कांहीं विशेष वर्तमान तिला माहीत नव्हतें. **चित्रलेखा** दुःखित आहे असें पाहून ती तिला ह्मणाली, 'गडे **चित्रलेखे**, म्लान झालेल्या कमलासारखी तुझ्या तोंडाची कांति अगदीं काळी पडली आहे, व ती तुझें हृदय स्वस्थ नाहीं असें सुचवीत आहे. तर तुला असें दुःख होण्याचें कारण काय तें मला सांग, ह्मणजे मीही त्याची वांटेकरीण होईन.'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'गडे **सहजन्ये**, आह्मां अप्सरांच्या व्यवसायाच्या‡ निमित्तानें मी सूर्याची आराधना करीत असतां प्रियसखी **उर्वशी** जवळ नाहीं ह्मणून तिची आठवण होऊन मला फार दुःख झालें व तिला भेटण्याची उत्कंठा लागली.'

‡ अप्सरांचा व्यवसाय ह्मणजे गाणें नाचणें इत्यादि. सर्व अप्सरा इंद्राच्या आज्ञेंत असतात तरी निरनिराळ्या मुख्य मुख्य देवांकडे त्यांची चाकरी नेमलेली असते. त्याप्रमाणें चित्रलेखा सांप्रत सूर्याच्या तैनातींत होती.

**सहजन्या** ह्मणाली, 'गडे, तुह्मां दोघींचें एकमेकींवर अतिशय प्रेम आहे हें मला ठाऊक आहे. बरें मग पुढें काय झालें?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'याप्रमाणें मन उत्कंठित झाल्यावरून—सांप्रत **उर्वशी** कोणत्या स्थितींत आहे तें समजून घेण्यासाठीं मी कांहीं वेळ ध्यानस्थ बसलें आणि पहातें तों फारच विपरीत गोष्ट झाली असल्याचें माझ्या पाहण्यांत आलें.'

हें ऐकून **सहजन्या** ह्मणाली, 'अशी काय विपरीत गोष्ट झाली बरें?'

**चित्रलेखा** दुःखित होऊन ह्मणाली, 'सखे, ती **उर्वशी लक्ष्मी**सहित भगवान् **विष्णू**प्रमाणें त्या राजर्षि **पुरूरव्या**ला बरोबर घेऊन **गंधमादन** नांवाच्या **कैलास** पर्वताच्या प्रदेशांत क्रीडा करण्यास गेली होती.'

**सहजन्या** तिची तारीफ करून ह्मणाली, 'वाहवा! त्यालाच ह्मणावा संभोग, कीं जो त्या **गंधमादना**सारख्या उत्तम प्रदेशांत घडेल, नाहींतर त्यांत काय आहे! बरें पण पुढें काय झालें?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'नंतर त्या **गंधमादना**वर **मंदाकिनी**नदीच्या तीरीं वाळूचे पर्वत करून ती क्रीडा करीत होती. इतक्यांत **उदयवती** नांवाची एक **विद्याधरा**ची तरुण मुलगी तेथें आली. ती रूपगुणसंपन्न होती. **राजा** तिच्यावर आसक्त झाला नव्हता, तरी त्यानें अंमळ लक्ष्य लावून तिच्याकडे पाहिलें. हेंच काय तें निमित्त. **राजा**चें हें करणें **उर्वशी**ला सहन झालें नाहीं. तूं **उदयवती**वर आसक्त झाला आहेस, असा **रा**-

जाला दोष देऊन प्रियसखी **उर्वशी** त्याच्यावर फार रागावली.'

हें ऐकून **सहजन्या** ह्मणाली, 'खरेंच गडे, ती **उर्वशी** कि नाहीं मोठीच रागीट. तिला थोडेंदेखील वांकडें सहन व्हायचें नाहीं. तशांतून तिचें प्रेमही **राजावर** अतिशय. भवितव्यता मोठी बळकट आहे. बरें पण पुढें काय झालें?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'नंतर **पुरूरव्यानें** हातांपायां पडून पुष्कळ आर्जवें केलीं; तरी तिचें समाधान झालें नाहीं. ती त्या रागाच्या आवेशांत ह्मणा किंवा आपले गुरु **भरतमुनि** यांच्या शापानें मूढ झाल्यामुळें ह्मणा— देवतांचा नियम मोडून कुमारवन* नांवाच्या प्रदेशांत शिरली. तेव्हां तिनें त्या वनांत पाय ठेवतांच तिच्या शरीराची एक सुंदर वेल बनली!'

**सहजन्या** डोळ्यांवाटे अश्रु टाकून ह्मणाली, 'एकंदरींत दैवाला अशक्य असें कांहींच नाहीं. नाहींतर तशा

---

* पूर्वी इलावृत खंडाविषयीं जशी पुराणांतरीं असलेली कथा सांगितली आहे, तशीच ह्या कुमारवनाविषयींही आहे. कुमार म्हणजे महादेवाचा पुत्र स्वामिकार्तिक. हा आपल्या पित्याजवळच कैलासपर्वताच्या एका शिखरावर रहात असतो. तो ब्रम्हचारी असल्यामुळें आपल्या रहाण्याच्या प्रदेशांत स्त्रियांचा प्रवेश न व्हावा ह्मणून त्यानें अशी मर्यादा केली होती कीं, जी स्त्री ह्या आपल्या जाग्याच्या हद्दीच्या आंत येईल ती तत्काल वेल होईल. ही मर्यादा उर्वशीला माहीत नव्हती व रागाच्या बहरांत कदाचित् माहीत असूनही तिला विस्मरण झालें असेल असेंही ह्मणतां येईल, ह्मणून तिनें त्यांत प्रवेश केला.

स्त्रीपुरुषांचा हा असा वाईट परिणाम व्हावा काय? बरें पण पुढें काय झालें तें सांग.'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'राजा **पुरूरव्याला उर्वशीचें** तसें रूपांतर झालें हें दिसलें नाहीं. तो या ठिकाणीं असेल त्या ठिकाणीं असेल असें ह्मणत चहूंकडे **उर्वशीचा** शोध करीत पुष्कळ वेळ फिरून शेवटीं तिची कोठें प्राप्ति झाली नाहीं ह्मणून निराश झाला. दुःखाच्या व स्नेहाच्या अतिशयानें एकाएकी त्याला उन्माद झाला, व त्या अवस्थेंत **उर्वशीचा** शोध करीत अद्याप तो रानोमाळ फिरत आहे. रात्रंदिवस त्याला विश्रांति ह्मणून कसली ती मुळींच ठाऊक नाहीं. हें वर्तमान समजल्यावरून मला मोठी काळजी लागली आहे. कारण, आतां पर्जन्याचे दिवस अगदीं जवळ आले. स्त्रीपुरुषें एकेठिकाणीं चैनींत असलीं तरी ज्याला पाहिल्यानें तीं अतिशय उत्कंठित होतात, अशा मेघाचें दर्शन झालें असतां **राजाची** काय अवस्था होईल कोणास ठाऊक. आधींच त्याला उन्माद झाला आहे, आणि त्यांत मेघदर्शनानें विशेष उत्कंठा लागली ह्मणजे ती त्याची स्थिति विकोपाला जाऊन त्याच्यावर कांहीं उपाय नाहींसा होईल, असें मला वाटतें!'

**सहजन्येला** असें सांगून **चित्रलेखा** वेड्यासारखी आपल्याशींच ह्मणाली, 'प्रियसखीच्या दुःखानें पोळलेल्या प्रेमळ हंसी नेहमीं खालीं पडत असलेल्या अश्रुजलांनीं भिजून चिंब होऊन सरोवराच्या कांठीं दुःखित झाल्या आहेत!'

हें ऐकून उसासा टाकून **सहजन्या** ह्मणाली, 'बरें

पण त्या उभयतांचा पुनः समागम होण्याचा कांहीं उपाय आहे कीं नाहीं?'

**चित्रलेखा** ह्मणाली, 'एक मात्र उपाय आहे. **पार्वती**च्या पायांला लावायच्या आळत्यापासून उत्पन्न झालेला संगमनीय नांवाचा माणि मिळेल तर मात्र त्यांचा पुनः समागम होईल, नाहीं तर कोठून होणार!'

**सहजन्या** ह्मणाली, 'गडे, मला तर असें वाटतें कीं, तीं उभयतांही मोठीं भाग्यशाली आहेत. त्यांच्या सारख्या मनुष्यांला बहुतकरून फार दिवस दुःखाचा उपभोग करावा लागत नाहीं. ह्मणून मी खात्रीनें सांगतें कीं, त्यांच्या समागमाचा कांहीं तरी उपाय अवश्य होईल असें मला वाटतें. बरें, चल आतां फार वेळ झाला. उदयाचलाचा अधिपति भगवान् **सूर्य** याची आपण उपासना करूंया.'

**चित्रलेखा** पुनः आपल्याशींच ह्मणाली, 'चिंतेनें जिचें मन दुःखित झालें आहे व आपल्या मैत्रिणीच्या समागमाविषयीं जिला लालसा उत्पन्न झाली आहे, अशी हंसी—कमलें प्रफुल्लित झाल्यामुळें जें मनोहर दिसत आहे, अशा सरोवरांत विहार करते.' याप्रमाणें सखीच्या विरहानें जिचें मन फार अस्वस्थ झालें आहे, अशा **चित्रलेखे**ला बरोबर घेऊन **सहजन्या सूर्या**ची उपासना करायला गेली. या दोघींला **सूर्या**च्या सेवेकडे लावून **राजा**ची काय अवस्था झाली तें पाहूंया.

इकडे **चित्रलेखे**नें सांगितल्याप्रमाणें राजा **पुरूरवा** खरोखरच उन्मत्त झाला असून अरण्यांत भटकत होता.

तो हत्तीला उद्देशून आपल्याशींच ह्मणाला,* 'प्रियेच्या विरहाच्या उन्मादानें ज्याचे मनोविकार प्रकट झाले आहेत, असा हा गजेंद्रनाथ जंगलांतील झाडांचीं फुलें व त्यांचे कोमल पल्लव यांनीं आपलें शरीर भूषित करून आतां एका दाट झाडींत प्रवेश करीत आहे.'

इतक्यांत आकाशांत एक ढग दिसला, त्याला राक्षस मानून त्यानेंच उर्वशीला नेलें असेल असें समजून रागानें दांत ओंठ खाऊन ह्मणाला, 'अरे दुष्टा राक्षसा! थांब थांब. माझ्या प्रियतमेला घेऊन कोठें जाशील?' इतक्यांत आपणच कल्पना केलेला राक्षस आपल्यावर बाणांची वृष्टि करतो आहे अशी कल्पना करून ह्मणाला, 'अरेरे! हा दुरात्मा या पर्वतशिखरावरून आकाशांत उडी मारून तेथून माझ्यावर बाणांची वृष्टि करितो आहे. कांहीं चिंता नाहीं. दुष्टा! मी तुला तेथें देखील ठार करीन!' असें ह्मणून ढेंकळें उचलून घेऊन त्याला मारायला धांवला.

इतक्यांत पुनः आपल्याशींच, ह्मणाला, 'ज्यानें प्रियेच्या विरहाचें दुःख हृदयांत धारण केलें आहे, व सरोवरांत ज्यानें आपले पंख धुतले आहेत आणि व्याधाच्या भयानें ज्याचे डोळे कावरे बावरे झाले आहेत, असा तरुण हंस दुःख पावत आहे!'

---

* येथें वाचकांनीं एक गोष्ट ध्यानांत ठेवावी. ती ही कीं, राजा उन्मत्त झाला असून तशा स्थितींत तो बोलतो आहे. तेव्हां पुढील भाषणांत असंबद्धपणा, असंभावना इत्यादि जे दोष आहेत ते मुद्दामच कवीनें घातले आहेत.

लक्ष्यपूर्वक पाहून मेघाला ओळखून दीन होऊन ह्मणाला, 'अरेरे! हें काय? मस्त झालेला राक्षस नसून हा नूतन मेघ वृष्टि करण्यास सजला आहे. आणि हें तरी ह्याच्या जवळ दिसणारें बाणांची वृष्टि करणारें धनुष्य नसून हें इंद्रधनुष्य आहे. आणि हे माझ्या अंगावर पडत आहेत हे बाण नसून पावसाच्या धारा आहेत. पण कसोटीवर काढलेल्या सोन्याच्या रेषेप्रमाणें चमकणारी ही विद्युल्लता असून माझी प्रिया **उर्वशी** ही नव्हे!' असें बोलून मूर्च्छित होऊन खालीं पडला.

कांहीं वेळानें सावध होऊन विद्युल्लतेसह शोभणाऱ्या मेघाला पाहून सुस्कारा सोडून ह्मणाला, 'हात् त्याच्या! मी तर समजलों होतों कीं, माझी प्रिया मृगनयना **उर्वशी** *हिला कोणी राक्षस हरण करीत आहे ह्मणून. पण लक्ष्य*-पूर्वक पाहतों तों विद्युल्लतेसह चमकणारा हा काळा मेघ माझ्यावर वृष्टि करीत आहे! राक्षस वगैरे कांहीं नाहीं.'

पुनः कांहीं वेळ विलाप करून ह्मणाला, 'ती रंभोरु कोठें गेली असावी बरें? आपल्या प्रभावानें गुप्तरूप धारण करून ती रागावून बसली असेल असें ह्मणावें, तर ती फार वेळ कधींच रागावत नाहीं. बरें स्वर्गांत गेली असेल असें ह्मणावें तर माझ्यावर तिचें अतिशय प्रेम आहे. **केशिदैत्या**प्रमाणें तिला कोणी हरण केली असेल असें ह्मणावें, तर माझ्या समोर तसें करण्याची दैत्यांची मुळींच छाती होणार नाहीं. असें असून ती कांहीं केल्या नजरेस पडत नाहीं असें झालें, हा दैवाचा काय चमत्कार आहे!'

पुनः चहूंकडे पाहून डोळ्यांत अश्रु आणून ह्मणाला, 'अरे! ज्याचें दैव उलटलें असेल त्याला एका मागून एक

दुःखें येत असतात. कारण, एकाएकीं त्या प्रियेशीं हा माझा वियोग झाला आहे व तो मला अत्यंत दुःसह आहे असें असून याच वेळीं नूतन मेघ उदय पावल्यावरून सूर्यप्रकाशाचें आच्छादन करून चहूंकडे दाटलेल्या आभाळानें हे दिवस कामिजनांला अतिशय रम्य वाटणारे असे झाले आहेत. तेव्हां ही एक दुःखांची परंपराच ह्मणायाची.'

इतक्यांत मेघाला हुकूम देऊन ह्मणाला, 'हं. खबरदार! मी तुला रागावून हा हुकूम देत आहें. एकसारख्या पडणाऱ्या उदकधारांनीं दिशामुखें सुंदर दिसताहेत, असा तूं ह्या वेळीं वृष्टि करूं नको. मी रानोमाळ फिरत असतां जर माझी प्रिया मला दिसेल, तूं तर जें जें करशील तें तें मी सहन करीन.'

लवकरच हंसत हंसत ह्मणाला, 'अरे! क्षणोक्षणीं अतिशय वाढणाऱ्या ह्या संतापाची मी उगीच उपेक्षा करतों. मला जो यावेळीं इतका संताप होत आहे त्याला मुख्य कारण काय तो हा मेघ आहे. तर मग ह्या मेघाचा बंदोबस्त करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं काय? मोठमोठे ऋषि देखील ह्मणतात कीं, "राजा कालाचें कारण आहे." तर मग मी ह्या पर्जन्यकालाला यावेळीं येऊं नको ह्मणून हुकूम करूं शकणार नाहीं का?'

पुनः वृक्षाकडे पाहून ह्मणाला, 'आपल्या फुलांच्या उत्तम वासानें उन्मत्त झालेले भ्रमर ज्याच्यावर गुंजारवरूपी मधुर गीतें गात आहेत; व कोकिलांचें शब्द हींच वाद्यें वाजवीत आहेत. चहूंकडे पसरलेल्या वाऱ्यानें ज्याचीं पानें हालत आहेत असा हा कल्पतरु उत्तम ललित असे विविध प्रकारांनीं नृत्य करीत आहे.'

असें बोलून कांहीं वेळ राजा आपण नाचूं लागला. पुनः विचार करून ह्मणाला, ' पण आपण ह्या मेघाला नको ह्मणून सांगूं नये. कारण, ह्या पर्जन्यकाळच्याच कित्येक चिन्हांनीं सांप्रत मला राजाचे उपचार प्राप्त झाले आहेत. ते कसे ह्मणाल तर, विद्युल्लता हेंच कोणी एक सुवर्ण आणि त्यानें सुंदर दिसणारें हें आकाश हेंच कोणी एक छत्र माझ्या डोक्यावर धरलेलें आहे. तसेंच वाऱ्याच्या वेगानें झाडांचीं पानें हालत आहेत ह्या माझ्यावर चवऱ्या उडत आहेत. उष्णकालाचा शेवट झाल्यामुळें ज्यांचा शब्द मोठा रमणीय वाटतो आहे, असे हे मेघाला पाहून गर्जना करणारे मोर माझें यश गाणारे भाट आहेत. तसेंच धारांची वृष्टि नजर करणारे हे मेघ मोठमोठे शेट सावकार माझ्या भोंवती बसले आहेत!'

पुनः ह्मणाला, ' आपल्याच ऐश्वर्याची तारीफ करण्यांत काय अर्थ आहे? ह्या अरण्यांत माझी प्रिया उर्वशी कोठें आहे तिचा आधीं शोध करतों.'

इतक्यांत पुनः आपल्याशींच ह्मणाला, 'आपल्या दयितेनें विरहित झाल्यामुळें फार दुःखित झालेला असून विरह हात धुवून ज्याच्या पाठीस लागला आहे, अशा प्रफुल्लित झालेल्या पर्वताच्या रमणीय प्रदेशांत हा गजयूथाचा पति हळुहळु संचार करीत आहे.'

यानंतर चहूंकडे पाहून एकाएकीं हर्षित होऊन ह्मणाला, ' ओहो! मी जी गोष्ट मनांत आणिली तिला उत्तेजन देणारें हें झालें आहे. कारण, नूतन उदकाचे ज्याच्यावर थेंब पडले आहेत, अशा फुलांच्या पंक्तींनीं रम-

णीय दिसणारी ही कंदली‡ आपल्या उदकमिश्रित फुलांनीं रागानें लाल होऊन पाण्यानें भरून आलेल्या अशा त्या प्रियेच्या डोळ्यांची मला आठवण देते.'

'आतां ती प्रिया अमक्या एका वाटेनें गेली असेल असें तरी मी कसें समजावें? कारण, मेघाच्या उदकवृष्टीनें जेथील रेती दबून बसली आहे, अशा ह्या प्रदेशांत जर ती सुंदरी पायांनीं पृथ्वीला स्पर्श करून जाईल, तर उरस्थल विशाल असल्यामुळें तिचा मागचा भाग अत्यंत नम्र होईल व यामुळें आळत्याच्या रंगासह तिचीं सुंदर पावलें उमटतील; पण तिनें तसें केलें असेल तर!'

पुनः चहूंकडे पाहून ज्यावर नूतन हराळी उगवली आहे असा सपाट प्रदेश पाहून एकाएकीं आनंदित होऊन ह्मणाला, 'हेरे हो! त्या रागीट स्त्रियेचा मार्ग अनुमानानें समजण्यासारखें चिन्ह मला मिळालें. ज्यांनीं ओंठांचा रंग नाहींसा केला आहे व जे तेथून खोल अशा नाभीपर्यंत जाऊन पडताहेत, अशा नेत्रांतील अश्रूंच्या बिंदूंनीं तिच्या अंगावरून पोपटाच्या पोटासारखें सुंदर दिसणारें हें तिच्या छातीवरचें हिरवें गार वस्त्र खालीं पडलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. चिंता नाहीं.

‡ मराठींत ह्या झाडाला काय म्हणतात हें बरोबर सांगतां येत नाहीं. संस्कृतांत शिलींध्र असें त्याचें दुसरें एक नांव आहे. पण सामान्यतः शिलींध्र म्हणजे आळंबी अथवा कुत्र्याचें मूत ज्याला म्हणतात तीं होतील, पण तीं तशीं सुंदर नसून डोळ्यांची उपमा देण्यास योग्य आहेत असें वाटत नाहीं.

मी आतां हें काढून घेतों व यावरून मला ती कोणीकडे आहे तें बरोबर समजेल.'

असें बोलून हातानें उचलून घेण्याचा प्रयत्न करूं लागला, तों कोठलें वस्त्र आणि कोठलें काय? तें हिरवें चार गवत उगवलें होतें. गवताच्या काड्या हातीं आल्या तेव्हां ह्मणाला, 'अरेरे! इंद्रगोप नांवाच्या किड्यांनीं सुशोभित दिसणारी ही हराळी आहे! ह्या जंगलांत प्रियेचें वर्तमान मला कोठून प्राप्त होणार आहे?'

इतक्यांत पाऊस पडत असल्यामुळें ज्याच्यावरून पाण्याचे लोट वाहताहेत, अशा एका मोठ्या दगडावर बसून शब्द करणाऱ्या मोराकडे पाहून ह्मणाला, 'जोरानें समोरचा वारा आल्यामुळें ज्याच्या डोक्यावरचा तुरा हालत आहे, असा हा मोर लांब स्वरानें गर्जना करीत आहे.'

तो मोर कांहीं तरी **उर्वशीची** खबर सांगेल असें समजून त्याच्या पुढें जाऊन ह्मणाला, 'आतां आपण याला प्रश्न करूं या.' इतक्यांत कांहीं लहर लागल्यामुळें ह्मणाला, 'ज्याला खेद प्राप्त झाला आहे असा प्रतिपक्षी हत्तीचा समाचार घेणारा गजराज प्रियतमेच्या दर्शनाविषयीं लालस होऊन त्याचें मन विस्मित झालें आहे.'

पुनः मोराकडे वळून ह्मणाला, 'मयूरा, तूं कोणी परकी नाहींस, ह्मणून मी तुझ्याजवळ प्रार्थना करतों. ह्या अरण्यांत फिरत असतां ती माझी कांता तुला कोठें दिसली असेल तर सांग. तिचीं लक्षणें तुला सांगतों. तिचें मुख चंद्रासारखें असून हंसासारखी तिची गति

आहे. ह्या लक्षणांवरून तूं तिला खचीत ओळखशील. झालें. मी तुला तिचीं लक्षणें सांगितलीं.'

मोरानें कांहीं उत्तर दिलें नाहीं, असें पाहून त्याला हात जोडून ह्मणाला. 'अरे नीलकंठा! ह्या अरण्यांत फिरत असतां उत्कंठित झालेली ती माझी प्रिया, जिच्या डोळ्यांच्या कोरा लांब आहेत अशा तिला—चकचकीत डोक्याच्या त्वां पाहिलीस काय? अरे खरोखरच ती पहाण्यासारखी आहे.'

मोर नाचत आहे असें पाहून ह्मणाला, 'वाहवा! हा तर माझ्या प्रश्नाचें उत्तर न देतां खुशाल नाचतो आहे; पण याला इतकें हर्ष होण्यासारखें काय झालें आहे?' कांहीं वेळ विचार करून ह्मणाला, 'ओहो! समजलों. त्याकरितांच हा बेटा नाचतो आहे. ती माझी प्रिया नाश पावल्यामुळें हळु हळु वाहणाऱ्या वाऱ्यानें उडणारे याचे कलाप* आतां निर्वैर झाले. रतिसमयीं ज्यांचें बंधन सुटल्यामुळें मोकळे झालेले असे त्या माझ्या उत्तमकेशवती प्रियेचे केंस, फुलांच्या गजऱ्यासह तिनें हातांत धारण केले ह्मणजे मग ह्या बिचाऱ्या मोराला आपली शेंडी मिरवण्याला कोठें जागा होती!'

'तें कांहीं असो. एकंदरींत हा बेटा दुसऱ्यांचें दुःख

---

* कलाप ह्या शब्दांत श्लेष आहे. मोराच्या पिसाऱ्याला कलाप म्हणत असून स्त्रियांच्या केशांलाही कलाप म्हणतात. व उत्तम स्त्रियांच्या केशांला मोराच्या पिसाऱ्याची उपमा देतात म्हणून राजानें आपल्या प्रियेच्या नाशानें उर्वशीचे केशकलापरूपी याच्या पिसाऱ्याचे शत्रु नाहींसे झाले, असें म्हटलें.

पाहून आपण दुःखी न होतां सुखी होतो. तेव्हां अशा दुष्टाच्या जवळ मी आपल्या प्रियेचा समाचार मुळींच विचारीत नाहीं.'

थोडासा प्रदेश हिंडून एका कोकिलेकडे पाहून ह्मणाला, 'हो हो! ही बरी आहे. उन्हानें जिचा मद गेला आहे, अशी ही कोकिला जांबळीच्या झाडावर बसली आहे. सगळ्या पक्ष्यांत मोठी चतुर काय ती हीच जात. तर आतां हिच्या जवळ विचारावें.'

इतक्यांत हत्तीकडे लक्ष्य जाऊन आपल्याशींच ह्मणाला, 'विद्याधरांच्या बागेंत लीन झालेला, दुःखानें ज्याच्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहत आहेत, हृदयांतील आनंद ज्यानें दूर सारला आहे, असा अत्यंत विशाल गजेंद्र चहूंकडे फिरत आहे.'

पुनः कोकिळेला ह्मणाला, 'अग अग कोकिळे! तूं फार गोड बोलणारी असून सुंदर दिसतेस. स्वर्गांतल्या नंदनवनांत तुझा यथेच्छ संचार आहे; पण अग परपुष्टे,* जर माझी ती प्रियतमा तूं कोठें पाहिली असशील, तर सांग.' असें बोलून राजा बराच वेळ तिच्या पुढें नाचला.

नंतर गुडघे जमिनीवर टेंकून ह्मणाला, 'कामी पुरुष

---

* पर म्हणजे परकीय यानें पोसलेली. कोकिलांला परभृत किंवा परपुष्ट असें नांव देण्याचें कारण असें सांगतात कीं, कोकिलांची मादी प्रसूत होतांच ती आपल्या नरासह पिलाला सोडून दुसरीकडे जाते. व कोकिलांचा रंग सामान्यतः कावळ्यासारखा असल्यामुळें कावळ्याची मादी तीं पिलें आपलींच समजून त्यांचें पोषण करते.

तुला मदनाची दूती† असे ह्मणतात. रागावलेल्या स्त्रियांचा मानभंग करून आपल्या नवऱ्याला शरण आणणारें तूं अमोघ अस्त्र आहेस. तर मग त्या माझ्या प्रियतमेला माझ्या जवळ घेऊन ये पाहूं. नाहीं तर मला तरी तिच्या जवळ घेऊन जा.'

कोकिलेनें कांहीं शब्द केला तो ऐकून पुनः तिला ह्मणाला, 'अग, काय काय ह्मणतेस? तूं असा अनुरक्त झाला असून तुला सोडून ती तुझी प्रि... कशी गेली असें ह्मणतेस होय? ऐकून घे तर बाई. ती रागावली असेल असें ह्मणावें, तर तिला राग येण्यासारखा एक वेळ तरी माझ्या हातून कांहीं अन्याय झाला आहे असें मला आठवत नाहीं. तुह्मां बायकांची नवऱ्यांवर सर्व प्रकारें सत्ताच आहे. फार प्रीति असली ह्मणजे तेथें रागवायला अपराध झालाच पाहिजे असें नाहीं.'

इतक्यांत गडबडीनें खालीं बसला. पुनः गुडघे टेंकून उभा राहिला आणि ती कोकिला आपल्याकडे कांहीं लक्ष्य देत नाहीं असें समजून ह्मणाला, 'ही सटवी मी सांगतों त्या हकीकतीकडे दुर्लक्ष्य करून आपल्याच कामांत गुंग झाली आहे. पण याबद्दल हिलाच काय ह्मणून दोष द्यावा?

† सामान्यतः कोणताही मनुष्य सुखासमाधानांत व चैनींत असला म्हणजे त्याला शृंगारिक गोष्टी सुचतात. त्यांतून कामविकाराचे उत्तेजक असे कांहीं पदार्थ साहित्यशास्त्रकारानीं वर्णन केले आहेत. त्यांत चंद्राचें दर्शन, भ्रमरांचा गुंजारव, सुगंधिक पदार्थ, कोकिलांचा मधुर शब्द, हे कामाचे उद्दीपक आहेत; व ह्मणूनच राजानें कोकिलेला मदनाची दूती म्हटलें आहे.

सामान्यतः अशी स्थिति आहे कीं, परक्याचें दुःख किती ही असलें तरी तें शीतलच वाटतें असें लोक सांगतात. ही मदांध झालेली कोकिला माझ्या प्रार्थनेची गणना न करून मी असा संकटांत पडलों असतांही, माझ्याकडे दुर्लक्ष्य करून जांभळीच्या वृक्षाचें टपोरें फळ—जसा काय आपल्या प्रियाचा अधरोष्ठच याप्रमाणें त्याचें सेवन करण्याविषयीं प्रवृत्त झाली आहे.'

'हिनें माझ्याशीं असें वर्तन केलें आहे, तथापि हिचा स्वर फार गोड आहे. व त्यावरून माझ्या प्रियेचाच हा स्वर असें मला वाटतें, ह्मणून मी हिच्यावर रागावत नाहीं.' कोकिलेला ह्मणाला, 'बाई, खुशाल रहा. आह्मी आपले जातों आमच्या कामाला.'

असें बोलून **राजा** तेथून उठला, तों इतक्यांत त्या अरण्याच्या दक्षिणेस कांहीं आवाज झाला. तो ऐकून ह्मणाला, 'अरे! ह्या दक्षिणेकडे माझ्या प्रियेच्या पैंजणांच्या शब्दासारखा शब्द ऐकूं येत आहे, तर त्याच्याच अनुलक्षानें जाऊन तिला गाठावी.' असें बोलून दक्षिणेकडे निघाला.

पुनः आपल्याशींच ह्मणाला, 'प्रियतमेच्या विरहानें ज्याचें तोंड सुकून गेलें आहे. एकसारख्या वाहणाऱ्या अश्रुधारांनीं ज्याचे नेत्र भरले आहेत. दुःखाच्या योगानें ज्याचें चालणें अस्ताव्यस्त झालें आहे. घडोघडी वृद्धिंगत होणाऱ्या मोठ्या संतापानें ज्याचें अंग पोळलें आहे. मन अधिकच दुःखित झाल्यामुळें जो गुहेंत शिरला आहे, असा हा गजेंद्र अरण्यांत परिभ्रमण करीत आहे.'

असें बोलत बोलत बराच दूर जाऊन दुःखित होऊन

ह्मणाला, ' अरेरे! मला उगीच भ्रम झाला. मेघमंडलानें दिशा काळ्या झाल्या आहेत असें पाहून **मानससरोवराला**† जाण्याविषयीं उत्सुक झालेल्या राजहंसाचा हा शब्द आहे. प्रियेच्या पायांतल्या पैंजणांचा हा शब्द नव्हे.'

असो. **मानससरोवराला** जाण्यासाठीं उत्सुक झालेले हे पक्षी ( हंस ) या सरोवरांतून उडून गेले नाहींत तोंपर्यंत त्यांच्या जवळून आपल्या प्रियेची खवरबात. स- जून घ्यावी, असा विचार करून त्यांतल्या एका पक्ष्याला उद्देशून ह्मणाला, ' हे पक्षिराजा, अरे गड्या, तूं **मानससरोवराला** जाणार आहेस तों मग जा. तूं आपल्या चोंचींत कमळाचे देंठ वाटेंत खाण्याकरितां धरले आहेस ते सोडून दे. मग घेतां येतील. आधीं माझ्या प्रियेचें वर्तमान सांगून मला या शोकसमुद्रांतून वर काढ. आपलें काम सोडून दुसऱ्याचें काम कोण करतो? असें ह्मणशील, तर खरोखर सत्पुरुषांला स्वार्थापेक्षां शरणागतांचें काम करणें हेंच मोठें वाटतें. '

हंसाकडे पाहून ह्मणाला, ' काय! **मानससरोवराला** जाण्याच्या गडबडींत मीं तुझ्या प्रियेला कोठें पाहिलें नाहीं असें ह्मणतोस काय? अरे रे हंसा! तूं ही गोष्ट कां चोरून ठेवतोस? तुला ही चालण्याची ढब साधली आहे हीवरूनच माझ्या प्रियेला तूं पाहिलेंस हें मीं समजलों.

---

† हिमाचलाच्या आसपास हंस नांवाचे सफेत रंगाचे पक्षी आहेत ते—हिमाचलावर आठ महिने अतिशय थंडी असल्यामुळें तेथून अन्य प्रदेशांत जाऊन रहातात व पावसाळ्यांत थंडीचें मान नेमस्त असल्यामुळें आपलें मुख्य स्थान मानससरोवर येथें जातात, अशी प्राचीन काव्यांत प्रसिद्धि आहे.

स्तनांच्या भारानें मंद मंद चालणाऱ्या त्या माझ्या प्रियेवांचून दुसऱ्या कोणाजवळून ही चालण्याची ढब शिकलास सांग बरें पाहूं?' पुनः ह्मणाला, 'अरे हंसा, त्या सरोवराच्या कांठीं जर माझी प्रिया तुझ्या दृष्टीस पडली नाहीं, तर मदानें धुंद होऊन खेळत खेळत चालण्याचें हें कसब तूं कोणाजवळून शिकलास रे?'

त्या पक्ष्याच्या जवळ जाऊन त्याला हात जोडून ह्मणाला, 'बा हंसा, तें कांहीं असो. तूं मुकाट्यानें माझी प्रिया चोरून नेली आहेस ती दे कशी. नाहींशी झालेल्या वस्तूचा थोडासा अंश जरी कोणाजवळ मिळाला तरी चोरीच्या सर्व मालाचा संबंध त्यांच्याकडे येतो, हा न्यायच आहे. त्या माझ्या प्रियेचे सर्व गुण तुझ्या जवळ असल्याचें दिसत नाहीं, तरी तिची चालण्याची ढब तूं चोरली आहेस, एवढ्यावरून तूं तिला आणून दिलेंच पाहिजे किंवा निदान दाखविलें तरी पाहिजे.'

इतक्यांत तो हंसपक्षी तेथून उडून गेला, हें पाहून आपल्याशींच हंसून ह्मणाला, 'हंहं! चोराला शिक्षा करणारा मी राजा आहें असें समजून हा गुलाम येथून भयानें पळाला. बरें चिंता नाहीं. दुसऱ्या प्रदेशांत जाऊन याला पकडून घेईन. माझ्या प्रियेचा अपहार करून हा चोर कोठें जाणार आहे?'

इतक्यांत मादीसहवर्तमान चक्रवाक पक्षी एके ठिकाणीं बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां हंसाला सोडून ह्मणाला, 'जाऊंदे. तो बेटा चोर गेला तर गेला; पण प्रियेसहवर्तमान हा चक्रवाक येथें बसला आहे. यालाच विचारून पाहूंया ह्मणजे झालें.' इतक्यांत आपल्याशींच

ह्मणाला, 'झाडांच्या मर्मर शब्दानें मनोहर दिसणारें, ज्यांचीं फुलें प्रफुल्लित झालीं आहेत अशा वृक्षांनीं शोभिवंत असलेल्या या अरण्यांत दयितेच्या विरहानें उन्मत्त झालेला गजेंद्र परिभ्रमण करितो आहे.'

चक्रवाकाला ह्मणाला, 'अरे, तूं गोरोचनासारखा असून हीं तुझी प्रिया केशरासारखी आहे. हे चक्रवाका, ह्या वसंतऋतूंत विविध क्रीडा करणारी परम धन्य अशी ती माझी प्रिया तूं पाहिलीस का तें सांग.'

इतक्यांत त्या चक्रवाकानें आपल्या जातिस्वभावाप्रमाणें 'कःकः' असा शब्द केला. त्यावरून तूं कोण? असें हा आपणास विचारतो असें समजून राजा ह्मणाला, 'अरे, हा मला तूं कोण? ह्मणून विचारतो. असो. मी कोण तो याला ठाऊक नाहीं काय? अरे वा पक्षिराजा, सूर्य आणि चंद्र हे ज्याचे मातामह आणि पितामह होतात, आणि ज्याला उर्वशीनें आणि पृथ्वीनें आपण होऊन वरलें आहे, तो मी राजा पुरूरवा.'

त्या गरीब पाखराला त्याचें बोलणें काय समजणार! त्यानें पुनः कांहीं शब्द केला नाहीं असें पाहून ह्मणाला, 'अरे! हा तर घुम्या सारखा उगीच बसला आहे. बरें चिंता नाहीं. मी याची चांगली खरडपट्टी काढतों.' त्याच्या पुढें गुडघे टेंकून उभा राहून ह्मणाला, 'अरे भल्या गृहस्था! आपल्या सारखेंच दुसऱ्याचेंही दुःख असेल असें अनुमान करून वागणें तुला योग्य आहे. अरे, सरोवरांत एकेच ठिकाणीं असून केवळ कमलिनीचें पान आड झाल्यामुळें तूं आपल्या प्रियेला—ती कोठें दूर आहे असें समजून उत्सुक होत्साता रात्रभर हाका मारीत अस-

तोस. अशी स्त्रियेच्या विशेष स्नेहानें तिच्या विरहाविषयीं तुला भीति वाटते, असें असून सांप्रत मला प्रियेचा विरह झाला असतांही तूं माझ्याविषयीं उदास राहतोस हें काय?'

राजानें याप्रमाणें चक्रवाकाची प्रार्थना केली तरी तो कांहीं बोलला नाहीं. तेव्हां आपल्या कपाळाला हात लावून ह्मणाला, 'सर्वथा माझें दैव फिरलें आहे, त्याचा हा प्रभाव आहे, नाहीं तर हा पक्षी माझ्यावर इतका निर्दय कां झाला असता? असो. आपण आतां दुसऱ्या प्रदेशांत जाऊन पहावें.'

चहूंकडे पाहून ह्मणाला, 'ज्याच्या आंत भ्रमर मधुर गुंजारव करीत आहेत असें हें कमल मला आपल्याकडे ओढून घेतें आहे. कारण, मीं जिचा खालचा ओंठ चावला आहे व त्यामुळें ज्यांतून सीत्कार निघाला आहे अशा माझ्या प्रियेच्या मुखासारखेंच हुबेहुब हें कमल दिसतें. आतां येथून दुसरीकडे गेलों तर कदाचित् मग पश्चात्ताप होईल, ह्मणून तसें न करतां कमलाचें सेवन करणाऱ्या ह्या भ्रमराशीं दोस्ती करावी व त्याच्या जवळ मागणें मागावें.'

इतक्यांत आपल्याशींच ह्मणाला, दोघांचीही एकसारखीच प्रवृत्ति असल्यामुळें प्रेमरस अधिक वाढला आहे, असा तरुण हंस सरोवरांत कामरसांत पोहत आहे.

भ्रमराकडे पाहून त्याला हात जोडून ह्मणाला, 'बा मधुकरा, तारवटल्यासारखे जिचे डोळे दिसत आहेत, अशा त्या माझ्या प्रियेचा कांहीं तरी समाचार सांग. हो. पण ती सुंदरी तुझ्या दृष्टीच पडली नसेल. कारण, जर

तूं तिच्या मुखांतील श्वासाचा सुगंध हुंगला असतास तर ह्या कमलावर तुझी प्रीति बसली असती काय? '

इतक्यांत अंमळ पुढें गेला, तों हत्तिणीसह एक हत्ती त्याच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून ह्मणाला, 'अरे, हा गजराज आपली प्रिया हत्तीण हिजसहवर्तमान ह्या पिंपरणीच्या झाडाखालीं बसला आहे. तर आतां ह्याच्या जवळ जावें ह्मणजे शोध लागेल.' पुन: आपल्याशींच ह्मणाला, ' हत्तिणीच्या विरहानें संतप्त झालेला मदोन्मत्त हत्ती अरण्यांत भटकतो आहे. ' तो हत्ती कांहीं खात आहे असें पाहून ह्मणाला, ' होय. पण यावेळीं याच्या जवळ जाणें योग्य नाहीं. कारण, ह्याची प्रियतमा आपल्या सोंडेनें साळयीच्या झाडाचे—ज्यांला मद्यासारखा वास येत आहे असे—कोंवळे कोंवळे अंकूर खुशाल खाऊं घालू दे. यावेळीं मी जवळ गेलों तर मला पाहून ती लाजेल.'

असा विचार करून थोडा वेळ तेथें उभा राहून ह्मणाला, ' हो. याचें खाणें झालें. आतां याच्या पुढें जाऊन विचारतों. ' हत्तीला उद्देशून ह्मणाला, ' हळूच आपल्या सोंडेनें प्रहार करून ज्यानें वृक्षांचा नाश केला आहे, अशा हे गजराजा, मी तुला विचारतों तें सांग. जिनें चंद्राची कांति जिंकली आहे, अशी माझी प्रिया समोरून जात असतां तूं कोठें पाहिलीस काय? '

दोन पावलें पुढें जाऊन ह्मणाला, ' हे मदोन्मत्ता गजयूथपा, मोगरीचीं फुलें जिनें आपल्या वेणींत धारण केलीं आहेत, व जी भरतारुण्यांत आहे व जिचें दर्शन अत्यंत सुखकर आहे, अशी ती माझी प्रिया तूं दुरून तरी पाहिलीस का? '

इतक्यांत त्या हत्तीनें गर्जना केलेली ऐकून आनंदानें ह्मणाला, 'अरेरे! प्रियेची प्राप्ति होईल असें सांगणाऱ्या ह्या हत्तीनें बारीक आवाजानें गर्जना करून माझी समजूत केली.' हत्तीला उद्देशून ह्मणाला, 'तुझा आणि आमचा कांहींसा सारखेपणा असल्यामुळें तुझ्यावर उदंड प्रीति आहे. अरे, असें पहा कीं, मला सर्व राजांचा अधिपति ह्मणतात, आणि तूं हत्तींचा राजा आहेस. तुझ्या गंडस्थलांतून एकसारखें दानोदक गळत असतें व माझ्याही हातांतून याचकांवर दानोदकाची वृष्टि होत असते. सर्व उत्तमोत्तम स्त्रियांत माझी प्रियतमा **उर्वशी** मला अत्यंत प्रिय आहे, तशीच सर्व हत्तिणींत तुला ही हत्तिण फार प्रिय आहे. बाकी सर्व गोष्टी अगदीं माझ्यासारख्या आहेत. पण मला जी प्रियेच्या विरहाची व्यथा प्राप्त झाली आहे, तिचा मात्र तुला अनुभव नाहीं. आणि तो कधीं ही न प्राप्त होवो!'

हत्तीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं असें पाहून ह्मणाला, 'बाबा, तूं सुखी ऐस. मी आपला जातों.' अमळ पुढें जाऊन **सुरभिकंदर** नांवाच्या पर्वताकडे पाहून ह्मणाला, 'हा **सुरभिकंदर** नांवाचा अत्यंत रमणीय पर्वत आहे. आणि हा अप्सरांला फारच आवडतो. तेव्हां प्रिया **उर्वशी** याच्या आसपासच्या प्रदेशांत कोठें तरी भेटेल.' असा विचार करून पुढें जावयाचा प्रयत्न करतो आहे इतक्यांत अंधार पडला. आकाशाकडे पाहून ह्मणाला, 'हा असा अंधार पडला आहे तरी कांहीं चिंता नाहीं. विजेच्या प्रकाशानें मी तिला हुडकून काढीन.' पुनः आकाशाकडे पाहून वीज नाहीं असें पाहून ह्मणाला, 'अरे, मा-

झ्या दुष्कृत्याच्या परिणामानें हे मेघ देखील वीजा चमकल्यावांचून वृष्टि करीत आहेत! असो. कांहीं झालें तरी या पर्वताला प्रियेचा क्षेम समाचार विचारल्यावांचून मी मागें फिरणार नाहीं.'

असा विचार करून आपल्याशींच ह्मणाला, 'अत्यंत कठीण असून पसरलेल्या अशा आपल्या खुरांनीं ज्यानें जमीन उकरली आहे, आणि स्वतः आपण स्तब्ध झाला आहे असा हा रानडुकर आपल्या कार्याविषयीं उद्युक्त होऊन फिरतो आहे पहा.'

पर्वताला हात जोडून ह्मणाला, 'हे पर्वता, जिची वेंग लहानच आहे व जिचे दंड सबल आहेत, अशी ती माझी प्रिया तुझ्या शिखरावर कोठें बसली आहे काय? मदनाचा स्वीकार केल्यामुळें फार रमणीय दिसणारी जिची कंबर विस्तीर्ण आहे, अशी ती तुझ्या विस्तीर्ण पायथ्यावर कोठें असली तर शोधून पहा.'

पर्वतानें कांहीं उत्तर दिलें नाहीं असें पाहून ह्मणाला, 'अरे, पण हा उगीच कां बसला आहे? होहो, बरोबर. मी फार दूर असल्यामुळें माझी विनंति याला ऐकूं आली नसेल. तर मग आतां याच्या जवळ जाऊन आपण विचारावें.' असा विचार करून पर्वताच्या जवळ जाऊन ह्मणाला, 'स्फटिकाच्या निर्मळ शिळांवरून पाण्याचे प्रवाह वाहत आहेत, अनेक प्रकारच्या पुष्पांनीं ज्याची पूजा केली आहे, किन्नरांच्या गायनानें मनोहर अशा हे पर्वता, माझी प्रियतमा कोठें आहे ती दाखीव.' अगदीं जवळ जाऊन हात जोडून ह्मणाला, 'हे सर्व पर्वतांच्या नाथा, जिचे सारे अवयव सुंदर आहेत अशी कोणी तरी

सुंदर स्त्री ह्या तुझ्यावरील अरण्यांत माझ्यावांचून ए-
कटीच चाललेली तूं पाहिलीस काय? '

राजा त्या पर्वताच्या गुहेजवळ जाऊन त्यानें वरील भाषण केलें. अर्थात् तेंच प्रतिध्वनीनें त्याला ऐकूं आलें. त्यावरून आनंदित होऊन ह्मणाला, 'अरे, हें काय? मी जसें बोललों तसेंच हा बोलला. यावरून याणें तिला पाहिलें असावें असें वाटतें. तर मग आतां तिचा आपण शोध केला पाहिजे.' असा विचार करून चहूंकडे पाहून खिन्न होऊन ह्मणाला, 'अरेरे! मीं जें बोललों त्याचा ह्या गुहेंतून मला प्रतिशब्द ऐकूं आला. हा पर्वत मला काय उत्तर देणार!' असें बोलून कांहीं वेळ मूर्च्छित झाला. पुनः सावध होऊन दुःखानें ह्मणाला, 'हाय हाय! भटकतां भटकतां मला फार श्रम झाले. आतां ह्या पर्वतावरून ही नदी वाहत आहे हिच्या कांठीं जाऊन तिच्या प्रवाहावरून येणारा शीतल वारा घेत बसतों.' असें बोलून त्या नदीच्या कांठीं जाऊन बसला.

नदीची शोभा पाहून ह्मणाला, 'पाऊस पडल्यामुळें नवीन आलेल्या पाण्यानें गढूळ झालेल्या ह्या नदीचा प्रवाह पाहून माझ्या मनाची अंमळ करमणूक होते. कारण, मला तर ही माझी प्रियाच आहे असें वाटतें. हिच्या पाण्यावरच्या ह्या वांकड्या लाटा ह्याच कोणी एक भोंवया, वरून ओळीनें उडणाऱ्या पक्ष्यांची पंक्ति हा हिचा कंबरपट्टा, किनाऱ्यावर आलेला फेंस—ज्याला ही वरचेवर आपल्या लाटांनीं ओढून घेत आहे—तेंच कोणी एक सैल झालेलें तिचें वस्त्र. मोठमोठ्या शिला हेच कोणी पाय, त्यांला अडखळत अडखळत सांवरून चालत आहे. यावरून

ती माझी रागीट प्रिया उर्वशी नदीच्या रूपानें माझ्या समोर आली आहे असें मला वाटतें.'

'असो. मी आतां हिला प्रसन्न करून घेतों.' त्या नदीला नमस्कार करून ह्मणाला, 'हे प्रियतमे सुंदरी, प्रसन्न हो. जिनें आपल्या प्रवाहानें तीरावरच्या पक्ष्यांला घाबरे केले आहेत अशी जी तूं ती ह्या माझ्या नमस्कारानें प्रसन्न हो.' जिच्या तीरावर राहणारे हरीण उत्सुक झाले आहेत, व भ्रमरांचा झंकार चालला आहे, असे हे नदी-रूपिणि प्रिये प्रसन्न हो.'

पुनः ह्मणाला, 'पूर्वदिशेकडून वाहणाऱ्या वाऱ्यानें उचंबळलेल्या लाटा हेच कोणीएक बाहू ज्यानें वर केले आहेत, असा जलनिधीचा नाथ—हंस, चक्रवाक, तसेच शंख इत्यादिकांचे दागिने ज्यानें घातले आहेत, व हत्ती, सुसरी, मासे इत्यादि काळ्या कमळांनीं वेढला आहे, तीरावर लाटेनें येणाऱ्या पाण्याच्या योगानें ज्यानें हा-ताच्या टाळ्याच वाजवल्या आहेत, अशा ह्या पर्जन्या-च्या सुरवातीचा समय दशदिशा कोंडून व्यापून टाकतो.'

जमिनीवर गुडघे टेकून उभा राहून ती नदी प्रत्यक्ष उर्वशीच आहे असें मानून हात जोडून ह्मणाला, 'ज्याचें तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे व जो नेहमीं तुझ्याशीं गोड भाषण करणारा, तूं कांहीं सांगितलेंस तरी तुझें वचन मोडण्याविषयीं भिणारा, अशा ह्या दासाला, हे मानिनि, तूं त्याग करतेस, तर तसें करण्यासारखा माझा कोणता अपराध तूं पाहिला आहेस?'

नदीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं, असें पाहून ह्मणाला, 'अरे, ही उगीच कां बसली? छे छे! खरोखर ही नदीच

आहे. ही कांहीं उर्वशी नव्हे. नाहीं तर ह्या पुरूरव्याला सोडून ती समुद्राला कशी अनुसरली असती. एकंदरीत चांगल्या गोष्टी प्राप्त होतात त्या नाउमेद न झाल्यानेंच होतात. असो. आपण ज्या ठिकाणीं ती प्रिया गुप्त झाली त्याच ठिकाणीं जाऊन पहावें.' असें बोलून परत तिकडे जाण्यास निघाला.

इतक्यांत एक हरिण बसलेला दृष्टीस पडला. त्याला पाहून ह्मणाला, 'ह्या हरिणाची प्रार्थना करावी ह्मणजे हा काहीं सांगेल तर कोणास ठाऊक.' असें बोलून आपल्याशींच ह्मणाला, नवीन फुलांचे घोस ज्याला आले आहेत अशा वृक्षांच्या जवळ उन्मत्त झालेल्या कोकिलांच्या मधुर शब्दानें व भ्रमरांच्या गुंजारवानें मनोहर दिसणाऱ्या नंदनवनांत आपल्या हत्तिणीच्या विरहाग्नीनें संतप्त झालेला ऐरावत नांवाचा गजाधिपति फिरतो आहे!

इतक्यांत गुडघे टेंकून उभा राहून ह्मणाला,—जो हा काळविटासारखा दिसतो आहे व ह्या वनश्रीनें नवीन उगवलेलें गवत पाहण्याकरितां जणुं काय अपला कटाक्षच फेंकला आहे, असा प्रेक्षकांला वाटतो.

पुनः ह्मणाला, 'देवांची स्त्री कंबरेच्या भारानें हळूहळू चालणारी, पुष्ट असून उंच असे जिचे स्तन आहेत. जिचें तारुण्य स्थिर आहे, शरीर बारीक असून हंसासारखी गति आहे. आकाशासारख्या लखलखीत अरण्यांत परिभ्रमण करणारी ती मृगनयना तूं पाहिलीस काय? पाहिली असशील तर सांग आणि ह्या विरहसमुद्रांतून मला वर काढ.'

त्याच्या अगदीं जवळ जाऊन हात जोडून ह्मणाला,

'अहो हरिणीचे यजमान, तुह्मी फिरत असतां ह्या अरण्यांत आमच्या प्रियेला कोठें पाहिलें आहे काय? तुह्माला तिची खूण सांगतों ऐका. विशालनयना जशी ही तुमची हरिणी दिसते, तशीच तीही विशालनयना दिसत.'

हरिण हरिणीकडे तोंड करून उभा राहिला हें पाहून ह्मणाला, 'अरे, मी याची प्रार्थना करीत असतां माझा अनादर करून हा आपल्या बायकोच्या सन्मुख उभा राहिला हें काय? पण यांत तरी काय आश्चर्य? त्यानें केलें तें योग्यच आहे. दैव फिरलें ह्मणजे असा अपमान व्हावयाचाच. असो; आपण आतां दुसऱ्या प्रदेशांत जाऊं.' असें बोलून पुढें गेला.

कांहीं प्रदेश अतिक्रमण करून लाल कळंबाचा वृक्ष पाहून ह्मणाला, 'ओहो! आतां मात्र ती प्रिया कोणीकडे गेली त्या वाटेची खूण मला चांगली कळली. तोच हा लाल कळंबाचा वृक्ष—माझ्या प्रियेनें उष्णकाळाला सुचविणारें ह्या झाडाचें—केसर पूर्ण न आल्यामुळें जें विषम दिसत होतें असें, फूल आपल्या वेणींत खोंवलें.'

राजा **पुरूरवा** उर्वशीच्या विरहानें वेडा होऊन याप्रमाणें रानोमाळ फिरत होता. वरून एकसारखा पाऊस पडत आहे. मन ठिकाणावर नसल्यामुळें वरचेवर ठेंचा लागत आहेत. पायांला कांटे टोंचत आहेत. पोटांत अन्न नाहीं पाणी नाहीं. अशा स्थितींत भटकत असतां त्याला किती दुःख झालें असेल? या वेळीं तो शुद्धीवर नव्हता ह्मणून बरें होतें. पण तसें नसतें तर खरोखर त्याला त्या असह्य दुःखाचा अनुभव पूर्ण घडला असता. ह्या विषयांची संगति व त्यांचा परिणाम असाच दुःखकारक असतो.

सर्व पृथ्वीचें राज्य करणारा प्रत्यक्ष चंद्राचा नातू व जग उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाचा पणतू, त्रैलोक्याचा राजा इंद्र याचा परममित्र अशा राजा पुरूरव्याला अशी स्थिति प्राप्त व्हावी काय? हा सर्व विषयासक्तीचा परिणाम! असो.

राजा पुरूरव्याला आणखी किती वेळ दुःख भोगावें लागलें असतें व त्याचा काय परिणाम झाला असता त्याचें अनुमान देखील करवत नाहीं. कामी पुरुषाला प्रियाविरहकालीं ज्या दहा अवस्था प्राप्त होतात, त्यांपैकीं नववी ह्मणजे उन्मादावस्था तर त्याला प्राप्त झालीच होती. या अवस्थेंत प्रियेचा समागम होऊन त्याच्या दुःखाचा परिहार न झाला तर दहावी अवस्था अर्थात् मरण येणें निश्चितच होतें; पण सुदैवानें तसा योग प्राप्त झाला नाहीं.

चित्रलेखेनें ज्या संगममण्याचें नांव घेतलें होतें तोच त्याला अकस्मात् दृष्टी पडून त्याच्या दुर्दशेचा शेवट होण्याची वेळ जवळ आली. त्याची सहज त्या मण्यावर दृष्टि गेली; पण तो त्याच्या ओळखीचा नव्हता ह्मणून राजा ह्मणाला, ‘ बरें पण ह्या पर्वतावर अतिशय लाल असें हें काय दिसत आहे? चहूंकडे त्याचे किरण पडले आहेत, तेव्हां सिंहानें मारलेल्या हत्तीच्या मस्तकाचा हा तुकडा तर नसेलच. कदाचित् आगीची फुणगी ह्मणावी तर नुकताच पाऊस पडला आहे, तेव्हां आगीची फुणगी कशी राहील? ओहो! लाल अशोकाच्या फुलाच्या गुच्छासारखा ज्याचा रंग आहे, असा हा कांहीं तरी मणि आहे. ज्याला उचलून घेण्याकरितां सूर्य आपले हात (किर-

ण) लांब करून जणुं काय तयारच झाला आहे असें वाटतें.'

'असो; मी हा मणि उचलून घेतों.' असें बोलून मणि घेण्याचा प्रयत्न करतो आहे, इतक्यांत हत्तीकडे लहर लागून ह्मणाला, 'आपल्या आवडत्या प्रियेच्या ठिकाणीं ज्याला गोडी लागली आहे, ज्याचे डोळे पाण्यानें भरले आहेत, व ज्याचें तोंड सुकून गेलें आहे, असा गजपति दुःखित होऊन अरण्यांत प्रवेश करतो.'

जवळ जाऊन तो मणि हातांत घेऊन ह्मणाला, 'कल्पवृक्षाच्या फुलांनीं सुवासित झालेल्या ज्या प्रियेच्या वेणींत हा घालायचा तीच प्रिया सांप्रत मला दुर्लभ झाली आहे ! तेव्हां मी ह्याला अश्रूंनीं भिजवूं तरी कशाला?' असें बोलून त्यानें तो मणि हातांतला टाकून दिला.

**राजानें** तो मणि हातांतून टाकून दिला खरा; पण ती त्याची गैर समजूत होती. कारण **चित्रलेखेनें**, ज्या संगममणाच्यायोगानें **उर्वशीचा** पुनः समागम होईल असें **सहजन्येला** सांगितले होतें, तोच हा मणि. **राजानें** न समजून तो टाकून दिला असें पाहून आकाशांत उदय पावलेला **चंद्र** त्याला ह्मणाला, 'वत्सा **पुरूरव्या**, अरे तो मणि पुनः हातांत घे. टाकूं नको. ह्या मण्याचें नांव संगमनीय. हा **पार्वतीच्या** पायांच्या मळापासून उत्पन्न झाला आहे. हा अंगावर धारण केला असतां लवकर प्रियजनांचा समागम होतो, असा याचा प्रभाव आहे.'

यावेळीं तेथें दुसरें कोणी मनुष्य नव्हतें असें असून अकस्मात् वर सांगितल्याप्रमाणें भाषण ऐकून **राजाला** मोठें आश्चर्य वाटलें. तो वर पाहून ह्मणाला, 'मला हें कोण सांगतो आहे?' **चंद्रानें** सांगितलें असेल असें समजून

ह्मणाला, 'बरोबर. हरिणाला धारण करणाऱ्या माझ्या या आजोबानेंच मला आज्ञा केली. त्याच्या वांचून माझी एवढी कळकळ वाळगणारा दुसरा येथें कोण असणार?' चंद्राला नमस्कार करून ह्मणाला, 'भगवन्, तूं मला हा उपदेश केलास हा माझ्यावर मोठा अनुग्रह केलास.'

टाकलेला मणि हातांत घेऊन त्या मण्याला उद्देशून ह्मणाला, 'बाबा संगममणे! जिची कंबर अतिशय बारीक आहे अशा त्या प्रियेशीं वियुक्त झालेल्या मला जर तूं तिचा समागम करून देणारा होशील तर मी तुला भगवान् शंकर जसा बालचंद्र आपल्या मस्तकावर नेहमीं धारण करतो, तसा मीही तुला आपल्या शेंडींत धारण करीन.'

इतक्यांत जिला फुलें वगैरे कांहीं नाहीं अशा एका वेलीवर त्याची दृष्टि गेली. उर्वशीला वेलीचें रूप प्राप्त झालें हें वर सांगितलेंच आहे. तीच ही वेल. तिच्याकडे राजाची दृष्टि वेधल्यावरून तो ह्मणाला, 'ही प्रफुल्लित झालेली नाहीं, तरी ह्या वेलीकडे पाहून माझे डोळे रमतात. पण असें होतें हें कांहीं गैर नाहीं. मन रमतें हें योग्यच आहे. कारण, ही अत्यंत सुकुमार असून हिच्या पानांवर मेघांचें उदक पडून त्याचे थेंब टपटप खालीं पडताहेत, त्याच्या योगानें जणुं काय अश्रूंनीं हिनें आपला अधरोष्ठ धुतला आहे. हिचा प्रफुल्लित होण्याचा काळ नसल्यामुळें जणुं काय दागिन्यांनीं विरहित असल्याप्रमाणें ही फुलांनीं रहित आहे. चिंतेनें तिनें मौन धारण केलें आहे, ह्मणून भ्रमरांचा गुंजारव हिच्यावर होत नाहीं. जणुं काय, रागावलेली ही माझी प्रिया पायां

पडणाऱ्या मला झिटकरून जाऊन सांप्रत हिला पश्चात्ताप झाला आहे असें वाटतें.'

'असो. ही वेल आहे तरी माझ्या प्रियेसारखी दिसते आहे. तेव्हां हिला आलिंगन दे ह्मणून प्रार्थना करावी.' असा विचार करून तिच्या जवळ जाऊन ह्मणाला, 'अग वेली, हृदय ठिकाणावर नसून फिरणाऱ्या माझ्याकडे अंमळ पहा. जर दैवयोगानें मला पुनः तिची ( **उर्वशीची** ) प्राप्ति होईल तर मी तिला निःसंशय अरण्यांतून दुसरीकडे नेऊन पुनः तिला अरण्यांत ह्मणून कधींही प्रवेश करूं देणार नाहीं.'

असें बोलून त्यानें त्या वेलीला घट्ट मिठी मारली. यावेळीं तो संगममणि **राजा**च्या हातांतच होता. तेव्हां त्याच्या प्रभावानें तत्काल वेल झालेली **उर्वशी** पूर्वरूप पावली! **राजा**नें वेलीला मिठी मारली होती तींतच **उर्वशी** प्रगट झाली, तरी तो डोळे झांकून स्पर्शसुखाचा अनुभव घेत असल्यामुळें त्याला ती दिसली नाहीं. वेलीचा स्पर्श प्रत्यक्ष **उर्वशी**च्याच स्पर्शासारखा आहे असें पाहून ह्मणाला, 'वाहवा! **उर्वशी**च्या अंगाचा स्पर्श झाल्याप्रमाणें यावेळीं माझ्या शरीराला समाधान प्राप्त झालें आहे. पण तीच असेल असा मात्र माझा विश्वास नाहीं. कारण हावेळपर्यंत ज्या ज्या वस्तूला ती माझी प्रिया असेल असें मानून मी आनंद मानीत होतों, ती ती क्षणमात्रानें दुसरीच कोणी तरी आहे असें मला वाटत होतें. तेव्हां असा पुष्कळ वेळ फसल्यामुळें मीं आतां स्पर्शावरून प्रियेला पुरतेपणीं ओळखलें आहे, तरी एकाएकीं डोळे मुळींच उघडीत नाहीं.'

कांहीं वेळ तसाच राहून हळूच डोळे उघडून ह्म-णाला, 'अरे! खरोखरच ही माझी **उर्वशी**!' असें बोलून दुःख भोगून तिचें दर्शन झाल्यामुळें **राजा** मूर्च्छित होऊन पडला. **उर्वशीनें** त्याचें समाधान केल्यावरून सावध होऊन तिला ह्मणाला, 'प्रिये! आतां मी जिवंत झालों. अग चंडि,† तुझ्या वियोगापासून उत्पन्न झालेल्या अंध-कारांत ( अज्ञानांत ) बुडत असलेल्या मला—निर्जीव झालेल्याला जशी चेतना प्राप्त व्हावी तशी, दैवानें तुझी प्राप्ति करून दिली आहे!'

**उर्वशी** डोळ्यांत अश्रु आणून ह्मणाली, 'महाराज, क्षमा करा, क्षमा करा. मी रागाच्या स्वाधीन झाल्यामुळें आपल्याला अशी दुःखावस्था प्राप्त झाली.'

**राजा** ह्मणाला, 'तूं मला प्रसन्न करून घ्यायला नको. तुझ्या दर्शनानेंच माझा अंतरात्मा आणि सर्व अ-वयव प्रसन्न झाले आहेत. पण एवढा वेळपर्यंत माझ्या वांचून तूं एकटी कशी राहिलीस तें आधीं सांग पाहूं?'

हावेळपर्यंत **उर्वशीच्या** विरहानें दुःखित होऊन **राजा** अव्यवस्थित झाला होता. तो आतां तिच्या समा-गमानें आनंदित होऊन व्यवस्थित झाला. **उर्वशीला** ह्मणाला, 'अग, काय सांगूं! मोर, कोकिल, हंस, चक्र-वाक, भ्रमर, हत्ती, पर्वत, नदी, हरिण असे एक कीं दोन किती ह्मणून सांगूं? तुझ्याकरितां ह्या अरण्यांत परिभ्र-

---

† अत्यंत रागीट स्वभावाच्या मनुष्याला 'चंड' म्हणतात. येथें उर्वशीला संबोधन दिलें आहे ह्मणून चंडि असें स्त्रीलिंगी घेतलें आहे.

मण करणाऱ्या मीं कोणाकोणाला तुझा समाचार विचारला नाहीं? सर्वांला विचारला आहे.'

**उर्वशी** दुःखित होऊन ह्मणाली, 'माझी काय हकीकत झाली ती आपण अंतःकरणानें जाणलीच असेल. तेव्हां मी पुनः कशाला सांगूं?'

**राजा** ह्मणाला, 'प्रिये, खरें विचारशील तर अंतःकरण ह्मणून काय आहे तें मला मुळींच समजत नाहीं.'

हें ऐकून—विरहदुःखानें उन्मत्त झाल्यामुळें याचें मन ठिकाणावर नव्हतें व त्यामुळें याला खरी हकीकत कांहीं माहीत नसेल, असें समजून **उर्वशी** ह्मणाली, 'ऐकून घ्यावें महाराज. पूर्वीं भगवान् **स्वामिकार्तिक** यांनीं ब्रह्मचर्यव्रत घेऊन अकलुष नांवाचा हा **गंधमादन**पर्वताचा प्रदेश आपलें रहाण्याचें स्थान केलें. आणि येथें एक मर्यादा केली.'

**राजा** ह्मणाला, 'कसली ती मर्यादा?'

**उर्वशी** ह्मणाली, 'दुसरी कांहीं नाहीं. ब्रह्मचर्याला विघ्न करणाऱ्या काय त्या स्त्रिया आहेत; ह्मणून जी स्त्री या प्रदेशांत येईल तिला वेलीचें रूपांतर प्राप्त होईल अशी मर्यादा केली. व कदाचित् कोणीं न समजून येथें प्रवेश केला तर **पार्वती**च्या चरणकमलाच्या रंगापासून उत्पन्न झालेल्या संगमनीय नांवाच्या मण्यावांचून तिला पूर्वरूप प्राप्त व्हावयाचें नाहीं असा उश्शाप देऊन ठेविला. मला ही गोष्ट माहीत होती, तरी गुरूच्या शापानें हृदय वेडें झाल्यामुळें हा देवतांचा नियम माझ्या स्मरणांत राहिला नाहीं. आणि रागाच्या भरांत एकदम

स्त्रियांनीं वर्ज करावयाचें अशा ह्या कुमारवनांत शिरलें. शिरतांच ह्या अरण्याच्या जवळ वेलीचें रूप मला प्राप्त झालें!'

हें ऐकून राजा ह्मणाला, 'तूं सांगितलेंस तें सर्व खरें असण्याचा संभव आहे. कारण बहुत वेळ विलास करून एकाच बिछान्यावर अंमळ पलीकडे मला झोंप लागली असतां, मी कोठें प्रवासांत गेलों आहें कीं काय, असें तूं मानीत होतीस, तीं तूं, मी येथें अशा दुःखांत निमग्न झालों असून, इतका वेळ माझा वियोग कसा सहन करशील?' मणि तिला दाखवून ह्मणाला, 'संगमाचें निमित्त जें तूं सांगितलेंस तें हेंच. ह्या मण्याच्या प्रभावानेंच तुझी भेट झाली.'

उर्वशीला त्या मण्याची ओळख होती. त्याला पाहून ती ह्मणाली, 'अगबाई! हा संगमनीय मणि आपल्याला कसा मिळाला? ह्मणूनच आपण त्या वेलीला आलिंगन करितां क्षणींच मला हें रूप प्राप्त झालें.'

**राजा** त्या मण्याला **उर्वशी**च्या ललाटावर ठेवून ह्मणाला, 'वाहवा! ललाटावर ठेवलेला हा मणि याची कांति चहूंकडे फांकल्या मुळें—नुकताच उदय पावलेल्या सूर्याचे किरण ज्यावर पडले आहेत, अशा लाल कमलासारखें तुझें मुख रमणीय दिसतें.'

**राजा उर्वशी**सहवर्तमान विलास करण्याकरितां आपली राजधानी सोडून निघाला त्याला पुष्कळ दिवस झाले होते. व अरण्यांत अनेक प्रकारचे विलास करून उर्वशीलाही ते पुरेसे झाले होते. तशांतून थोडक्याच वेळापर्यंत तिच्या विरहाचें **राजा**नें जें दुःख अनुभवलें त्यामुळें तो फार श्रमला होता. तेव्हां आतां नगरांत जाऊन

विश्रांति घ्यावी असा विचार करून **उर्वशी** ह्मणाली, 'गोडबोल्या, पुरे पुरे, ऐकलें तुझें बोलणें. राजधानी सोडून आपण निघालों त्याला फार दिवस झाले. कदाचित् कामदार लोक आपल्याला वेडे ह्मणतील, तर आतां आपण लवकर घराकडे जाऊंया.'

आणखी कितीही वर्षे गेलीं असतीं तरी **उर्वशीच्या** नादाला लागलेल्या **राजाला** आपल्या घरादाराचें स्मरण देखील झालें नसतें. पण **उर्वशीनेंच** त्याची आठवण काढली व ती घरास जाण्यास तयार झाली. तेव्हां **राजा** ह्मणाला, 'तूं ह्मणतेस तसें कां होईना? चल बापडी.'

**गंधमादन** हा **प्रयागापासून** पुष्कळ दूर असून घोडा, रथ वगैरे कांहीं वाहन त्यांच्याजवळ मुळींच नव्हतें; ह्मणून **उर्वशी** ह्मणाली, 'पण महाराजांनीं कसें जाण्याचा विचार केला आहे?'

**राजा** ह्मणाला, 'विजेच्या कांतीनें शोभणारा, इंद्रधनुष्याच्या योगानें चित्रविचित्र पताका लावल्याप्रमाणें दिसणारा असून जो केवळ विमानासारखा दिसतो आहे, अशा मेघावर बसवून प्रिये, मला आपल्या घरीं घेऊन जा.' आनंदानें नाचत ह्मणाला, 'ज्याला सहचरीचा समागम प्राप्त झाला आहे, व ज्याच्या अंगावर रोमांच तांठले आहेत, व स्वेच्छेनें ज्याला विमान प्राप्त झालें आहे, असा तरुण हंस प्रियेसहवर्तमान यथेच्छ विहार करतो.'

राजा **पुरूरवा** **इंद्राचा** प्रियमित्र होता हें पूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे. तो यावेळीं आपल्या घरीं जाण्यास तयार झाला असून त्याच्या जवळ कांहीं वाहन नाहीं, ही अडचण अंतर्ज्ञानानें जाणून **इंद्रानें** तत्काळ

त्याला एक विमान पाठविलें. अकस्मात् विमान येतांच आनंदित झालेला **राजा**, आपली प्रिया **उर्वशी** हिच्या-सहवर्तमान, त्या विमानांत बसून परत आपल्या राजधानीकडे निघाला. याप्रमाणें ही रंगेली स्वारी बहुत दिवस वनक्रीडा करून व सुखाबरोबरच अनेक प्रकारच्या दुःखांचा अनुभव घेऊन पुनः खुष होत्साती एकदाची आपल्या घरीं प्राप्त झाली.

राजा **पुरूरवा** यावेळीं कोठें मोहिमेवर जाऊन विजयी होऊन आला नव्हता, तर तो एका वेश्येच्या नादीं लागून खुशाल चैन करावयाला गेला होता. तेव्हां प्रजेनें त्याचा सन्मान किंवा त्याच्या आगमनाचा उत्सव वगैरे करण्याचें कांहीं कारण नव्हतें. तरी त्याच्या अप्रतिम गुणांनीं अनुरक्त झालेल्या प्रजेनें त्याचें मोठें गौरव करून तो पुनः सुरक्षित आल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला.

## भाग पांचवा.

याप्रमाणें **उर्वशी**सहवर्तमान राजा **पुरूरवा** परत आपल्या राजधानींत आला. यापूर्वीं हावऱ्यासारखी त्याची स्थिति झाली होती. **उर्वशी**च्या अधरामृताचें प्राशन करीत सार्वकाल रहावें असें त्याला वाटत होतें. व त्यामुळें त्यानें राज्यकारभाराकडे मुळींच लक्ष दिलें नव्हतें. पण सांप्रत त्याचें मन अंमळ स्थिर झालें होतें. बरेच दिवस **उर्वशी**सहवर्तमान विषयोपभोग केल्यामुळें त्याचा हावरेपणा अंमळ कमी झाला, व आतां तो थोडथोडें राज्यकारभाराकडे लक्ष पुरवूं लागला. **उर्वशी** त्याच्या घरांत विवाहित स्त्रीप्रमाणें खुशाल आनंदांत रहात होती.

राणी **वसुमती** ही मुख्य पट्टराणी होती, तरी **राजाचें** **उर्वशी**वर विशेष प्रेम असल्यामुळें व हरएक कामाकाजांत तीच पुढें पुढें होत असल्यामुळें पट्टराणी **उर्वशीच** झाली होती, असें ह्मटलें तरी चालेल. बिचारी **वसुमती** ही केवळ नांवाची धनीण होती. **उर्वशी**ला एखाद्या कुलवधूचें स्वरूप प्राप्त झालें, तरी तिचा मुळचा जातिस्वभाव नाहींसा झाला नव्हता.

**राजाला** पुत्रमुखाचें दर्शन होईपर्यंत तिनें त्याच्या जवळ रहावें अशी **इंद्राची** आज्ञा होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. असा नियम असल्यामुळें **उर्वशी**ला त्याची मोठी धास्ती होती. सामान्यतः वेश्यांला पोर होणें हें मुळींच आवडत नाहीं. आणि कदाचित् झालें तर उतार वयांत व्हावें असें वाटतें. त्यांतूनही वर सांगितलेली

**इंद्रा**ची आज्ञा होती ह्मणून **उर्वशी** संतति होण्याचा प्रसंग न यावा याबद्दल देवाला नवस करीत होती. तरी तिच्यानें त्याचा परिहार करवला नाहीं.

**राजा**पासून तिला गर्भधारण झालें व ती गोष्ट, ती मोठी चतुर असल्यामुळें, तत्काल तिच्या ध्यानांत आली. मानवी स्त्रियांप्रमाणें नऊ महिने पर्यंत गर्भ धारण करून नंतर प्रसूत होणें हा प्रकार तिला लागू नव्हता. ती देवलोकांत राहणारी असल्यामुळें गर्भधारण होतांच प्रसूति व्हायची, असें असल्यामुळें **राजा**चा विरह न व्हावा अशी इच्छा करणारी **उर्वशी** त्याला न कळवितां **च्यवन**-ऋषीच्या आश्रमांत जाऊन तेथें प्रसूत झाली. व तिनें आपला पुत्र त्या आश्रमांत राहणारी **सत्यवती** नांवाची एक तापसी होती तिच्या स्वाधीन करून ती परत **राजा**कडे आली.

राजा **पुरूरव्या**ला हें वर्तमान मुळींच माहीत नव्हतें, इतकेंच नव्हे, तर **उर्वशी**ला गर्भधारण झालें हें देखील त्याच्या लक्ष्यांत आले नाहीं. एवढें मोठें ऐश्वर्य असून अद्याप संतान नाहीं, ही गोष्ट त्याच्या मनाला लागली होती. तो पुत्राविषयीं फारच आतुर झाला नव्हता, तरी पुत्र असावा असें हळू हळू त्याच्या मनांत येत होतें.

एके दिवशीं कांहीं पर्वणीचा योग होता, ह्मणून **राजा** त्या दिवशीं राणीसहवर्तमान **गंगा** आणि **यमुना** यांच्या संगमावर जोड्यानें स्नान करण्यास गेला होता. स्नान झाल्यावर तेथें पुष्कळ दान धर्म वगैरे करून स्वारी परत आली. तो आपल्या महालाच्या सुखशाळेंत अलं-

कार घालीत बसला आहे, इतक्यांत त्याचा परम मित्र **माणवक** त्याच्या भेटीस आला.

**माणवक** आपल्याशींच ह्मणाला, माझा प्रिय मित्र राजा **पुरूरवा** हा **उर्वशी**सहवर्तमान फार दिवस, देवांनीं विहार करण्याच्या प्रदेशांत, क्रीडा करून परत आला व सांप्रत राज्यकारभार पहात आहे. इतके दिवस त्याच्या विरहानें दुःखित झालेल्या प्रजेचें मनरंजन करीत आहे. पोटीं संतान नाहीं यावांचून त्याला दुसरें कसलेंच दुःख नाहीं. पर्वणीच्या निमित्तानें आज संगमावर स्नान करून स्वारी येथें अलंकार करीत बसली आहे. तर त्याच्या अंगाला लावायच्या चंदनाच्या उटीचा प्रत्यक्ष बंधूप्रमाणें विभाग घेण्याकरितां आपणहीं त्याच्या जवळ जावें.

असा विचार करून **माणवक** राजाजवळ आला. इतक्यांत एका पक्ष्यानें झडप घालून एक रत्न चोचींत धरून नेल्याबद्दल मोठी गडबड झाली. ज्या मण्यानें **उर्वशी**चा समागम करून दिला होता, तो संगमनीय नांवाचा मणि **राजा** नेहमीं आपल्या मस्तकावर धारण करीत होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. तो यावेळीं अलंकार धारण करीत असल्यामुळें त्याचे सर्व अलंकार जवळ ठेवले होते, व त्याच्या इच्छेप्रमाणें खवास लोक एकेक अलंकार त्याच्या आंगावर घालीत होते. त्या संगमनीय मण्यांत कलाबतूचा दोरा घालून राजा तो आपल्या मस्तकावर धारण करीत होता. इतर अलंकाराबरोबर तो मणिही यावेळीं तेथें होता.

पक्ष्यानें त्याचें तेज पाहून हा कसलातरी मासाचा गोळा असेल असें समजून त्यावर झडप घातली. तो

एकदम मणि घेऊन आकाशांत उडाला. सर्व चाकरलोक घाबरे होऊन मणि गेला, मणि गेला ह्मणून एकच गलबला करूं लागले. तो ऐकून **माणवक** ह्मणाला, 'अरेरे! फार वाईट झालें. हा संगमनीय मणि **राजाला** फारच आवडत होता.'

मणि गेला हें पाहून **राजाचा** अलंकार धारण करण्याचा क्रम पुरता झाला नव्हता, तरी तो एकदम पक्ष्याच्या पाठीस लागला. **वेधक** नांवाचा एक सरदार नेहमीं त्याच्या बरोबर रहात असे. तो त्याचा शरीररक्षक होता. **राजा** त्याला ह्मणाला, 'अरे **वेधका**, आपण होऊन मृत्यूच्या मुखांत जाऊन पडणारा असा तो चार पक्षी कोठें आहे? ज्या दुष्टानें अगदीं पहिल्या प्रथम कोतवालीवरच धाड घातली!'

**वेधक** ह्मणाला, 'हा पहा! हा पहा! ज्याच्या चोंचींतून कलाबतूचा दोरा खालीं लोंबतो आहे. आणि त्या मण्याच्या तेजानें आकाशाला प्रकाशित करीत होत्साता तो दुष्ट घिरट्या घालतो आहे.'

**राजा** ह्मणाला, 'मी आतां त्याचा समाचार घेतों. चोंचींतून खालीं लोंबत असलेल्या कलाबतूच्या दोऱ्यानें शोभणारा हा मणि तोंडांत धरून, आकाशांत मंडलाकार लवकर लवकर उडत असलेला पक्षी त्या मण्याचा प्रकाश अलातचक्रासारखा* भांसवितो आहे. पण आतां येथें काय करावें?'

---

* अलात म्हणजे जळकें लांकूड अथवा उजेडी. हें अलात हातांत घेऊन एकसारखें गरगर फिरविलें असतां त्याचा प्रकाश चक्रासारखा दिसतो, म्हणून त्याला अलातचक्र म्हणतात.

**माणवक** ह्मणाला, 'अरे, अशा प्रसंगीं दया करण्यांत काय अर्थ आहे! ह्या पक्ष्यानें अपराध केला आहे तेव्हां याला शिक्षा करणें हेंच योग्य आहे.'

राजाला त्या पक्ष्यावर बाण मारणें योग्य वाटलें नव्हतें; पण **माणवकानें** सांगितल्यावरून **राजा** ह्मणाला, 'चांगलें सांगितलेंस. त्याला मारावें हेंच योग्य.' चाकराला ह्मणाला, 'अरे, माझें धनुष्य कोठें आहे तें आणा.'

चाकरांनीं बाणासह धनुष्य आणून **राजाच्या** हातांत दिलें. व **राजा** त्या पक्ष्यावर बाण सोडणार होता, पण तो फार दूर गेल्यामुळें त्याला दिसला नाहीं. तो ह्मणाला, 'अरे! तो दुष्ट पक्षी कोठें दिसत नाहीं, आतां काय करावें?'

**माणवक** ह्मणाला, 'असा इकडून दक्षिण दिशेच्या भागानें तो दुष्ट पक्षी गेला आहे. हा पहा! हा पहा! दिसतो आहे.'

**राजा** त्याच्याकडे पाहून ह्मणाला, 'वाहवा! यावेळीं हा, चहूंकडे फांकलेल्या मण्याच्या लाल कांतीनें ह्या दक्षिण दिशेच्या मुखावर, जणुं काय तुराच लावला आहे, असें दिसतें. आतां धनुष्य घेऊन तरी काय करावयाचें आहे? तो बाणाच्या टप्प्याच्या पलीकडे गेला. कारण, पक्ष्यानें दूर नेलेला तो मणि मेघमंडलाचा भेद करून सायंकालीं उदय पावलेल्या मंगळासारखा* दिसतो.'

---

* मंगळाच्या ताऱ्याचा प्रकाश बराच लाल दिसतो हें प्रसिद्ध आहे. मण्याचाही प्रकाश लालच होता, ह्मणून राजानें त्याची उपमा दिली.

याप्रमाणें तो संगमनीय मणि हातावाहेर गेला असें पाहून, **राजा लातव्यन**नांवाच्या चोपदाराला ह्मणाला, 'अरे, माझ्या हुकुमानें सर्व लोकांना असें कळीव कीं, आतां संध्याकाळ होत आला आहे, तेव्हां हा पक्षी कोठें तरी झाडावर बसेल, व त्यावेळीं याच्या तोंडांतून मणि खालीं पडेल. तर सर्वांनीं त्यावर लक्ष्य ठेवून कोणाला मणि मिळेल तर त्यानें तो आणून द्यावा.'

'हुकुमाप्रमाणें करतों' असें सांगून चोपदार बाहेर निघून गेला. मणि गेल्यामुळें **राजा**चें मन अस्वस्थ झालें आहे, असें पाहून **माणवक** ह्मणाला, 'मित्रा, यावेळीं आतां तूं विश्रांति घे. तो रत्नचोर कोठें जाणार आहे? व तुझ्या शिक्षेपासून तो मुक्त तरी कसा होईल?'

**राजा** खालीं बसून **माणवकाला** ह्मणाला, 'गड्या, त्या मण्यावर माझें इतकें मन आहे तें—केवळ तो एक उत्तम रत्न आहे ह्मणून नव्हे. तो संगमनीय आहे, व त्याच्याच योगानें मला प्रिय **उर्वशी**चा समागम झाला ह्मणून मला त्याचें इतकें अगत्य आहे.'

**उर्वशी** प्रसूत होऊन तिनें आपला मुलगा जेथें तापसी जवळ ठेवला होता, तो **च्यवना**चा आश्रम **प्रतिष्ठान** नगराच्या जवळच होता. **उर्वशी** तेथें प्रसूत होऊन तिनें आपला मुलगा **सत्यवती** नांवाच्या तापसीच्या हवालीं केला होता हें वर सांगितलेंच आहे. **सत्यवतीनें** त्या मुलाचें लालन पालन करून लहानाचा थोर केला. या वेळीं त्याचें बारा वर्षांचें वय झालें होतें. क्षत्रियवर्णाला उचित असे त्याचे सर्व संस्कार **च्यवन**ऋषीनें केले व त्याला धनुर्विद्येचाही अभ्यास करविला.

**च्यवन**ऋषीचा आश्रम म्हणजे शांततेचें एक माहेर घर होतें. प्राणिमात्र परस्परांचें वैर सोडून तेथें वास्तव्य करीत असत. अशा आश्रमांत आमच्या नायकाचा पुत्र राजबिंडा **आयु** इतर ऋषिबालकांबरोबर फळें मुळें खाऊन खुशाल आनंदांत रहात होता; तरी त्याचें क्षात्रतेज दडलें नव्हतें. ज्याचा जो स्वाभाविक गुण असतो तो प्रसंगीं व्यक्त झाल्यावांचून रहात नाहीं.

राजा **पुरूरव्या**चा आवडता संगमनीय मणि चोंचींत धरून तो पक्षी आकाशमार्गानें **च्यवन**ऋषीच्या आश्रमांत येऊन एका झाडावर बसला होता. मण्याचें तेज चहूंकडे फांकलेलें पाहून राजपुत्र **आयु** याचें क्षात्रतेज प्रगट झालें. त्यानें आपल्या धनुष्याला दोरी चढवून तत्काल त्या पक्ष्यावर नेम धरून असा एक बाण मारला कीं, त्याच्या योगानें तो बाणासह खालीं पडला.

**राजा**चा हुकूम चहूंकडे जाहीर झालाच होता. तेव्हां मार्गानें जाणाऱ्या एका मनुष्याला बाणासह तो पक्षी दृष्टीस पडल्यावरून त्यानें तो थेट राजवाड्याकडे आणला, व चोपदाराच्या हवालीं केला. तो पक्षी घेऊन चोपदार मोठ्या आनंदानें **राजा**जवळ प्राप्त झाला, आणि मुजरा करून म्हणाला, 'महाराजांचा जयजयकार असो! हा पहा तो गेलेला पक्षी कोणीं आणून दिला आहे. आणि याच्या अंगांत हा बाण रुतला आहे, त्यावरून जणुं काय महाराजांचा रोपच बाणरूपानें परिणाम पावून, त्यानें याच्या शरीराचा भेद केल्यामुळें, घडलेल्या अपराधाला योग्य अशी शिक्षा प्राप्त होऊन हा पक्षी रत्नासहवर्तमान आकाशांतून खालीं पडला आहे, असें वाटतें.'

अकस्मात् कोणाचा बाण लागून पक्षी खालीं पडला, हें पाहून सर्वांला मोठें आश्चर्य वाटलें. चोपदारानें तो मणि धुवून पुसून आणला व आतां हा कोणाजवळ द्यावा ह्मणून विचारलें. तेव्हां **राजानें** तो दागिन्यांच्या पेटींत नेऊन ठेव असें **वेधकाला** सांगितलें. त्याप्रमाणें तो घेऊन गेला, पण तो बाण कोणाचा याचा कांहीं खुलासा झाला नाहीं. ह्मणून **राजा** चोपदाराला ह्मणाला, 'आर्य **लातव्या**, हा बाण कोणाचा काय हें तुला कांहीं माहीत आहे काय?'

बाणावर आपापलें नांव घालण्याची पूर्वकालीं चाल होती. त्याप्रमाणें त्या बाणावर **आयूचें** नांव लिहिलेलें होतें. **राजाचा** प्रश्न ऐकून चोपदारानें बाण लक्ष्यपूर्वक पाहिला व त्याच्यावर कांहीं लिहिलें आहे असें त्याला दिसलें; पण ह्मातारपणामुळें त्याला अक्षरांचा उमज पडला नाहीं, ह्मणून तो **राजाला** ह्मणाला, 'सरकार, याच्यावर कोणाचेंसें नांव आहे असें दिसतें; पण अक्षरांची ओळख पटण्याइतकी माझी दृष्टि तीव्र नसल्यामुळें मला कांहीं समजत नाहीं.'

हें ऐकून **राजानें** तो बाण जवळ घेऊन पाहिला व त्याच्यावरचें नांव वाचून तो मोठ्या विचारांत पडला. तें पाहून **माणवक** ह्मणाला, 'तुला इतका विचार तो कसला पडला आहे?'

**राजा** ह्मणाला, 'बाण सोडणाराच्या नांवाचीं अक्षरें ऐक ह्मणजे विचार कां पडला तें समजेल. "**उर्वशी**-च्या गर्भापासून उत्पन्न झालेला पराक्रमी **ऐल (पुरूरवा)** राजाचा मुलगा कुमार **आयु** याचा, शत्रूंचें आयुष्य हरण

करणारा, हा बाण आहे." असें ह्या बाणावर लिहिलें आहे. यावरून काय तें पहा ह्मणजे झालें.'

हें ऐकून **माणवक** मोठ्या आनंदानें ह्मणाला, 'मित्रा, तुला पुत्रसंतति होऊन तुझा उत्कर्ष झाला याचा मला फार आनंद होतो.'

**राजा** ह्मणाला, 'गड्या, हें कसें झालें हें मला कांहीं समजत नाहीं. रात्रंदिवस मी तिला ( **उर्वशीला** ) सोडून कधीं राहिलेलों नाहीं. ती गरभार झाली असेंही कधीं माझ्या पाहण्यांत आलें नाहीं, मग बाळंत झाल्याचें कोठून पहाणार! फक्त थोडेसे दिवस तिच्या तोंडावर पांढुरकी दिसत होती, व स्तनाग्रें तटतटीत दिसत होतीं, व तिचें शरीरही अंमळ विकळ झाल्यासारखें वाटत होतें. याहून अधिक कांहीं नाहीं.'

**माणवक** ह्मणाला, 'तूं मनुष्यांच्या बायकांच्या स्थितीची आणि त्या **उर्वशीची** तुलना करूं नकोस. ज्या दिव्य स्त्रिया आहेत त्या आपल्या प्रभावानें पाहिजे त्या गोष्टी अगदीं गुप्त ठेवूं शकतात.'

**राजा** ह्मणाला, 'अरे, तूं ह्मणतोस तसें असेल; पण हा मुलगा इतके दिवस तिनें गुप्त ठेवला याचें कारण काय तें लक्ष्यांत येत नाहीं'

**माणवक** ह्मणाला, 'हात् त्याच्या! त्यांत इतकें गूढ तें काय आहे? अरे, बायका प्रसूत झाल्या ह्मणजे त्यांचें तारुण्य संपलें! तेव्हां आपल्याला तूं ह्मातारी असें समजून कदाचित् दूर करशील ह्मणून तिनें मुलाला दडवून गुप्त ठेवलें असावें.'

**राजा** ह्मणाला, 'पुरे बुवा तुझी थट्टा! जेव्हां तेव्हां

तूं आपली कांहीं तरी थट्टाच करीत असतोस. याचें खरें कारण काय असेल तें शोधून काढ.'

माणवक ह्मणाला, 'छे बुवा! तें काम आमचे हातून व्हावयाचें नाहीं. बायकांच्या गोष्टी आधीं कोणालाही समजत नाहींत. त्यांतून ती तर देवस्त्री. तिच्या गुप्त वर्तनाविषयीं कोणाच्यानें तर्क करवेल?'

हावेळपर्यंत राजाला पुत्र झाला असूनही तो त्याला माहीत नसल्यामुळें तो आपल्याला निपुत्रिक समजून दुःख करीत होता. बाणावरचीं अक्षरें वाचून आपल्याला पुत्र आहे असें त्याला वाटलें. तरी त्याच्या विषयीं विशेष कांहीं माहिती न मिळाल्यामुळें तो संशयांत पडला होता; पण त्याला फार वेळ संशयांत रहावें लागलें नाहीं. लवकरच सर्व गोष्टींचा आपोआप खुलासा होण्याचा समय आला.

च्यवनऋषीचा आश्रम अगदीं निरुपद्रवी व शांत होता, हें वर सांगितलेंच आहे. आयु आश्रमवासि इतर मुलांप्रमाणेंच वागत असून नुकतेंच त्याचें क्षात्रतेज प्रगट होऊन त्यानें पक्ष्यावर बाण सोडला; ही गोष्ट आश्रमवासि जनांच्या वर्तनाच्या विरुद्ध झाली. हें पाहून च्यवनासह सर्व ऋषींनीं—आयूला आतां आश्रमांत ठेवावयाचा नाहीं, असा विचार केला. आणि लगेच सत्यवती व एक शिष्य बरोबर देऊन आयूला राजा पुरूरव्याकडे त्यांणीं पाठविलें. ती तापसी सत्यवती मुलाला घेऊन राजवाड्यांत प्राप्त झाली, व चोपदारानें राजाचा हुकूम घेऊन तिला राजासमोर आणलें.

आयूला पाहून माणवक राजाला ह्मणाला, 'हा

मुलगा क्षत्रियाचा आहे असें दिसतें. तो बाणही कदाचित् याचाच असावा. याचा तोंडवळा अगदीं तुझ्यासारखाच दिसतो.'

हें ऐकून **राजा** ह्मणाला, 'तूं ह्मणतोस तसें खरें. याच्याकडे पाहतांच माझे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येतात. हृदयांत प्रेम उत्पन्न होतें. मनाला प्रसन्नता वाटते. अंगांत कंप सुटतो व याला अगदीं कडकडून मिठी मारावी असें वाटतें!'

इतक्यांत **सत्यवती आयूसहवर्तमान राजा**च्या अगदीं जवळ आली. तेव्हां त्यानें आसनावरून उठून तिला नमस्कार केला. **सत्यवतीनें**—सोमवंशाचें धारण करणारा हो! असा त्याला आशीर्वाद दिला.

**राजा**कडे व **आयू**कडे लक्ष्यपूर्वक पाहून **सत्यवती** मनांत ह्मणाली, 'या दोघांचें बापलेकांचें नातें आहे हें कोणीं न सांगितलें तरी पाहणाऱ्याच्या सहज लक्ष्यांत येतें. हाच राजा **पुरूरवा** व या मुलाचा पिता हें यांच्या तोंडवळ्यावरून कोण बरें ओळखणार नाहीं? **आयू**ला ह्मणाली, 'बाळा, आपल्या बापाला नमस्कार कर.'

**आयु** एवढा मोठा झाला तरी त्याला आई आणि बाप यांची मुळींच ओळख नव्हती. जन्मापासून जिनें पालन पोषण केलें त्या **सत्यवती**लाच तो आई मानीत असे, व **च्यवना**ला बाप मानीत असे. **सत्यवतीनें राजाला** नमस्कार करावयास सांगितला तेव्हां मोठ्या नम्रतेनें हात जोडून त्याणें **राजाला** नमस्कार केला. **राजानें** त्याला—आयुष्मान् हो! असा आशीर्वाद दिला.

**राजा**च्या पायांचा स्पर्श झाला व त्यापासून **आयू**ला

मोठें सुख झालें. तेव्हां तो मनांत ह्मणाला, 'हा माझा पिता आणि मी याचा पुत्र हें नातें ऐकूनच जर मला इतका आनंद होतो, तर आपल्या वडिलांच्या मांडीवर खेळून वाढलेल्यांना किती आनंद होत असेल, व त्यांचा आपल्या वडिलांवर किती स्नेह असेल.'

याप्रमाणें शिष्टाचार व्हायचा तो झाला. तेव्हां **राजा सत्यवती**ला ह्मणाला, 'बाई, आपण आज मला दर्शन देण्याचा अनुग्रह केला याचें कारण काय तें ऐकण्याची फार इच्छा आहे.'

**सत्यवती** ह्मणाली, 'ऐकावें महाराज. हा चिरंजीव **आयु** जन्मास आला तेव्हांच **उर्वशी**नें कांहीं कारणामुळें याला माझ्या हातीं दिलें. मी लहानपणापासून, आपल्याला कळेल तसें, याचें लालन पालन केलें. क्षत्रियाला उचित असे याचे जातकर्मादिसंस्कार भगवान् **च्यवन**ऋषींनीं केले. याला सर्व विद्या आणि कला शिकविल्या. यानें धनुर्वेदाचा पूर्ण अभ्यास केला आहे.'

**राजा** ह्मणाला, 'हें फार चागलें झालें.'

**सत्यवती** ह्मणाली, 'हा **च्यवना**च्या आश्रमांत आजपर्यंत मोठ्या सुखानें रहात होता. आज बरोबरच्या ऋषिबालकांसह हा फळें, पुष्पें व समिधा आणण्याकरितां आश्रमाच्या जवळच अरण्यांत गेला होता. तेथें यानें आश्रमवासि जनांच्या विरुद्ध कर्म केलें.'

हें ऐकून **माणवक** ह्मणाला, 'यानें असें काय केलें बरें?'

**सत्यवती** ह्मणाली, 'दुसरें कांहीं नाहीं. आश्रमांतल्या एका झाडावर एक पक्षी मांसाचा गोळा तोंडांत ध-

रून बसला होता त्याच्यावर यानें बाणाचा नेम धरला. ही गोष्ट तापसांच्या वर्तनाविरुद्ध झाली.'

राजा ह्मणाला, 'बरें, मग पुढें काय झालें?'

सत्यवती ह्मणाली, 'मग हें वर्तमान आमचे गुरु भगवान् च्यवनमुनि यांला समजलें; तेव्हां त्यांनीं तत्काल मला आज्ञा केली कीं, "हा मुलगा ही एक ठेव उर्वशीनें आमच्या जवळ ठेविली आहे, तर तूं आतां याला घेऊन जा आणि उर्वशीच्या स्वाधीन कर." अशी गुरूची आज्ञा झाल्यावरून मी येथें आलें व आतां उर्वशीची भेट घ्यावी अशी माझी इच्छा आहे.'

राजानें सत्यवतीला क्षणभर बसावयास सांगून उर्वशीला बोलावून आणण्या विषयीं चोपदाराला हुकूम केला. त्याप्रमाणें उर्वशी बाहेर येईपर्यंत राजाला दम निघाला नाहीं. त्या सुंदर व तेजस्वी आयूला केव्हां घट्ट मिठी मारीन असें त्याला झालें होतें. ह्मणून तो त्याला ह्मणाला, 'वत्सा, अरे इकडे ये, इकडे ये. बाकीच्या वस्तूचा स्पर्श—ज्या जागीं ती लागेल तेवढ्या पुरताच होतो, पण पुत्राचा स्पर्श हा सर्व अंगाला व्यापणारा आहे. तर पुत्रा—जसा चंद्र आपल्या किरणांनीं चंद्रकांताला पाझरवितो तसा तूंही माझ्या मनाला संतोष दे.'

आयूची अद्याप भीड चेपली नव्हती. सत्यवतीनें सांगितल्यावरून तो पुरूरव्याला आपला बाप समजला होता, तरी त्याच्या जवळ जाण्याविषयीं त्याला फार संकोच वाटला. तेव्हां सत्यवती ह्मणाली, 'बाळा, जा जा. आपल्या बापाकडे जा; आणि त्याला आनंद दे.'

तिनें सांगितल्यावरून आयु राजाजवळ आला.

तेव्हां त्याला प्रेमानें आलिंगन देऊन **राजा** ह्मणाला, 'मुला, हा माझा प्रियमित्र ब्राह्मण (**माणवक**) याला— मनांत कांहीं शंका न ठेवतां, नमस्कार कर.'

**माणवक** ह्मणाला, 'हें तूं सांगायला कशाला पाहिजेस? त्याला कां शंका येईल? हा माझा चेहरा पाहून तो साशंक होईल असें तुला वाटलें होय? पण तो ऋषीच्या आश्रमांत पुष्कळ दिवस राहिलेला आहे, तेव्हां अगदीं हुबेहुब माझ्यासारखे दिसणारे वानर तेथें त्याच्या ओळखीचे झाले असतील!'

हें ऐकून हंसत हंसत **आयूनें** **माणवकाला** नमस्कार केला. तेव्हां त्यानें—तुझें कल्याण होवो! आयुष्याची उदंड वृद्धि होवो! असा त्याला आशीर्वाद दिला. इतक्यांत चोपदार **उर्वशीला** बोलावून घेऊन आला. तिनें सिंहासनावर बसलेल्या **राजाच्या** मांडीवर बसलेल्या आयूला पाहिलें. बाळंतपणाच्या नंतर त्याला मुळींच न पाहिल्यामुळें प्रथम चटकन् तिला त्याची ओळख मिळाली नाहीं. नंतर तापसी **सत्यवती** हिच्याकडे पाहिलें तेव्हां तिला आपल्या मुलग्याची ओळख पटली. ती मनांत ह्मणाली, 'अग बाई, इतक्यांत हा एवढा मोठा झाला आहे!'

**उर्वशी** जवळ आली असें पाहून **राजा** **आयूला** ह्मणाला, 'मुला, तुला पहाण्याविषयीं उत्सुक झालेली व प्रेमानें पान्हा फुटल्यामुळें जिच्या अंगावरचा पदर दुधानें भिजला आहे, अशी ही तुझी आई आली आहे, तर तूं हिला नमस्कार कर.'

इतक्यांत तापसी **सत्यवती** आयूला हातीं धरून उर्वशीजवळ गेली. **उर्वशीनें** तिला नमस्कार केला व तिनें— आपल्या भर्त्याला बहुत मान्य हो! असा आशीर्वाद दिला.

**आयूनें**—आई नमस्कार करतों, ह्मणून **उर्वशीला** नमस्कार केला. तेव्हां **उर्वशीनें**—बाळा, बापाची सेवा करणारा हो! ह्मणून त्याला आशीर्वाद दिला.

नंतर **सत्यवती** व **आयु** यांसहवर्तमान **उर्वशी राजा**जवळ प्राप्त होऊन—महाराजांचा जयजयकार असो! असें ह्मणाली. **राजानें**—पुत्रवतीचें तुझें स्वागत असो! असें बोलून तिला आपल्याजवळ आसनावर बसवून घेतलें. नंतर सर्व मंडळी आपापल्या आसनावर बसली.

तेव्हां **सत्यवती उर्वशीला** ह्मणाली, 'बाई **उर्वशि**, हा तुझा मुलगा **आयु** याचा सर्व विद्याभ्यास पूर्ण झाला आहे. सांप्रत कवच धारण करून लढाऊ वीर होण्याला योग्य आहे. हा तुझा मुलगा इतके दिवस माझ्याजवळ ठेवणीस होता, तो तुझ्या भर्त्याच्या देखत मी आतां तुझ्या हातीं देतें. झालें माझें काम आटोपलें. आतां तुह्मी मला निरोप द्याल, तर मी आपल्या आश्रमाकडे जाईन ह्मणतें. माझ्या आश्रमधर्माचा खोळंबा होतो आहे, तर मला आपली लवकर जाऊं द्या.'

**उर्वशी** ह्मणाली, 'फार दिवसांनीं आर्यपुत्राची (**राजाची**) भेट घेतलीत. आतां स्वस्थ अंतःकरणानें पुनः दर्शन देण्याकरितां आपण खुशाल आश्रमांत जा.'

**सत्यवती** जायाला निघाली, तेव्हां **राजा** तिला ह्मणाला, 'भगवान् **च्यवनमुनीला** माझा साष्टांग नमस्कार सांगा.'

हें ऐकून तापसी—तसें करतें, ह्मणून तेथून निघाली. आयूला आजपर्यंत तीच आई वाटत होती व तीही त्याच्यावर तसेंच प्रेम करीत होती. सत्यवती परत जायाला निघाली तेव्हां तो तिला मिठी मारून डोळ्यांत अश्रु आणून ह्मणाला, 'सत्यवती आई, खरोखरच का निघालीस? आणि मलाच कां येथें सोडलेंस? मलाही बरोबर घेऊन चल.'

नात्यापेक्षां सहवासाचा ओढा मोठा बळकट आहे. प्रत्यक्ष आई आणि बाप प्रेमानें मुके घेत आहेत तरी आयूला त्याचें कांहीं अधिक वाटलें नाहीं. तो रडवें तोंड करून सत्यवतीबरोबर जाण्यास निघाला. तेव्हां त्याची समजूत करून राजा त्याच्या हनुवटीला हात लावून ह्मणाला, 'अरे बाळा, तूं पहिल्या आश्रमांत (ब्रह्मचर्यांत) तपोवनांत राहिलास. आतां दुसरा आश्रम ह्मणजे गृहस्थाश्रम याचा स्वीकार करण्याचें हें तुझें वय आहे. आतां अरण्यांत जाण्याची कां इच्छा करतोस? पुढें तिसरा आश्रम (वानप्रस्थ) घेशील तेव्हां जा.'

हें ऐकून सत्यवती त्याला कुरवाळून ह्मणाली, 'बाळा, तुझा पिता सांगतो आहे तसें कर.'

आयु वयानें लहान होता, तरी त्याची बुद्धि प्रौढ होती. सर्वांनीं याप्रमाणें सांगतांच त्यानें आपला हट्ट सोडला, तरी त्याचा पोरस्वभाव गेला नव्हता. आश्रमांत असतां त्यानें आपल्याला खेळण्याकरितां एक मोर बाळगला होता. सत्यवतीला ह्मणाला, 'सत्यवती आई, तर मग एवढें तरी कर कीं, मान खाजविल्यामुळें ज्याला मोठें सुख वाटत होतें व जो माझ्या मांडीवर निजत

होता, त्या माझ्या चिमुकल्या मोराला मोठे पिसारे आले ह्मणजे इकडे धाडून दे.'

**सत्यवती**—खचीत धाडून देतें, असें सांगून त्याची कशी तरी समजूत करून ती जाण्यास निघाली. **राजा** आणि **उर्वशी** यांनीं तिला नमस्कार केला, व तिनें त्या उभयतांला योग्य आशीर्वाद दिले. **आयू**वर तिचा विशेष लळा असल्याकारणानें त्याला सोडून जाण्याचें तिला मोठें कठीण पडलें होतें; तरी मन घट्ट करून ती कशी तरी तेथून निघून गेली. ती दृष्टी पडत होती तोंपर्यंत **आयु** एकसारखा स्फुंदत स्फुंदत तिच्याकडे पहात उभा राहिला होता. लवकरच ती दिसेनाशी झाली तेव्हां तर त्यानें रडून आकांत केला. तेव्हां **राजा** आणि **उर्वशी** या दोघांनींही मोठ्या प्रयासानें त्याची समजूत केली.

पुत्राच्या प्राप्तीनें परम आनंदित झालेला **राजा उर्वशी**ला ह्मणाला, 'हे सुंदरि, इंद्राणीच्या पोटीं उत्पन्न झालेल्या **जयंत**नांवाच्या पुत्राच्या योगेंकरून जसा **इंद्र** सर्व पुत्रवानांत श्रेष्ठ झाला आहे; तसा आज मी हा तुझा सुपुत्र **आयु** याच्या योगानें श्रेष्ठ झालों आहें!'

पुत्राचें मुख **राजा**नें पाहिलें, तेव्हां आतां आपल्याला **राजा**चा वियोग होईल, या गोष्टीचें **उर्वशी**ला हा वेळपर्यंत स्मरण झालें नव्हतें. **राजा**नें **इंद्रा**चें नांव घेतलें तें ऐकतांच तिला **इंद्रा**नें काय सांगितलें होतें, त्याची आठवण झाली. व आतां **राजा**ला सोडून आपल्याला गेलें पाहिजे असें समजून ती रडूं लागली. तें पाहून **माणवक** तिला ह्मणाला, 'अशा ह्या आनंदाच्या प्रसंगांत तुझ्या डोळ्यांतून अश्रु कां आले?'

राजाही दुःखित होऊन तिला ह्मणाला, 'हे सुंदरि, माझा वंश वाढविणारा हा पुत्र प्राप्त झाल्यामुळें मला अतिशय आनंद झाला आहे. असें असून दोरा तुटल्यामुळें सरांतून टपटप खालीं पडणाऱ्या मोत्यांप्रमाणें आपल्या पुष्ट स्तनांवर अश्रुबिंदु टाकीत होत्साती तूं यावेळीं रडतेस ती कां?'

हें ऐकून उर्वशी उसासा टाकून ह्मणाली, 'ऐकावें महाराज. ह्या पुत्राच्या दर्शनानें आनंद झाल्यामुळें प्रथम या गोष्टीचें मला विस्मरण झालें होतें. पण सांप्रत आपण इंद्राचें नांव घेतलें त्यावरून मला इंद्रानें केलेल्या नियमाची आठवण झाली.'

राजा ह्मणाला, 'इंद्रानें कोणती मर्यादा केली होती ती सांग.'

उर्वशी रडत रडत ह्मणाली, 'पूर्वीं स्वर्गांत असतां महाराजांकडे माझें मन अतिशय लागल्यामुळें माझ्या हातून चूक झाली व ह्मणूनच गुरूनीं मला शाप दिला व इंद्रानें त्याची मर्यादा केली.'

राजा ह्मणाला, 'कोणती मर्यादा केली होती!'

उर्वशी ह्मणाली, 'जेव्हां तुला पुत्र होऊन राजा त्याचें तोंड पाहील, तेव्हां तूं परत माझ्या जवळ यावेंस, असें इंद्रानें मला सांगितलें होतें. ह्मणून आपला वियोग होऊंनये व विद्येचीही प्राप्ति व्हावी याकरितां हा पुत्र जन्मास येतांच याला च्यवनऋषीच्या आश्रमांत— आतां आली होती ती आर्या सत्यवती, तिच्या हातांत मी आपण होऊन नेऊन दिला. तो आतां प्रौढ झाला व बापाची सेवा करण्यास योग्य झाला आहे असें समजून

ऋषींनीं या आयूला हिकडे आणून पोंहचविलें. असो. जी गोष्ट लवकर होऊं नये असें मी इच्छित होतें, तीच दैवानें आपेआप त्वरित घडविली, त्याला माझा काय उपाय? झालें, आपल्याशीं माझा झाला इतकाच सहवास! यापुढें मी येथें राहण्यास समर्थ नाहीं.'

उर्वशीनें सांगितलेली हकीकत ऐकून सर्वांला अतिशय दुःख झालें. राजाला तर मूर्च्छाच आली. चोपदार वगैरे मंडळीनें राजाला सावध केलें. तेव्हां माणवक हात वर करून ह्मणाला, ' अब्रह्मण्यम्! अब्रह्मण्यम्! '

कांहीं वेळानें राजा सावध होऊन ह्मणाला, ' हें दुष्ट दैव सुखाच्या आड कसें येतें तें पहा. पुत्राची प्राप्ति होऊन माझ्या मनाचें समाधान झालें होतें, तों इतक्यांत हे सुंदरि, तुझा वियोग होण्याचा हा दुःसह प्रसंग प्राप्त झाला. उन्हाळ्याच्या तापानें करपलेल्या वृक्षावर मेघानें वृष्टि करून त्याचा ताप शांत केला, इतक्यांत त्याच्यावर वीज पडावी तशी माझी अवस्था झाली.'

माणवक ह्मणाला, 'होहो! हा अर्थ ह्मणून जो आहे त्याच्या बरोबर अनर्थ आपला नेहमीं प्राप्त व्हावयाचाच. तेव्हां मला असें वाटतें कीं, तूं आतां वल्कलें धारण करून तपोवनांत निघून जा ह्मणजे झालें! '

उर्वशी मोठ्यानें रडत ह्मणाली, ' हाय हाय! माझें मेलीचें कपाळ फुटलें! पुत्रप्राप्ति होतांच मी आतां स्वर्गाला जाण्यास निघालें ह्मणजे—मी एवढ्याच कामाकरितां आलें होतें व माझा आपल्यावर सकारण स्नेह होता असें महाराजांला वाटेल!'

हें ऐकून राजा ह्मणाला, ' सुंदरि, छे छे! असें ह्म-

णूं नको. तूं पराधीन आहेस. वियोग व्हावा असें तुझ्या मनांत नाहीं; पण तसें करण्याविषयीं तूं असमर्थ आहेस, याकरितां आपला धनी इंद्र याच्या आज्ञेप्रमाणें वाग. झालें, मला तरी आतां येथें राहून काय करायचें आहे! मीही आतांच या तुझ्या पुत्राला राज्याभिषेक करून मृगांचे कळप ज्यांत सुखानें संचार करीत आहेत अशा तपोवनाचा आश्रय करीन.'

राज्याचा भार आपल्या डोक्यावर ठेवणार हें ऐकून **आयु** ह्मणाला, 'बाबा, मोठ्या पराक्रमी राजानें आपल्या शिरावर घ्यावयाचा भार आपण माझ्यासारख्या अज्ञान बालकाच्या मस्तकावर ठेवूं नका.'

**राजा** ह्मणाला, 'अरे मुला, तुला ठाऊक नाहीं. तूं असें बोलूं नको. गंधद्वीपनांवाचा‡ हत्ती वयानें लहान असला, तरी तो दुसऱ्या हत्तीला हटवितो. सर्प लहान असला, तरी त्याचें विष प्राण घेण्यास समर्थ होतें. योग्य राजपुत्र लहान असला, तरी तो पृथ्वीचें रक्षण करण्यास समर्थ होतो. वयावर कांहीं नाहीं. ते गुण जात्याच प्राप्त होत असतात. तेव्हां राज्याचा भार घेण्यास खरोखर तूं योग्य आहेस.'

चोपदाराला ह्मणाला, 'आर्या **लातव्या**, माझ्या हुकुमानें आपला मुख्य प्रधान **पर्वत** याला असें सांग कीं, माझ्या मनांत हा प्रियपुत्र **आयु** याला राज्याभिषेक करावयाचा आहे, तर सर्व सामग्रीची तयारी कर.'

---

‡ गंधद्वीप नांवाची एक हत्तींची जात आहे. हे मोठे विशाळ असून सार्वकाळ मदानें धुंद असतात.

**राजाची** ही आज्ञा कोणालाच योग्य वाटली नाहीं. तरी निरुपायास्तव चोपदार मुजरा करून प्रधानाकडे गेला.

**माणवकानें** थट्टेनें—तपोवनाला जा, असें **राजाला** ह्मटलें होतें; पण **राजानें** तें अगदीं खरेंच केलें. पुत्राला राज्याभिषेक करून तो अरण्यांत जाण्यास निघाला, पण त्या त्याच्या तयारीला एक विघ्न आलें. वस्तुतः तो विरक्त होऊन तपोवनाला जात नव्हताच. केवळ **उर्वशीचा** विरह सहन होत नाहीं ह्मणूनच त्याची ही तयारी होती.

राजा **पुरूरवा** हा **इंद्राचा** मोठा साह्यकर्ता होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. **इंद्रादि** देव हे त्रैलोक्यांतील वृत्त जाणत असतात. आपल्याला लढाईच्या प्रसंगीं साह्य करणारा राजा **पुरूरवा** सर्वसंग परित्याग करून तपोवनास जात आहे ही गोष्ट **इंद्राला** तत्काल समजली. तपोवनास जाणें ह्मणजे सर्व प्राणिमात्रांला अभय देऊन शस्त्र खालीं ठेवणें हें, अर्थात् सिद्ध झालेंच. देवांचे प्रतिस्पर्धी दैत्य हे नेहमीं लढाया करीत असत. व लवकरच मोठी लढाई होणार असें **इंद्राला** समजलें होतें, ह्मणून **राजानें** इतक्यांतच शस्त्र खालीं ठेवावें हें **इंद्राला** मान्य नव्हतें. वरचेवर मोठमोठ्या संग्रामांत **राजा** त्याचें मोठें साह्य करीत होता. व पुढें होणाऱ्या संग्रामांत **इंद्राला** त्याची मदत पाहिजे होती. तेव्हां **पुरूरव्यासारख्या** महापराक्रमी आपल्या मित्राला तपोवनांत जाऊं द्यावें हें **इंद्राला** इष्ट वाटलें नाहीं, हें उघडच आहे. केवळ **उर्वशीकरितांच राजा** असें करीत आहे, तेव्हां **उर्वशी** दिली ह्मणजे तो तपोवनांत जाण्याचा बेत रहीत करील, असें समजून

इंद्रानें राजाचें समाधान करण्याकरितां तत्काळ नारद-ऋषीला त्याच्याकडे पाठविलें.

इकडे राजा तपोवनास जाण्याची तयारी करीत आहे, इतक्यांत जशी वीज चमकावी त्याप्रमाणें आकाशांत एका-एकीं मोठें तेज दिसूं लागलें व त्याच्यायोगानें सर्वांचे डोळे दिपून गेले. राजानें वर पाहिलें तों त्याला प्रथम वीजच आहे असें वाटलें; पण लक्ष्यपूर्वक पाहिल्यावर भगवान् नारद-ऋषि येत असून त्याचें तेज चहूंकडे फांकलें आहे असें तो समजला. नारदाला उद्देशून ह्मणाला, 'कसोटीवर सोन्याच्या रेषा चमकतात त्याप्रमाणें ज्याच्या जटा चमकत आहेत, चंद्रकलेसारखें शुभ्र यज्ञोपवीत ज्यानें धारण केलें आहे, मोत्यांच्या हारापेक्षांही ज्याची प्रभा सुंदर दिसत आहे, असा हा लोकांचे मनोरथ पूर्ण करणारा चालता बोलता कल्पवृक्षच आहे कीं काय असें वाटतें.'

राजा असें बोलत आहे तों नारद थेट राजाच्या ज-वळ आकाशांतून खालीं उतरला. त्याला पाहून—पूजेचें साहित्य आणा, पूजेचें साहित्य आणा, असें राजानें ह्मटलें; तों उर्वशीनें लगबगीनें पूजेचें साहित्य आणून दिलें. तेव्हां राजानें नारदाला उपचार अर्पण करून नमस्कार केला. नारदानें त्याला आशीर्वाद दिला. नंतर उर्वशीनें नमस्कार केला, तेव्हां नारदानें—तुह्मी उभयतां स्त्रीपुरुष बहुत दिवस एकत्र राहून सुखाचा अनुभव घ्या! असा आशी-र्वाद दिला. उर्वशी अगदीं जायला निघाली असून यावेळीं नारदानें तसा आशीर्वाद दिल्यावरून राजा मनांत ह्मणाला, ह्या ऋषीच्या तोंडांतून खोटें वाक्य कधींही निघावयाचें नाहीं. तेव्हां कदाचित् यानें ह्मटलें तसेंच

होणार असेल. नंतर आयूला नारदास नमस्कार करण्याविषयीं सांगितलें.

आयु पुढें होऊन ह्मणाला, 'भगवन्, उर्वशीचा पुत्र आयु मी आपल्याला नमस्कार करतों.'

नारदानें—तूं आयुष्मान् हो! असा त्याला आशीर्वाद दिला. नंतर नारद आसनावर बसल्यावर त्याच्या आज्ञेनें सर्व मंडळीं यथायोग्य आसनावर बसली. तेव्हां राजा नारदाला नमस्कार करून विनयपूर्वक ह्मणाला, 'भगवन्, आपलें येणें निष्कारण कधींही व्हायचें नाहीं. तेव्हां सांप्रत येण्याचें कारण काय तें ऐकण्याची इच्छा करतों.'

नारद ह्मणाला, 'राजा, इंद्राचा कांहीं निरोप सांगण्याकरितां आलों आहें तो ऐक. आपल्या दैवी प्रभावानें, तूं अरण्यांत जाण्याविषयीं सिद्ध झाला आहेस असें, पाहून इंद्रानें ही आज्ञा केली आहे—भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्हीही कालांत काय होणार तें जाणणाऱ्या ऋषींनीं लवकरच देवदैत्यांचें मोठें युद्ध होणार असें इंद्राला सांगितलें आहे. युद्ध प्रसंगांत त्याला तूं पूर्ण साह्य करणारा आहेस. तेव्हां इतक्यांतच त्वां शस्त्र खालीं ठेवूं नये, अशी इंद्राची इच्छा आहे. ह्या उर्वशीनें, तुझें जीवमान असे तोंपर्यंत, तुझी सहधर्मचारिणी व्हावें, अशी इंद्रानें हिला आज्ञा केली आहे.'

उर्वशीला हें पाहिजेच होतें. राजाचें जीवमान असे तोंपर्यंत आपल्याला त्याच्या जवळ राहण्याची इंद्राची परवानगी मिळाली, हें ऐकून तिला फार आनंद झाला. ती हळूच ह्मणाली, 'बरें झालें. जणुं काय माझ्या हृदयांतला कांटाच काढला.'

राजाही संतुष्ट होऊन ह्मणाला, ‘भगवन्, इंद्रानें माझ्यावर मोठा अनुग्रह केला.’

नारद ह्मणाला, ‘त्यानें योग्यच केलें. तुझें कार्य इंद्रानें करावें व त्याचें इष्ट त्वां करावें. सूर्य आपल्या तेजानें अग्नीला वाढवितो व अग्नि* सूर्याला वाढवितो, तसाच हा तुह्मां उभयतांचा संबंध आहे.’

राजा पुरूरव्यानें आयूला मुख्य राजा करण्याचा विचार केला होता; पण इंद्राला ती गोष्ट मान्य नव्हती, ह्मणून त्यानें नारदाबरोबर आयूला यौवराज्याचा अभिषेक करण्याची तयारी करून दिली होती. रंभा नांवाची अप्सरा तें साहित्य घेऊन आकाशांत उभी होती. तिच्याकडे पाहून नारद ह्मणाला, ‘अग रंभे, मंत्रांनीं अभिमंत्रित केलेलें यौवराज्याभिषेकाचें साहित्य इकडे घेऊन ये.’

याप्रमाणें नारदाची आज्ञा होतांच रंभेनें साहित्य आणून पुढें ठेविलें. तेव्हां नारदानें आयूला रत्नखचित आसनावर बसवून स्वतः आपल्या हातांनीं—अभिमंत्रण केलेलें उदक सुवर्णमय कलशानें आयूच्या मस्तकावर घातलें.† व अभिषेकाचा मुख्य विधि काय करावयाचा होता

---

* तेज ह्मणून जेवढें आहे तें सारें एकच आहे. दिवसा अग्नि सूर्याला आपला प्रकाश देतो व सूर्य रात्रीं अग्नीला आपला प्रकाश देतो, अशी समजूत आहे व तिचा प्रत्यक्ष अनुभवही येतो.

† येथें आयु ह्या एकाच पुत्राचें नांव आलें आहे; पण श्रीमद्भागवत नांवाच्या पुराणांत—आयु, श्रुतायु, सत्यायु, रय, विजय आणि जय असे उर्वशीचे सहा पुत्र असल्याचें वर्णन आहे.

तो केला, नंतर बाकीचे शिष्टाचार **रंभेला** करावयास सांगितले.‡ त्याप्रमाणें **रंभेनें** यथाविधि करून ती **आयूला** ह्मणाली, 'वत्सा, भगवान् **नारदाला** व आपल्या आईबापांलाही नमस्कार कर.'

हें ऐकून **आयूनें** सर्वांला यथायोग्य नमस्कार केले. **नारद**—तुझें कल्याण असो! असें ह्मणाला. **राजा**—कुलधुरंधर हो!—असें ह्मणाला व **उर्वशी**—बापाच्या आज्ञेंत वागणारा हो! असें ह्मणाली. इतक्यांत दोघे भाट तेथें येऊन संप्रदायाप्रमाणें त्यांनीं युवराज **आयु** याला मुजरा केला.

त्यांतून एक ह्मणाला, 'जसा देवमुनि **अत्रिऋषि** याला चंद्र व चंद्राला बुध आणि बुधाला महाराज ( **पुरूरवा** ) अनुरूप झाले, तसेच आपणही लोकोत्तर गुणांनीं आपल्या वडिलांचें अनुकरण कराल. सर्व लोकांहून परम श्रेष्ठ अशा आपल्या वंशावर सर्व आशीर्वाद पूर्णच आहेत. तेव्हां आह्मी आणखी विशेष काय आशीर्वाद द्यायचे आहेत.'

दुसरा ह्मणाला, 'इतर सर्व श्रेष्ठ लोकांत परमश्रेष्ठ अशा आपल्या पित्याकडे व ज्यांचें धैर्य निश्चल आहे अशा तुह्मांकडे विभागलेली ही राजलक्ष्मी सांप्रत—**हिमाचल** आणि समुद्र या दोघांकडे जिचें उदक विभागलें आहे, अशा **भागीरथी**प्रमाणें अधिकच शोभते.'

**रंभा उर्वशीला** ह्मणाली, 'प्रियसखि **उर्वशि**, आपला

---

‡ राणी वसुमती ही राजाची प्रथम विवाहित स्त्री अर्थात् पट्टराणी होती. यौवराज्याचा अधिकार वस्तुतः तिच्याच पुत्राला मिळावयाचा; पण वसुमतीला मुळींच कांहीं अपत्य नव्हतें, तेव्हां अर्थात् उर्वशीचा पुत्र आयु याला तो अधिकार प्राप्त झाला.

पुत्र यौवराज्यावर बसलेला पाहून व भर्त्याशीं, विरह हो-ण्याचा प्रसंग टळला हें पाहून तूं सुखी झालीस ह्मणून मला मोठें समाधान वाटतें!'

रंभेलाही उर्वशी आपल्या बहिणीसारखी मानीत होती. ती ह्मणाली, 'अग, हा जो आमचा उदयकाळ झाला आहे, तो तुला आणि मला सारखाच आहे. उर्वशी आयूला हातांत धरून ह्मणाली, 'बाळा, आंत जाऊन आपली वडील मातुश्री राणी वसुमती हिला नमस्कार कर.'

उर्वशी राजाला अत्यंत प्रिय होती व तिचा विशेष मानसन्मान होता, तरी ती आपल्याकडून वसुमतीराणीचा अपमान करीत नव्हती व तिच्याशीं मोठ्या आर्जवानेंच वागत होती. ह्मणूनच तिनें यावेळीं तिचा सन्मान करण्याकरितां आयूला, तिला नमस्कार करून येण्यास सांगितलें.

राजा उर्वशीच्या नादीं लागला होता, तरी तोही राणीचा अपमान करीत नव्हता. उर्वशीनें आयूला सांगितलें तें ऐकून तो ह्मणाला, 'अंमळ थांब. आपण सगळेच तिला भेटावयाला जाऊं.'

नारद राजाला ह्मणाला, 'हा तुझा पुत्र आयु याला यौवराज्याचा अभिषेक झाला हें पाहून इंद्रानें शत्रूवर स्वारी करण्याकरितां स्वामिकार्तिकाला अभिषेक केला होता, त्या गोष्टीचें मला स्मरण झालें.'

राजा ह्मणाला, 'भगवान् इंद्रानें मजवर सर्व प्रकारें अनुग्रह केला आहे.'

**नारद** ह्मणाला, ‘**राजा इंद्रानें** तुझें आणखीं काय प्रिय करावें तें सांग.’

**राजा** ह्मणाला, ‘याहून आणखी प्रिय ह्मणून काय राहिलें आहे? तथापि मजवर प्रसाद करावा अशी देव-राजाची इच्छा असेल, तर परस्परांचा विरोध करणाऱ्या व ज्यांचें एके ठिकाणीं वास्तव्य होणें दुर्लभ अशा लक्ष्मी आणि सरस्वती यांचें सज्जनांच्या कल्याणाकरितां एके ठिकाणीं वास्तव्य होवो! सर्व प्राणिमात्र संकटांतून पार पडोत! सर्वांला कल्याण प्राप्त होवो! सर्वांचे मनोरथ पूर्ण होवोत! व सर्व सर्वत्र आनंद पावोत ह्मणजे झालें!

---

## उपसंहार.

याप्रमाणें **राजानें** मागितल्यावरून **नारद** ‘तथास्तु’ ह्मणून त्याचा निरोप घेऊन **रंभेसहवर्तमान** परत स्वर्गास निघून गेला. नंतर **राजा** मोठ्या आनंदानें **आयूसहवर्तमान** अंतर्गृहांत गेला. **उर्वशीच्या** सांगण्यावरून आयूनें राणी **वसुमती** हिला नमस्कार केला व तिणें आपल्या पोटच्या पुत्राप्रमाणें प्रेमपूर्वक त्याचा स्वीकार केला.

नवऱ्यानें घरांत एखादें पात्र आणून टेविलें तर बायका निरूपायास्तव कदाचित् डोळ्यांवर कातडें ओढतील; पण कोणत्याही कारणानें त्याचें उच्चाटन व्हावें ही गोष्ट रात्रंदिवस त्यांच्या मनांत घोळल्यावांचून राहणार नाहीं. पण **उर्वशीची** तशी स्थिति नव्हती. वस्तुतः राजा **पुरूरवा** तिचा इतका आज्ञांकित होता कीं, तो ह्मणजे तिचें

एक खेळणें होतें असें ह्मटलें तरी चालेल. तथापि **उर्वशी** इतर आंगवस्त्राप्रमाणेंच एक आंगवस्त्र होऊन राहिली नव्हती. ती **राजा**ची धर्मपत्नीच झाली होती. वेश्यांचे—वरकांतीं प्रेम दाखविणें व कोणत्याही रितीनें आपल्या नादीं लागलेल्या पुरुषाला लुटून फस्त करणें इत्यादि जे स्वभावसिद्ध दुर्गुण ते **उर्वशी**च्या अंगीं मुळींच नव्हते असें नाहीं, तथापि **राजा**जवळ मात्र तिणें त्या दुर्गुणांचा मुळींच प्रयोग केला नव्हता. एखाद्या विवाहित स्त्रीपेक्षांही ती **राजा**वर अनुरक्त झाली होती, तेव्हां अर्थात् तिचें वर्तनही धर्मपत्नीसारखेंच होतें. यामुळें राणी **वसुमती**ला तिच्याविषयीं असंतोष तर नव्हताच; पण उलट ती तिला केवळ आपल्या बहीणीसारखी मानीत होती. **उर्वशी** आज जाणार होती ती आतां आजन्मपर्यंत राहणार हें ऐकून **राणी**ला फार संतोष झाला.

**आयु** हा **उर्वशी**चा पुत्र असून तो सांप्रत युवराज झाला व अनुक्रमानें राज्याचा मुख्य मालक तोच होणार, या गोष्टीचें **वसुमती**ला बिलकुल वाईट वाटलें नाहीं. स्वतः तिच्या पोटच्या पुत्राला असा युवराजाचा अधिकार मिळाला असतां जो आनंद व्हायचा तोच तिला यावेळीं आनंद झाला. याप्रमाणेंच जनानखान्यांतल्या इतर स्त्रियांलाही मोठा संतोष होऊन हा दिवस जिकडे तिकडे आनंदकारक झाला.

**राजा**ला **उर्वशी**चा वियोग होण्याची जी धास्ती होती ती मुळींच नाहींशी झाल्यामुळें तो बेफिकीर हासात आनंदानें राहूं लागला. दिवसेंदिवस राज्यकारभाराकडे त्याणें विशेष लक्ष्य पुरविलें. राज्यरूपी गाडा आजपर्यंत त्याला एकट्यालाच ओढावा लागत होता; पण

आतां आयु युवराज झाल्यामुळें त्याला दुसरा एक जोडीदार मिळाल्यासारखें झालें, तेव्हां अर्थात् राज्यशकट ओढण्याचा त्याच्यावरचा भार थोडासा कमी झाला.

जसजसें मनुष्याचें वय अधिकाधिक होत जातें तसतशी त्याची शक्तिही कमी कमी होत जाते, अर्थात् विषयसेवनाची इच्छाही मंद होते ; पण ही स्थिति राजा पुरूरव्याला लागू नव्हती. त्याचा प्रभाव व सामर्थ्य अलौकिक असल्यामुळें त्याला अशक्तपणा व थकवा कधींच प्राप्त झाला नाहीं. अर्धें आयुष्य झालें ह्मणजे जरा हळूच कानाला लागून—संसार सोड असा उपदेश करूं लागते, पण राजा पुरूरव्याचा अलौकिक प्रभाव पाहून ती भ्याली ह्मणूनच कीं काय बिचाऱ्या त्या जरेनें त्याला तोंड देखील दाखविलें नाहीं. त्याची विषयसेवनाची शक्ति अखेरपर्यंत मुळींच क्षीण झाली नव्हती. वस्तुतः विषय हे इतके विलक्षण मोहक आहेत कीं, घटका दोन घटकांनीं प्राण जाणार अशा स्थितींत असलेल्या मनुष्याला देखिल त्यांचा लोभ सुटत नाहीं. असें आहे तरी उतारवयाच्या पुरुषांची ती केवळ उत्कट वासना मात्र असते, पण त्यांच्या हातून तशा प्रकारची कृति मुळींच घडत नाहीं. राजा पुरूरव्याचें तसें नव्हतें. आहार, विहार इत्यादि सर्व व्यापार त्याचे यथास्थित चालले होते.

याप्रमाणें सुखसमुद्रांत पोंहत असलेल्या राजा पुरूरव्यानें पुष्कळ वर्षें ऐहिकसुखाचा अनुभव घेतला. व नारदानें सांगितल्याप्रमाणें लौकरच देवदैत्यांचा भयंकर युद्धसंग्राम झाला, त्यांत राजा पुरूरवा सेनापति होऊन इंद्राचे तर्फेनें शत्रूशीं लढत होता, यावेळीं प्रति-

ष्ठाननगरींत युवराज आयु याला त्याणें राज्याचा सर्व अधिकार दिला होता. देवदैत्यांची ती भयंकर लढाई फार दिवस चालली होती. शेवटीं पुष्कळ दैत्यांचा संहार झाल्यामुळें कश्यपऋषीनें मध्यस्थी करून देवांला शांत केलें व दैत्यांला एकदम पाताळांत घालविलें. या लढाईंत इंद्राला जय प्राप्त झाला व त्या कामीं राजा पुरूरव्यानें विशेष साह्य केलें यामुळें इंद्र त्याचा मोठा आभारी झाला.

जन्मास आलेल्या प्राण्यांची शक्ति कितीही मोठी असो, त्याचा प्रभाव पाहिजे तेवढा असो, पण सर्वांचा स्वाहाकार करून टाकणारा काळ कोणालाही सोडीत नाहीं. त्याचा प्रभाव, मुळींच ज्याला जन्म प्राप्त झालें नसेल, त्याच्यावर मात्र चालत नाहीं. पण जन्मास आलेल्या कोणत्याही प्राण्याला तो पछाडल्यावांचून सोडीत नाहीं. मग राजा पुरूरवा हा त्याच्या तडाक्यांतून कसा सुटेल? अंतकाळ जवळ येईपर्यंत त्याच्या शक्तींत व उत्साहांत अंतर पडलें नाहीं, तरी आतां आपलें देहावसान होण्याचा समय जवळ प्राप्त झाला असें त्याच्या लक्षांत आलें.

धैर्य त्यालाच ह्मणतात, कीं ज्याचे योगानें अपरिहार्य असा मृत्युकाल प्राप्त झाला असतां उद्विग्न न होतां आपल्या कर्तव्याविषयीं सावध असणें. राजा पुरूरव्याचें जन्म कृतयुगांत झालें होतें व ती वेळ तें युग संपून त्रेतायुग लागण्याची संधि होती. कृतयुगांत मनुष्य बहुतकरून शांत व विषयांचा अभिलाष न करणारे व मोक्षमार्गाविषयीं तत्पर असे असत. पण काल बदलल्यामुळें राजा पुरूरव्याचे मनांत विषयोपभोगाची इच्छा अगदीं

एकसारखी वृद्धि पावत होती. वस्तुतः तो विषयसुखाविषयीं निरीच्छ झाला असता; पण त्रेतायुग लागल्यामुळें त्याच्या मनांत विरक्तता उत्पन्न झाली नाहीं. त्रेतायुग हें कर्ममार्गाचें युग; त्यांत मनुष्याला, अनेक कर्में करावींत, अक्षय सुखाची प्राप्ति करून घ्यावी, निरंतर चैनींत असावें अशी इच्छा अवश्यमेव व्हावयाचीच, त्याप्रमाणें राजा **पुरूरव्या**च्या मनाची स्थिति झाली. इहलोकांत त्याणें बहुत वर्षें अप्रतिम सुखाचा उपभोग केला तरी त्याची वासना ह्मणून तृप्त झाली नाहीं.

मृत्युकाल जवळ आला तेव्हां त्याला असें वाटलें कीं, आतां आपण मरणार व मेल्यावर **उर्वशी**चा वियोग होणार. तेव्हां परलोकांत देखील **उर्वशी**चा समागम होईल अशाप्रकारचा कांहीं प्रयत्न केला पाहिजे. हे विचार त्याच्या मनांत आले तरी आपला हेतु कोणत्या रितीनें सिद्ध करावा हें त्याच्या लक्ष्यांत आलें नाहीं ह्मणून त्याणें त्याबद्दल **उर्वशी**लाच प्रश्न केला. तो ह्मणाला, 'प्रिये **उर्वशि**, **इंद्रा**च्या आज्ञेप्रमाणें माझें जीवमान असेल तोंपर्यंत तर तूं माझ्या जवळ राहशीलच. त्याविषयीं मला काळजी नाहीं; पण देहत्यागानंतर परलोकांत देखिल तुझा सहवास असावा याविषयीं कांहीं उपाय असेल तर सांग.'

**राजाला** जसा **उर्वशी**चा समागम पाहिजे होता तसाच तिलाही त्याचा समागम पाहिजे होता. स्वर्गलोकाची स्थिति कशी आहे ती तिला माहितच होती. ती ह्मणाली, 'महाराज, स्वर्ग हा एक बाजार आहे असें ह्मटलें तरी चालेल. ज्याच्या जवळ पैसे असतील त्याला बाजारांत मांडलेल्या वस्तु जशा मिळण्यास कठीण नाहींत,

तसेंच ज्याच्या पदरीं पुण्य असेल त्याला स्वर्गांतली कोणतीही वस्तु प्राप्त होण्यास अशक्य नाहीं. तेथें काय ती पुण्याची अपेक्षा आहे. आह्मी अप्सरा ह्या एक स्वर्गांतल्या वस्तुच आहों. ज्याचें जसें पुण्य असेल तदनुसार त्याला आमची प्राप्ति होत असते, तथापि आमची प्राप्ति होण्याविषयींचा मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे गंधर्वांला संतुष्ट करणें हाच आहे. आमचा मुख्य अधिपति जरी इंद्र आहे तरी प्रत्यक्षरीतीनें आमच्यावर गंधर्वांचीच सत्ता आहे. ते सांगतील ती गोष्ट आह्माला अवश्य केली पाहिजे. आपल्या मनांत स्वर्गलोकांत देखील माझी प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल, तर गंधर्वांची आराधना करा ह्मणजे ते मला आपल्या हवालीं करतील.'

हा उपाय राजाला फार योग्य वाटला. त्याणें गंधर्वांचें आराधन करण्यास प्रारंभ केला. तेव्हां ते संतुष्ट झाले व त्यांणीं राजाला एक अग्नीची थाळ दिली. त्रेतायुगाची सुरवात होऊन कर्ममार्ग अर्थात् यज्ञयागादि कर्मे या लोकीं सुरू व्हायचीं होतीं. व तें कृत्य राजाच्या हातून व्हावें ह्मणून त्यांणीं ती अग्नीची थाळ त्याला दिली.

गंधर्वांनीं दिलेली अग्नीची थाळ हिच उर्वशीच्या प्राप्तीचें मुख्य साधन असें समजून राजानें मोठ्या आनंदानें तिचा स्वीकार केला व ती आपल्या घरीं आणून ठेवली. नंतर तिचा उपयोग काय करावा याविषयीं तो विचार करीत होता. कांहीं वेळ विचार करून अग्निस्थाली जेथें ठेविली होती तेथें येऊन पाहतो तों त्या ठिकाणीं अश्वत्थाचा आणि शमीचा असे दोन वृक्ष उत्पन्न झाले असून अग्निस्थाली कोठें नाहींशी झाली, असें त्याणें पाहिलें. रा-

जाला या गोष्टीचा मोठा चमत्कार वाटला. यद्यपि त्याला तसें करण्याविषयीं कोणीं सांगितलें नव्हतें, तथापि त्रेता-युगाच्या प्रवृत्तीनें त्याच्या मनांत प्रेरणा केल्यावरून त्यानें त्या अश्वत्थवृक्षाच्या दोन अरणी तयार केल्या व शमीवृक्षाचा मंथा तयार केला. आणि मंथा मध्यें धरून एक अरणी खालीं व दुसरी वर ठेवून तो मंथन करूं लागला. गंधर्वांनीं दिलेल्या स्थालींत अग्नि होता व तो एकाएकीं नाहींसा होऊन शमी आणि अश्वत्थ हे वृक्ष त्याच्या ठिकाणीं दिसले. तेव्हां अग्नि त्या दोन वृक्षांत दडला असेल, अशी त्याच्या मनांत कल्पना येऊन, या दोन वृक्षांच्या लांकडांचें घर्षण केलें तर त्यापासून अग्नि प्रगट होईल, असें त्याला वाटलें; ह्मणून त्याणें मंथन करण्याला प्रारंभ केला.

याप्रमाणें त्या दोन्ही काष्ठांचें घर्षण करतां करतां त्यापासून अग्नि प्रगट झाला, तेव्हां राजाला मोठा आनंद झाला. त्याणें त्या अग्नीला आपला पुत्र असें मानिलें व तोच प्रदीप्त करून राजानें गंधर्वांच्या उद्देशानें त्रयी —अर्थात् ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद, या तिन्ही वेदांतील मंत्रांना उपयोग करून हवन केलें. त्या त्याच्या यज्ञानें गंधर्व प्रसन्न झाले व त्यांणीं स्वर्गांत चिरकाल राजाला उर्वशीचा समागम व्हावा अशी योजना केली.

देह पतन पावण्याचा समय येतांच, राजानें आपला पुत्र युवराज आयु याला शेवटच्या हिताच्या कांहीं गोष्टी सांगावयाच्या होत्या त्या सांगून व सर्व राज्य त्याच्या हवालीं करून मोठ्या आनंदानें त्याणें ह्या मर्त्यशरीराचा त्याग केला व तत्काल दिव्यदेही झाला.

**राजानें** शरीराचा त्याग करतांच **उर्वशी** आपल्या पुत्राला कुरवाळून तत्काल स्वर्गांत निघून गेली. **उर्वशी** स्वर्गांत जाऊन पोंचली नाहीं तोंच पाठोपाठ दिव्यदेह धारण करणारा तिचा प्रिय राजा **पुरूरवाही** तेथें प्राप्त झाला. आजपर्यंत त्याचा आत्मा मर्त्यशरीरांत होता, ह्मणून दिव्यलोकांत राहणाऱ्या **उर्वशीच्या** समागमाविषयीं त्याला अनेक खटपटी कराव्या लागल्या; पण निरंतर **उर्वशीचा** समागम होण्याविषयीं प्रतिबंधक अशा मानव शरीराचा त्याग करून दिव्यदेह धारण करणाऱ्या **राजाला** आतां तिचा समागम तुटेल याची मुळींच भीति राहिली नाहीं. अत्युत्कट अशा आपल्या पुण्यानें जणुं काय विकतच घेतलेली अशी जी आपली प्रिय **उर्वशी** तिच्यासहवर्तमान तो चिरकाल स्वर्गलोकचे दिव्य भोग भोगीत होत्साता मोठ्या आनंदांत राहता झाला.

**समाप्त.**

# पोतदारांचीं

## अतिस्वस्त शालोपयोगी व इतर पुस्तकें

### ह्यांविषयीं महत्वाची सूचना.

पोतदारांचीं सर्व प्रकारचीं शालोपयोगी व इतर पुस्तकें विक्रीस तयार आहेत. टपालखर्चेसुद्धां रोख पैसा पाठविला असतां पुस्तकें तावडतोब रवाना करूं किंवा 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागविलीं असतां तशीं पाठवूं. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागविलीं असतां बंगीवर जो किमतीचा आंकडा लिहिला असेल तो पाहून तितके पैसे टपालांत भरले ह्मणजे झालें. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' बद्दल मनी आर्डरचा जो खर्च, तोच सरकार घेतें. वाटेल त्या रीतीनें पुस्तकें मागवावीं. पुस्तकें उधार पाठविलीं जाणार नाहींत. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागविलें असतां तें परत घेतलें जाणार नाहीं. अगोदरच विचार करून 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागवावें. तें परत आलें असतां त्याचा कायदेशीर रीतीनें बंदोबस्त करतां येतो. याकरितां अगोदरच खबरदारी घेतली तर बरें. 'बुकपोस्टा'नें बंगी पाठविली असतां ती रजिस्टर करीत जाऊं. रजिस्टर करण्याबद्दल दोन आणे चार्ज जास्त पडेल. रजिस्टर न करितां तशीच पाठवा असें लिहून आल्यास ती गहाळ झाली असतां त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

**विशेषसूचना**—पोतदारांचीं शालोपयोगी पुस्तकें फारच स्वस्त, सुबक, लहान मुलांस फारच उपयुक्त, लोकप्रिय व सुलभ अशीं असल्याबद्दल सर्वत्र प्रसिद्धि आहे. पुस्तकांचा कागद व छापणी हीं विशेष मोहरेदार असतात. सारांश, जेणेंकरून विषयाची दुर्बोधता घालवून सुबोधता आणवेल व पुस्तकें शाळांतील मुलांस अत्युपयोगी होतील अशी तजवीज केली आहे. पुस्तकांच्या किमतीच्या स्वल्पतेनें तर सर्व पुस्तकांस हटविलें आहे. एकदम पुष्कळ पुस्तकें घेणाऱ्या व्यापाऱ्यास भरपूर कमिशन मिळेल. कमिशनचे दर व पुस्तकांच्या वगैरे माहिती करितां अर्धा आण्याचें तिकिट पाठविलें असतां आमचा छापी क्याटलाग पाठवून देऊं.

## बृहत्कथासागर.

प्रसिद्ध महाकवि श्रीगुणाढ्य यांनीं केलेल्या बृहत्कथा नांवाच्या ग्रंथाच्या आधारानें हें पुस्तक तयार केलें आहे. यांत सुमारें दोनहजार वर्षांपूर्वी आपल्या देशांत राजकीय स्थिति, धर्मसंबंधानें लोकांच्या समजुती, सामाजिकस्थिति व विद्येचा प्रसार वगैरे गोष्टी कशा व कोणत्या स्थितींत होत्या तें, अनेक मनोरंजक व नीतिपर निरनिराळ्या कथांच्या द्वारें व्यक्त केलें आहे. सारांश मनाची करमणूक होऊन नीतिमार्गाकडे त्याची प्रवृत्ति होण्यास व अनेक विषयांची माहिती होण्यास आणि पूर्वीची आपल्या देशाची स्थिति समजण्यास या पुस्तकासारखें उपयुक्त दुसरें कोणतेंही नाहीं. प्रत्येकाचीं सुमारें चारशें पृष्ठें होतील असे ह्याचे एकंदर दहा भाग केले आहेत. पहिला भाग विक्रीस तयार आहे.

**भाग पहिला किं. २। रु. ट. ख. ३ आणे.**

**भाग दुसरा (छापत आहे). किं. २। रुपये.**

---

## पोतद्दारांची शालोपयोगी पुस्तकमाला.

| नं० | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ | अंकगणित (पोतदारांचें, आवृत्ति १४वी | ६ | ० |
| २ | मोडीवाचनसार भाग पहिला ... ... | ३ | ० |
| ३ | मोडीवाचनसार भाग दुसरा ... ... | ३ | ० |
| ४ | मोडीवाचनसार भाग तिसरा ... ... | ५ | ० |
| ५ | मोडीवाचनसार भाग चौथा ... ... | ७ | ० |
| ६ | मुंबई इलाख्याचें संक्षिप्त वर्णन ... | ० | ९ |
| ७ | हिंदुस्थानाचें संक्षिप्त वर्णन. ... ... | १ | ० |
| ८ | एशिया व यूरोप खंडांचें संक्षिप्त वर्णन. | १ | ० |
| ९ | आफ्रिका व अमेरिका खं० सं० वर्णन | १ | ६ |
| १० | महाराष्ट्रदेशाच्या इतिहासाचें सं० वर्णन | १ | ६ |
| ११ | हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास (इतिहाससार) ... ... | २ | ६ |
| १२ | चित्रबोध भाग १ला पृष्टें ५२ चित्रें १८६ | १ | ० |
| १३ | चित्रबोध भाग दुसरा ... ... | १ | ० |
| १४ | बालज्ञानसुधा (नवीन धुळाक्षर.) ... | १ | ६ |
| १५ | गद्यपद्यार्थ बोध भाग १ला व २ रा (एकत्र) अथवा मराठी १ ल्या व २ ऱ्या पु० कठिण श० अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण | २ | ० |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १६ | गद्यपद्यार्थबोध भाग ३ रा अथवा मराठी ३ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण ... ... | ३ | ० |
| १७ | गद्यपद्यार्थबोध भाग ४ था अथवा मराठी ४ थ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण ... .. | ४ | ० |
| १८ | गद्यपद्यार्थबोध भाग ५ वा अथवा मराठी ५ व्या पुस्तकांतील कठिण शब्दांचे अर्थ व कवितांचें सान्वयस्पष्टीकरण ... ... | ८ | ० |
| १९ | हॉ० इं० पहिल्या पुस्तकांतील फक्त शब्दार्थसंग्रह. ... | १ | ० |
| २० | हॉ० इं० पु० पुस्तकांतील शब्दार्थ व भाषांतर टीपांसह | २ | ६ |
| २१ | हॉ० इं० दु० पुस्तकांतील शब्दार्थ फ्रेजिससह ... ... | २ | ६ |
| २२ | हॉ० इं० सेकंड बुक सेकंड पार्टांतील शब्दार्थ फ्रेजिससह | ४ | ० |
| २३ | हॉ० इं० ति० पु० शब्दार्थ फ्रेजिससह | १० | ० |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| 24 | A Glossary of Sandford and Merton ... | 8 | 0 |
| २५ | रॉयलप्रायमर पुस्तकाचें सार्थस्पष्टीकरण ... ... | २ | ० |
| २६ | रॉयलरीडर नंबर१चे शब्दार्थ फ्रेजिससह | २ | ३ |
| २७ | रॉयलरीडर नंबर२चे शब्दार्थ फ्रेजिससह | ३ | ६ |
| २८ | रॉयलरीडर नंबर ३चे शब्दार्थ फ्रेजिससह | ४ | ६ |
| २९ | रॉयलरीडर नंबर४चे शब्दार्थ फ्रेजिससह | ६ | ० |
| ३० | सिक्वल टु रॉयलरीडर नं० १ चे शब्दार्थ | २ | ६ |
| ३१ | सिक्वल टु रॉयलरीडर नं० २ चे शब्दार्थ | ३ | ६ |
| ३२ | सिक्वल टु रॉयलरीडर नं०३ चे श० फ्रेजिससह ... ... | ४ | ६ |
| ३३ | सिक्वल टु रॉयलरीडर नं०४ चे श० फ्रेजिससह ... ... | ५ | ० |
| ३४ | मुंबईइलाख्यांतील सरकारी मोडी १ ल्या पुस्तकांतील शब्दार्थ व कवितान्वयार्थ ... ... | १ | ० |
| ३५ | ,, सरकारी मोडी २ ऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ ... ... | १ | ० |
| ३६ | ,, सरकारी मोडी ३ ऱ्या पुस्तकांतील शब्दार्थ ... ... | १ | ६ |

| नं० | पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|---|
| 37 | A Hand-Book for young Students ... | 0 | 9 |
| ३८ | सर्व देशी व विलायती चालीच्या कोष्टकांचें पुस्तक ... | ० | ९ |
| ३९ | मार्कबुक, सर्व मराठी व इंग्रजी शाळांत चालणारें ... | ० | ६ |
| ४० | लेखनदीपिका अथवा मराठी शुद्ध लिहिण्याचे सोपे नियम | १ | ० |
| ४१ | व्याकरणबोध ... | २ | ० |
| ४२ | मराठी शब्दरूपावलि व धातुरूपावलि | १ | ६ |
| ४३ | सुबोधव्याकरण ... | ४ | ० |
| ४४ | वाक्यमीमांसा (प्रो० आगरकरकृत) ... | ९ | ० |

| नं० | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| | भाषांतराकरितां उतारे. | | |
| ४५ | चवथे इयत्तेकरितां | ३ | ० |
| ४६ | पांचवे ,, ... | ७ | ० |
| ४७ | सहावे ,, ... | ८ | ० |
| ४८ | सातवे ,, ... | ९ | ० |
| ४९ | धुळाक्षर शेंकडा १॥ दीड रुपया प्रत्येकास किंमत ... | ० | ६ |
| ५० | कित्ते मोडी नं० १ पासून नं० ६ पर्यंत व कित्ते बालबोध शेकडा १॥ रु. दर कित्यास ... | ० | ६ |
| | धुळाक्षर व कित्ते शेकड्यावर घेणारास वेगळें कमिशन नाहीं. | | |

## मनोरंजक व नीतिपर पुस्तकें.

| नं० | पुस्तकांचीं नांवें. | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| १ | जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग १ | ० | १४ | ० |
| २ | जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग २... ... | १ | २ | ० |
| ३ | सुशिक्षितस्त्री. ... | ० | १० | ० |
| ४ | सुंदरी आणि वसंतसेन भाग १ (मूळ हिंदीभाषेंतील एका गोष्टीवरून रचिलेलें.) ... | ० | ४ | ० |
| ५ | सुंदरी आणि वसंतसेन भाग २ (सदरप्रमाणें.) ... | ० | ९ | ० |

| नं० | पुस्तकांचीं नांवें. | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| ६ | यशवंत विजया नाटिका. ... | ० | ४ | ० |
| ७ | सुंदराबाई (एक चटकदार गोष्ट.) | ० | १ | ० |
| ८ | चातुर्य रत्नावलि भाग १. ... | ० | ० | ६ |
| ९ | चातुर्य रत्नावलि भाग २. ... | ० | ० | ६ |
| १० | चातुर्य रत्नावलि भाग ३. ... | ० | ० | ६ |
| ११ | चातुर्य रत्नावलि भाग ४. ... | ० | ० | ६ |
| १२ | विचारमाला उपदेशपरवाक्यें ... | ० | ० | ६ |

# पोतदारांचीं धर्मविषयक पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें चांगलीं शुद्ध करून सुंदर टैपानें सफाईदार जाड कागदावर आह्मीं छापविलीं आहेत.

| नं०. | पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ | शिवलीलामृत, पदच्छेद करून शुद्ध केलेली व कठिण शब्दांवर टीपा देऊन मोठ्या टैपानें उत्तम ग्लेज व जाड कागदावर छापलेली पोथी ... | १२ | ० |
| २ | आरतीसंग्रह (आरती संख्या ३१०) पदच्छेद करून शुद्ध केलेली आवृत्ति ३ री ... ... | १२ | ० |
| ३ | भूपाळ्या संग्रह (भूपाळ्या संख्या ८६) | ३ | ० |
| ४ | बालहितोपदेशिका सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. लहान मुलांचे फारच उपयोगी ... | ३ | ६ |
| ५ | शब्दरूपावलि, अव्यय व समासविचार एकत्र ... | ३ | ० |
| ६ | शनिमाहात्म्य सांचा मोठा व जाड टाइप | २ | ६ |
| ७ | एकादशी माहात्म्य सुधारलेलें ,, ... | २ | ० |
| ८ | सत्यनारायण कथा प्राकृत ओंवीबद्ध शुद्ध केलेली ... | १ | ० |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ९ | व्यंकटेशस्तोत्रओंव्या | १ | ० |
| १० | करुणामृतस्तोत्रें ,, | १ | ० |
| ११ | रामदासकृत मनाचे श्लोक ... .. | १ | ० |
| १२ | शनिमाहात्म्य लहान टाइप उत्तम छापलेलें बुक (ओंव्या) | १ | ० |
| १३ | आशौचनिर्णयसंस्कृत | १ | ० |
| १४ | पालीची कारिका ... | १ | ० |
| १५ | विष्णुसहस्रनाम मूल. | १ | ० |
| १६ | धांवे संख्या ६० ... | १ | ० |
| १७ | सावित्री आख्यान ओंव्या ... ... | १ | ० |
| १८ | गयासुरआख्यान ,, | १ | ० |
| १९ | श्रीदत्तजन्म ,, .. | १ | ० |
| २० | संगीत पद्यावलि (नवीन) ... ... | १ | ० |
| २१ | संस्कृत सत्यनारायण पूजा व कथा (सुधारलेली) ... | १ | ० |
| २२ | पांडुरंगस्तोत्र ओंव्या. | १ | ० |
| २३ | चक्रविभु ,, ... | १ | ० |
| २४ | प्रश्नावलि (गर्गाचार्यकृत) ... ... | १ | ० |
| २५ | पाळणे (संख्या ३०) | १ | ० |
| २६ | मनोरंजक संगीत . | १ | ० |
| २७ | प्रातःस्मरण मोठें ... | १ | ० |
| २८ | सुदामचरित्र (सुधारलेलें) ... ... | १ | ० |
| २९ | तुळसी आख्यान . | १ | ० |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ३० | स्वप्नाध्याय (प्राकृत अर्थासह शुद्ध केलेला) | १ | ० |
| ३१ | अगंदशिष्ठाई प्रकार १ ला | १ | ० |
| ३२ | अगंदशिष्ठाई प्रकार २ रा | १ | ० |
| ३३ | दामाजीपंताचें चरित्र | १ | ० |
| ३४ | सोळा सोमवार कथा ओंव्या | १ | ० |
| ३५ | मारुतिजन्म ओंव्या | १ | ० |
| ३६ | गर्भावळी (गर्भकांड ओंव्या) | १ | ० |
| ३७ | समासचक्र | १ | ० |
| ३८ | समासचंद्रिका | १ | ० |
| ३९ | शब्दरूपावलि संस्कृत | १ | ० |
| ४० | बावनश्लोकी गुरुचरित्र ओंव्या | ० | ९ |
| ४१ | शिवकवच | ० | ९ |
| ४२ | शिवमहिम्नस्तोत्र | ० | ९ |
| ४३ | राममंत्राचे श्लोक | ० | ९ |
| ४४ | ज्ञानदेवकृत हरिपाठ | ० | ९ |
| ४५ | एकनाथकृत हरिपाठ. | ० | ९ |
| ४६ | चोविसनामाचे अभंग | ० | ९ |
| ४७ | नित्यपाठाचे अभंग. | ० | ९ |
| ४८ | शिवपाठाचे अभंग. | ० | ९ |
| ४९ | तुकारामकृत हरिपाठ | ० | ९ |
| ५० | गुरुपाठाचे अभंग | ० | ९ |
| ५१ | कबिराचीं पदें | ० | ९ |
| ५२ | पोतदारकृत नवीन संगीत आरत्या | ० | ६ |
| ५३ | जीवितस्तोत्र | ० | ६ |
| ५४ | रामरक्षा | ० | ६ |
| ५५ | ध्रुवाख्यान | ० | ६ |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ५६ | द्रौपदीवस्त्रहरणाचे अभंग | ० | ६ |
| ५७ | एकाक्षरी श्लोक | ० | ६ |
| ५८ | तुकारामकृत स्वर्गारोहणाचे अभंग | ० | ६ |
| ५९ | संस्कृत तुळसीमाहात्म्य | ० | ६ |
| ६० | शिवापराधक्षमापनस्तोत्र | ० | ६ |
| ६१ | ज्योतिर्लिंग स्तोत्र. | ० | ६ |
| ६२ | गुरुदत्त पंचक | ० | ६ |
| ६३ | गणपतीचे श्लोक | ० | ६ |
| ६४ | शिवस्तुति | ० | ६ |
| ६५ | लक्ष्मीस्तोत्र संस्कृत | ० | ६ |
| ६६ | मारुतिस्तोत्र व भीमाष्टक | ० | ६ |
| ६७ | गणपतिस्तोत्र ओंव्या | ० | ६ |
| ६८ | मिराबाई चरित्राचे अभंग | ० | ६ |
| ६९ | स्थालीपाकाचे अभंग | ० | ६ |
| ७० | दुर्गास्तोत्र ओंव्या | ० | ३ |
| ७१ | चर्पटपंजरी | ० | ३ |
| ७२ | शिवरक्षा | ० | ३ |
| ७३ | देव्यपराधक्षमापनस्तोत्र | ० | ३ |
| ७४ | शिवमानसपूजा | ० | ३ |
| ७५ | शिवतांडवस्तोत्र | ० | ३ |
| ७६ | नवग्रहस्तोत्र | ० | ३ |
| ७७ | ज्वरस्तोत्र | ० | ३ |
| ७८ | संकष्टनाशनस्तोत्र | ० | ३ |
| ७९ | दत्तात्रेयस्तोत्र | ० | ३ |
| ८० | गोविंदाष्टक | ० | ३ |
| ८१ | गंगाष्टक | ० | ३ |
| ८२ | नर्मदाष्टक | ० | ३ |
| ८३ | अन्नपूर्णाष्टक | ० | ३ |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ८४ | सूर्यस्तुति ... ... | ० | ३ |
| ८५ | रामस्तुति ... ... | ० | ३ |
| ८६ | नारायणस्तोत्र ... | ० | ३ |
| ८७ | शनिस्तोत्र ... | ० | ३ |
| ८८ | कालभैरवाष्टक ... | ० | ३ |
| ८९ | मणिकर्णिकाष्टक ... | ० | ३ |
| ९० | बिंदुमाधवाष्टक ... | ० | ३ |
| ९१ | गजेंद्रमोक्ष प्राकृत. | ० | ३ |
| ९२ | लक्ष्मीस्तोत्र प्राकृत. ... ... | ० | ३ |

| नं०. | पुस्तकांचीं नांवें. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| | स्त्रीपुरुषांनीं एकमेकांचीं नांवें घेण्याची पद्धत आणि मनोरंजक उखाणे व म्हणी. | | |
| ९३ | भाग १. ... .. | ० | ३ |
| ९४ | भाग २. ... ... | ० | ३ |
| ९५ | भाग ३. ... ... | ० | ३ |
| ९६ | भाग ४. ... ... | ० | ३ |
| ९७ | हरिहराष्टोत्तरशतनामावलीस्तोत्र. ... | ० | ३ |

## प्राकृत ग्रंथ व पुस्तकें विक्रीस तयार.

| | कि. रु. | आ. |
|---|---|---|
| सिद्धांतबोध ... ... | ६ | ० |
| भक्तलीलामृत .. ... | ५ | ० |
| ज्ञानेश्वरी ... ... | ४ | ८ |
| संतविजय . .. | ४ | ० |
| नवनाथ भक्तिसार ... | ४ | ० |
| नवनाथ भक्तिसार ... | ३ | ० |
| एकनाथी भागवत ... | ५ | ० |
| पांडवप्रताप . ... | ४ | ० |
| पांडवप्रताप ... ... | ३ | ० |
| पांडवप्रताप ... ... | २ | ० |
| भक्तविजय ... . | ३ | ८ |
| भक्तविजय .. ... | २ | ८ |
| रामविजय ... . | ३ | ० |
| रामविजय फळ्या व वेष्टणासह ... ... | २ | ० |
| रामविजय साधा ... | १ | ८ |
| रामाश्वमेध ... .. | ३ | ० |
| हरिविजय कागद ग्लेज | २ | ८ |
| हरिविजय कागद जाड व शब्दकोश ... . | २ | ० |
| हरिविजय दुसरा . | १ | ८ |
| हरिविजय बुक .. .. | १ | ८ |

| | कि. रु. | आ. |
|---|---|---|
| संतलीलामृत ... ... | २ | ० |
| संतलीलामृत ( बुक ) ... | १ | ८ |
| नाथलीलामृत ... ... | २ | ० |
| दासबोध .. ... ... | २ | ० |
| दासबोध दुसरा . | १ | १२ |
| दासबोध (पु० बांधलेलें) | १ | १२ |
| कथासारामृत ... .. | ३ | ० |
| जैमिनीअश्वमेध ... | ३ | ८ |
| जैमिनीअश्वमेध (बुक) . | २ | ८ |
| श्रीगुरुचरित्र मोठें .. | ३ | ० |
| श्रीगुरुचरित्र लहान . | १ | १० |
| श्रीगुरुचरित्र गुटका ... | २ | ० |
| काशीखंड ... ... | ४ | ८ |
| काशीखंड ... .. | ३ | ८ |
| शिवलीलामृत रेशमी बांधलेलें चित्रांसह ... | ० | ८ |
| शिवलीलामृत रेशमी गुटका ... .. | ० | ७ |
| गणेशलीलामृत सुटी पोथी | ० | ८ |
| " रेशमी बांधलेली .. | ० | १२ |
| पंढरीमाहात्म्य पोथी अध्याय ३१ ... .. | ० | १२ |

| | कि. रु. | आ. |
|---|---|---|
| नासिकेतोपाख्यान | १ | ० |
| अर्जुनगीता प्राकृत ओवीबद्ध | ० | ४ |
| तुकाराम चरित्र | १ | ८ |
| भागवतसारामृत | ५ | ० |
| मूळस्तंभ लहान | ० | ४ |
| मूळस्तंभ मोठा | २ | ० |
| विवेकसिंधु | १ | ४ |
| अमरसार ( संस्कृत इंग्रेजी आणि इंग्रेजी संस्कृत कोश) | १ | ४ |
| सरस्वतीमंडल ( ब्राम्हण लोकांचा इतिहास) | १ | ८ |
| भ्रमनिरास ‘ जशासतसें ’ या पुस्तकाचें खंडण | ० | ८ |
| श्रीरामचरित्र गद्य | १ | ४ |
| श्रीकृष्णचरित्र गद्य | १ | ० |
| पांडवचरित्र गद्य | २ | ८ |
| विक्रमचरित्र गद्य | ० | १० |
| भारतेतिहाससार | १ | ० |
| सार्थगीता (भगवद्गीता मराठी टीकेसह रेशमी ) | ० | १२ |
| गीता सुबोधचंद्रिका | ० | १० |
| धर्मसिंधु ( संस्कृत म० भाषांतरासह ) | ६ | ० |
| तुकारामाचा गाथा | २ | ८ |
| कीर्तनतरंगिणी भाग १ ला. | ० | १४ |
| ,, ,, भाग २ रा. | १ | २ |
| ,, ,, भाग ३ रा. | ० | १४ |
| उपयुक्त कथासंग्रह भाग १ ला | २ | ० |
| उपयुक्त कथासंग्रह भाग २ रा | २ | ० |

| | कि. रु. | आ. |
|---|---|---|
| केसरींतील निवडक निबंध भाग १ | १ | ० |
| ,, ,, भाग २ | १ | ० |
| शिक्षणसार | ० | ९ |
| हरिविजय कथारस. | १ | ० |
| पांडवप्रताप कथारस. | १ | ४ |
| रामविजय कथारस. | १ | ४ |
| संतलीलामृत कथारस. | १ | ४ |
| भक्तिविजय कथारस. | १ | ४ |
| जैमिनिअश्वमेध कथारस. | १ | ४ |
| शिवलीलामृत कथारस. | ० | १० |
| राजपुत्र शूरसेन | १ | ० |
| हंसपालिका कादंबरी | १ | ८ |
| नारायणराव आणि गोदावरी | १ | ४ |
| वेणू (कादंबरी) | १ | ० |
| चंद्रकला (कादंबरी) | १ | ४ |
| बृहत्कथासागर भाग १ ला (कादंबरी) | २ | ४ |
| गुलबकावली मराठी | १ | ४ |
| मंजुघोषा | १ | ४ |
| वसंतकोकिला | १ | ८ |
| मित्रचंद्र | १ | ४ |
| मदनमंजरी | २ | ० |
| विचित्रपुरी | २ | ० |
| विदुरनीति | ० | ४ |
| सिंहासनबत्तिशी | ० | ३ |
| वेताळपंचविशी | ० | ६ |
| स्त्रीचरित्र रामजी डाक्टर पैकीं भाग १।२।३।४ दर भागास | २ | ० |
| महाराष्ट्रभाषेंतील मनोरंजक गोष्टी भाग ५ प्रत्येकीं | १ | ८ |

वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई.

पोतदारांची नीतिपर

सामान्यतः दिवसें दिवस ... झालली ... आपल्या मुहापुस्तकांत असावी, तितके ... कांहीं ... विद्वान् गृहस्थांकडून ... कादंबरीच्या ... लिहवून तीं प्रसिद्ध ... विचार ... पुस्तकं विक्रीस तयार आहेत.

१ क ... लिहिलें आहे. ...

२ ... नाटिकेच्या ... लिहिलें आहे.

३ ... का नाटिकेच्या आधारानें लिहिलें ...

४ चारुदत्त आणि ... आधारानें लिहिलें आहे.

५ मणिमाधव — हें ... लिहिलें आहे. किंमत १ ... टपा.

६ भार्याचाणक्य — हें ... भागांत लिहिलें आहे. यांत ... ज्यांना ... असेल त्यांना विशेष ... उपयुक्त ...

७ विद्युत्सुरुमा — हें ... लिहिलें आहे. किंमत १४ आ.

... अग्निमित्र — ... लिहिलें आहे. किंमत १ रु.

... पोत...